ISSN 0973-8452


मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तीरर्थ

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र- ज्येष्ठ १९३३

एप्रिल-जून २०११/ खंड ३५ अंक १




- अमेरिकन अर्थव्यवस्थेचं 'पतनामांकन' संकट
- अर्थतज्ज्ञ सुरेश तेंडुलकर: एक दुर्लक्षित व्यक्तिमत्व
- महाराष्ट्रातील व्यापारी बँकांच्या थकीत कर्जाचा तुलनात्मक अभ्यास
- मुद्रा परिमाण सिध्दांत आणि किन्सचे पुनर्निर्माण
- किसान क्रेडीट कार्ड योजनेची प्रगती व भवितव्य
- महाराष्ट्र व खान्देशच्या पीकरचनेतील बदलांचा तौलनिक अभ्यास
- शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा तौलनिक अभ्यास
- स्त्री- सबलीकरणासाठी महिला आरक्षण: एक प्रभावी मार्ग
- परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास
- महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत शेतीचे स्थान
- सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

National Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

एप्रिल-जून २०११/खंड ३५, अंक १

प्रमुख संपादक
अविनाश निकम

सहाय्यक संपादक
शंकर पवार

सल्लागार मंडळ
(२००९-१२)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
संतोष कदम
शिवाजी अंभोरे

संपादकीय पत्रव्यवहार
अविनाश रामलाल निकम
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

*लेखातील मते लेखकांचीच*

## अ नु क्र म

■ अविनाश रामलाल निकम, शहादा
**संपादकीय संवाद** ........ १

■ संजय तुपे, नाशिक
**अर्थतज्ज्ञ डॉ.सुरेश तेंडुलकरः एक दुर्लक्षित व्यक्तिमत्त्व** ........ ४

■ गजानन भाकरे, व्ही.एम्.चव्हाण, कोल्हापूर
**महाराष्ट्रातील व्यापारी बँकाच्या थकीत कर्जाचा तुलनात्मक अभ्यास** ........ ९

■ सुषमा देशमुख, अमरावती
**मुद्रा परिमाण सिद्धांत आणि किन्सचे पुनर्निर्माण** ........ १९

■ भागचंद शंकरराव खुरूद, राहुरी संदिप बाबुराव अभंग, अमरावती
**किसान क्रडिट कार्ड योजनेची प्रगतीआणि भवितव्य** ........ २५

■ महेश मोहनीराज बडवे, जळगाव
**महाराष्ट्र आणि खानदेशच्या पीकरचनेतील बदलांचा तौलनिक अभ्यास** ........ ३९

■ सुरेश ढाके, अशोक खाचणे, जळगाव
**शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा तौलनिक अभ्यास** ........ ५०

■ धर्मा रानबा धेडे, कोल्हापूर
**स्त्री सबलीकरणासाठी महिला आरक्षणः एक प्रभावी मार्ग** ... ६०

■ योगेश अ. पाटील, परभणी
**परभणी जिल्हा परिषदेने कृषिक्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास** ........ ७१

■ करमसींग राजपूत, यवतमाळ
**महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत शेतीचे स्थान** ........ ७७

■ संतोष कदम व बी.एम्.भांजे, सोलापूर
**सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकन्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती** ........ ८५

■ शि. ना. माने, सातारा
**अर्थ शब्दांची वाट पाहे** ........ १००

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ २०११-१२

अध्यक्ष

आप्पासाहेब गोविंद पुजारी (मंगळवेढा)

कार्याध्यक्ष

दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

कार्यवाह खजिनदार

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक-अर्थसंवाद

अविनाश रामलाल निकम (शहादा)

विश्वस्त

चारुदत्त गोखले (जळगाव)

ज.फा. पाटील (कोल्हापूर)

मधुकर शिंदे (इस्लामपूर)

सदस्य

रामकृष्ण टाले (नागपूर)

विकास सुकाळे (नांदेड)

ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)

महंमद रफिक मुलाणी (बारामती)

तानाजी भोसले (सांगली)

श्रीरंग मंडले (सिंधुदुर्ग)

श्रीराम जोशी (जळगाव)

सुरेश ढाके (भुसावळ)

हरिहर तिवारी (वाशीम)

हसीम वलांडकर (वाळवा)

बाळासाहेब माने (इस्लामपूर)

विकास सुकाळे (स्थानिक कार्यवाह)



अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई


टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


■ कार्यालयीन पत्रव्यवहार:

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

अनिल बाबुराव सूर्यवंशी

कार्यवाह खजिनदार: मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.

दूरध्वनी: ०२१८४-२२४२९४,

भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६



■ परिषदेचे मुख्य कार्यालय:

मराठी अर्थशास्त्र परिषद,
द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज,
एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६,
एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ,
सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर,
बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.


■ वर्गणी:

▪ परिषदेचे सदस्य:

आजीव सदस्य: रु.२०००/- (एकरकमी)

साधारण सदस्य: रु.३००/- (वार्षिक)

▪ संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:

शैक्षणिक संस्था: रु.२५०/-(वार्षिक)

व्यावसायिक संस्था:रु.६००/-(त्रैवार्षिक)

ग्रंथालये: रु.१०००/-(पंचवार्षिक)

▪ वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च

▪ संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.

▪ कृपया आजीव सदस्य वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच, कार्यवाहांकडे पाठवावी.

▪ अर्थसंवादची वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच, प्रमुख संपादकाकडे पाठवावी. मनी ऑर्डर स्विकारली जात नाही.

## संपादकीय संवाद

# अमेरिकन अर्थव्यवस्थेचं 'पत नामांकन' संकट

■ **एकदा असं झालं .......**

एका प्रख्यात चित्रकाराचं चित्र प्रदर्शन मोठ्या सभागृहात सुरू होतं. ते पाहण्यास गर्दीही बऱ्यापैकी होती. त्या सभागृहात पाचशे रुपयांची एक नोट खाली पडलेली होती. एक व्यक्ती मनाशी गाणं गुणगुणत आपल्याच धुंदीत नोटेशेजारनं निघून गेला. त्याचं लक्ष त्या नोटेकडे गेलं नाही. शहरातील दुसऱ्या एका प्रतिष्ठित व्यक्तीनं त्या नोटेकडे पाहिलं पण खाली बसून नोट उचलायची कशी? लोक मला काय म्हणतील? या विचारानं तो पुढं निघून गेला. तेथून जाणाऱ्या तिसऱ्या एका व्यक्तीचं लक्ष त्या नोटेकडे गेलं. त्यानं क्षणभर विचार केला. खिशातला रुमाल मुद्दाम त्या नोटेजवळ टाकला. रुमाल अन् पाचशेची नोट तो उचलणार तेवढ्यात एका चौथ्या व्यक्तीनं ते दृष्य पाहिलं. तो थोडा दूर होता पण ती नोट कुठल्या न् कुठल्या मार्गानं त्याला मिळवायची होती! त्यानं मुद्दाम त्या दृष्याकडे न पाहिल्यासारखं केलं. पुढच्याच क्षणी त्यानं आरडाओरड सुरू केली...... "माझी पाचशेची नोट हरवलीय! कुणाला मिळाली का?"

भांडवलशाहीत थोड्या फरकानं वेगळ्या अर्थानं असंच असतं, नाही का? मार्केट मधील पैसा खेचण्याची प्रत्येक संधी 'कॅश' करण्याचा प्रयत्न उद्योजक-व्यापाऱ्यांकडून केला जातो. पण या 'कॅश' करण्याच्या स्पर्धेचा अतिरेक होतो. 'मोकाट' सोडलेल्या भांडवलशाहीचा परिणाम म्हणून मंदीचं सावट येतं. जगाची आर्थिक महासत्ता बनलेली अमेरिकन अर्थव्यवस्था आर्थिक संकटात सापडली आहे. 'स्टॅण्डर्ड ॲण्ड पूअर्स' या अग्रगण्य रेटिंग संस्थेनं अमेरिकन अर्थव्यवस्थेचं क्रेडिट रेटिंग (पतनामांकन) 'एएए' वरून 'एए प्लस' असं खाली आणलं आहे. अमेरिकेच्या इतिहासात हे प्रथमच झालं असून या निर्णयानं जगात खळबळ उडाली आहे.

अमेरिकन अर्थसंकल्पीय तूट अन् वाढत्या कर्जाच्या बोजामुळे हे पतनामांकन घसरल्याची चर्चा आहे. या निर्णयानं अमेरिकन सरकार, कंपन्या तसेच ग्राहकांना

नवी कर्जे घेतांना जादा व्याजदर द्यावा लागणार आहे. तेथील पुढील गुंतवणूक आता धोकादायक ठरणार नसली तरी तिच्या सुरक्षिततेची खात्री कमीच राहील, असे सूचित केले जात आहे. अमेरिकेत मंदीची आपत्ती कोसळण्याची शक्यता आणि युरोपीयन कर्ज संकट विस्तारण्याचा धसका घेऊन अमेरिकन शेअर बाजार गडगडला आहे. जगातील सर्व देशांना या आर्थिक भूकंपाचे हादरे बसत आहेत. जागतिकीकरणाची ती अपरिहार्य परिणती असल्याचं बोललं जात आहे. स्पेन, तैवान व आशियाई शेअर बाजारात घसरणीला सुरूवात झाली आहे. पोर्तुगाल, इटली हे देश चांगल्या आर्थिक स्थितीत नाहीत. जपान त्सुनामीने हैराण झाला आहे. अमेरिकेला कर्ज पुरविणाऱ्या भारतातील शेअर बाजाराचा निर्देशांक सध्या तरी घसरतोय्. भारतीय आयटी कंपन्यांवर परिणाम होत आहे. भारत-युरोप व्यापार प्रमाण ६७ अब्ज डॉलर इतके आहे. भारतात् मंदी येण्याची चाहूल लागतेय. भारतासारख्या कृषिप्रधान देशानं घाबरण्याची स्थिती नसल्याचं अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी म्हटलं आहे.

■ **'अर्थसंवाद' विषयी......**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाने यशस्वी ३४ वर्षे पूर्ण करून एप्रिल २०११ मध्ये ३५ व्या वर्षात पदार्पण केलं आहे. आपल्या सर्वच वाचकांसाठी ही अत्यंत आनंदाची व स्पृहणीय बाब आहे. 'अर्थसंवाद' चा हा ३५वा खंड वैशिष्ट्यपूर्ण असावा असा आमचा प्रयत्न आहे. 'अर्थसंवाद' चे प्रमुख संपादकपद आतापर्यंत सर्वश्री आनंद नाडकर्णी, भ.ग.बापट, रवींद्र जोशी, विनायक देशपांडे, जगन्नाथ पाटील यांनी उत्कृष्टपणे पार पाडलं आहे. त्यांच्या योगदानाबद्दल 'अर्थसंवाद' चा प्रमुख संपादक या नात्यानं मी त्यांचा ऋणी आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेची कार्यकारिणी तसेच बदलापूर अधिवेशनात उपस्थित सन्माननीय समस्त आजीव सभासदांनी एकमतानं संपादकपदाची धुरा माझ्यावर सोपविली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. 'अर्थसंवाद' च्या संपादकपदाची धुरा सांभाळण्याची संधी प्राप्त होणं हे मी माझं भाग्य समजतो. आपल्या सर्वांच्या सहकार्यानं ही जबाबदारी मी निष्ठेनं पार करेन असा मला विश्वास आहे. हा अंक प्रसिध्द करताना मला परिषदेचे अध्यक्ष अ.गो.पुजारी, कार्याध्यक्ष दिलीप पाटील, कार्यवाह खजिनदार अनिल सुर्यवंशी,

ज.फा.पाटील, विनायक भिसे, संतोष दास्ताने, अनिल राव, चारुदत्त गोखले, विनायक देशपांडे, जगन्नाथ पाटील, बी.के.शिंदे, श्रीराम जोशी, प्रशांत काटोले यांनी मौलिक सूचना केल्या. मी या सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

'अर्थसंवाद' वर्तमानात जगणारा, वर्तमानाचं प्रतिनिधित्व करणारा असायला हवा. यासाठी प्रत्येक शोधनिबंधातील माहिती व आकडेवारी अद्ययावतच असायला हवी, असा माझा आग्रह राहील. वर्तमान आव्हाने पेलत ध्येयवादी दृष्टीने 'अर्थसंवाद'ला अधिक प्रभावी करण्याचा माझा प्रयत्न राहील. 'अर्थसंवाद' उत्तर महाराष्ट्रातून प्रसिध्द होत असल्याचा मला आनंद वाटत असला तरी महाराष्ट्राच्या सर्व भागातून आलेल्या दर्जेदार लेखांना प्रसिध्दीची समान संधी प्राप्त झाल्यावरच अर्थसंवाद यशस्वी ठरू शकतो, यावर माझा विश्वास आहे. आमचे संस्थाध्यक्ष सहकारमहर्षी पी.के.अण्णा पाटील यांच्याकडून संशोधनकार्यासाठी आम्हाला नेहमीच प्रोत्साहन मिळते. 'अर्थसंवाद'चा दर्जेदार अंक वाचकांसमोर यावा यासाठी परिषदेचे विश्वस्त चारुदत्त गोखले यांनी मोलाचं सहकार्य केलं आहे. या अंकातील जाहिराती प्राप्त करून देण्यास परिषदेचे अध्यक्ष अ.गो.पुजारी, सल्लागार मंडळ सदस्य संतोष कदम यांचं सहकार्य लाभलं. 'अर्थसंवाद' छापण्याची जबाबदारी स्विकारणारे 'सातपुडा ऑफसेट'चे निलेश लाठी व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानतो. 'अर्थसंवाद' च्या अंकाला कॉम्प्युटरवर आकर्षक रूप देणं तसेच मुद्रित शोधनकार्यात सहाय्य करणारे माझे मित्र सुनील भांडारकर यांचा मी ऋणी आहे.

'अर्थसंवाद' अधिकाधिक उत्तम होण्यासाठी वाचकांनी केलेल्या सूचनांचे स्वागत केले जाईल. योग्य त्या सूचना निश्चितपणे विचारात घेतल्या जातील. या अंकासाठी विविध लेख पाठविणाऱ्या लेखकांचे अर्थसंवादच्या वतीने हार्दिक आभार. हा अंक वाचकांना विलंबानं मिळतो आहे याची मला जाणीव आहे. बऱ्याच प्रतीक्षेनंतर आपल्याकडे येणाऱ्या 'अर्थसंवाद'च्या ३५व्या खंडाचे आपण स्वागत कराल अशी आशा आहे.

**- अविनाश रामलाल निकम**
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# अर्थतज्ज्ञ डॉ. सुरेश तेंडूलकर : एक दुर्लक्षित व्यक्तिमत्त्व

संजय तुपे, नाशिक

विभागप्रमुख, बँकींग अँण्ड फायनान्स, बी.वाय.के. वाणिज्य महाविद्यालय.

महाराष्ट्रातील भूमीत अनेक समाजधुरीण व राजकीय चळवळीतील कार्यकर्ते जन्माला येऊन देश व समाजहितासाठी झटले. त्यांनी सामाजिक, राजकीय व आर्थिक परिवर्तनाचा पाया घातल्यामुळेच आजचा आधुनिक महाराष्ट्र व पर्यायाने भारत उभा राहिलेला आपणास दिसतो. फुले, आंबेडकर व शाहु महाराजांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी आर्थिक सुधारणा व अधिकार हस्तांतरण या दोन बाबींवर भर देऊन आर्थिक विचारांचा पाया घातला. अर्थात त्यांनी त्यांचे विचार प्रतिमान (Model) मांडून सांगितले नसले तरी ते प्रतिमान धोरण (Policy) स्वरूप होते हे आपण नाकारू शकत नाही.

महाराष्ट्राला आर्थिक विचारांची संचित ठेव देणारे दिग्गज अर्थतज्ज्ञ होऊन गेले. त्यात प्रामुख्याने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, बॅरिस्टर जी. के. गोखले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी या महान विभूतींनी अर्थशास्त्रीय विचारांचा पाया घातला. या महान अर्थतज्ज्ञांनी विकासात्मक अर्थशास्त्राची मांडणी करतांना अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास व पर्यायाने लोककल्याण (Welfare of Human being) या दोन अर्थशास्त्रीय शाखांमध्ये मोलाची भर घातली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नावारुपाला आलेल्या महाराष्ट्रीयन अर्थतज्ज्ञांपैकी सी. डी. देशमुख, डॉ. वि. म. दांडेकर, डॉ. नीलकंठ रथ, डॉ. पी. ब्रह्मानंद, डॉ. प्रभाकर जोशी व अलीकडेच दु:खद निधन झालेले डॉ. सुरेश तेंडूलकर अशी अजून काही मोजकी नावे घेता येतील. महाराष्ट्रीय माणसांमध्ये प्रचंड विद्वत्ता असते, परंतु lobbing नसल्यामुळे ती मागे पडतात. ह्याचे मूर्तीमंत उदाहरण द्यावयाचे झाले तर प्राध्यापक डॉ. सुरेश तेंडूलकरांचे द्यावे लागेल.

डॉ. सुरेश तेंडूलकर यांची शैक्षणिक कारकीर्द सुरू झाली ती पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र महाविद्यालयातून. त्यांनी बी. कॉम. च्या पदवी परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला व पदव्युत्तर शिक्षणासाठी दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स गाठले. त्यांनी अर्थशास्त्रात एम.ए. करताना दिल्ली विद्यापीठात पहिला क्रमांक मिळविला. अर्थशास्त्रात (Ph.D.) संशोधन करण्यासाठी त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळविला.

तेथे सुरेश तेंडूलकरांनी प्रा. एच. एस. हाअत्तेक्कर आणि एच.बी. चेनरी यांच्या मार्गदर्शनाखाली विकासात्मक अर्थशास्त्रात संशोधन केले. त्यांच्या संशोधनाचा विषय "Some Experiments in Multi-sectoral Planning Model for India" हा होता. त्यांच्या संशोधनात एका विशिष्ट क्षेत्रावर भर न देता एकाच वेळी अनेक क्षेत्रे विकासासाठी निवडून समतोल विकास साधता येईल व पर्यायाने विकासाचा अनुशेष निर्माण होणार नाही अशी त्यांची धारणा होती. अर्थात त्यांच्या संशोधनाच्या काही शिफारशी १९९१ नंतरच्या आर्थिक धोरणात स्वीकारण्यात आलेल्या आहेत.

अर्थतज्ज्ञ होण्यासाठी सतत वाचन, लेखन, अध्यापन, संशोधन, प्रतिमान (Model) करून आकडेमोड करणे अशा सर्व गुणांची व चिकाटीची गरज असते. केवळ इतरांनी लिहिलेल्या व संशोधन केलेल्या तथ्यांवर किंवा सिद्धांतावर आपण भाषण करून स्वत:चे मत बनविणे व प्रसिद्धीसाठी चॅनेलचे कॅमेरे व पत्रकारांना सामोरे जाणे हा खऱ्या अर्थतज्ज्ञांचा गुण नसतो. प्रा. डॉ. सुरेश तेंडूलकर नेहमी प्रसिद्धीपासून दूर असत. त्यांना lobbing करणे पसंत नसे. खरे तर प्रचंड विद्वत्ता व विचारांची उंची असलेला माणूस खूप उशीराने पंतप्रधानांच्या सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नेमण्यात आला. याची आर्थिक समाजाला खंत वाटते.

प्रा. डॉ. सुरेश तेंडूलकर दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये विकासात्मक अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू होण्याअगोदर ते इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट, दिल्ली येथे प्राध्यापक होते. संख्याशास्त्र व अर्थशास्त्र यांची जोड घालून अनुभवजन्य (Empirical) संशोधन करण्याबाबत ते आग्रही होते. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ते १९८६ ते १९८९ या कालावधीत अर्थशास्त्र विभागप्रमुख होते. विद्यार्थी व शिक्षक यांचे नाते शिक्षकाच्या परिपक्वतेवर व संशोधन कृतीवर अवलंबून असते. या संदर्भात ते विद्यार्थीप्रिय होते व माझा विद्यार्थी माझ्यापेक्षाही सरस व्हावा अशी त्यांची अपेक्षा असे. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे तीन वर्ष संचालक होते. जागतिक स्तरावर दोन वर्षे अर्थतज्ज्ञ म्हणून काम करण्याची संधी त्यांना जागतिक बँकेच्या विकास संशोधन केन्द्रात मिळाली.

प्रा. सुरेश तेंडूलकरांचे गाजलेल्या ग्रंथ संपदेपैकी "Reintegration of India with world Economy," २००३ हे पुस्तक त्यांनी प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ टी.एन. श्रीनिवासन् यांच्या बरोबर लिहिले. सदरचे

पुस्तक लिहिण्याअगोदर Peterson Institute of International Economics, U.S.A. या अमेरिकेच्या Think tank, Non-profit, Private but Research संस्थेने त्यांना आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्ती (Fellowship) दिली होती. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रातील प्रवाह विशद करतांना भारताचा आंतरराष्ट्रीय वस्तूनिर्यात व्यापार १९१३ मध्ये जगाच्या एकूण निर्यातीपैकी ४.५% होता. तो घसरत जाऊन १९५० मध्ये २.५% झाला. पुढे स्वयंपूर्णता व बंदिस्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा अंगिकार केल्यामुळे १९८० मध्ये केवळ ०.५% झाला. ते केवळ तत्कालीन भारत सरकारच्या संरक्षण धोरणामुळे ही बाब त्यांनी आपल्या संशोधनातून सिद्ध केली.

जागतिकीकरणाचे परिणाम व भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेशी होणारे एकत्रीकरण व संलग्नीकरण व त्यातून निर्माण होणाऱ्या चांगल्या व वाईट परिणामांचा उलगडा त्यांनी आपल्या संशोधन लेखातून केला. भारताने १९९० पासून अंगिकारलेल्या धोरणाला त्यांचा पाठिंबा होताच, परंतु त्यांच्या मते भारताने यापुढे जाऊन प्रगत शिथिलीकरण केले तर आज वाढणाऱ्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा अधिक पटीने G. D. P. वाढले असते व पर्यायाने दारिद्य्र निर्मूलन, रोजगार व विकासाचा मार्ग सुकर झाला असता, असा आशावाद त्यांच्या आर्थिक विवेचनातून दिसून येतो. डॉ. सुरेश तेंडूलकर पक्के Academician होते. इंडियन इकॉनॉमिक रिव्ह्यू या अर्थशास्त्रीय संशोधनपर नामवंत जर्नल्सचे ते पाच वर्ष संपादक होते. त्यांचे १०० पेक्षा जास्त संशोधनपर लेख अमेरिकन जर्नल्स ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स, संख्या, इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली, जर्नल ऑफ कॉन्टेटेटिव्ह इकॉनॉमिक्स, अर्थविज्ञान, नियतकालिकातून प्रसिद्ध झालेले आहेत. चालू आर्थिक घडामोडीवर त्यांची लेखमाला दी इकॉनॉमिक टाइम्स, Financial Express, Hindustan Times, The Economist मध्ये प्रसिद्ध झालेली आहे. अनेक अर्थशास्त्रामधील संपादित पुस्तकात गरीबी, आर्थिक विषमता, नियोजन, औद्योगिकीकरण विषयावरील लेख प्रकरणे म्हणून समाविष्ट झालेले आहेत.

प्रा. डॉ. सुरेश तेंडूलकरांची अभ्यासवृत्ती व अर्थशास्त्रीय विचारांची शिदोरी इतकी भक्कम होती म्हणूनच त्यांना विविध संघटनांची व संस्थांची पदे भूषविता आली. त्यांनी दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत कार्यकारी संचालक म्हणून काम पाहिले. सदस्य म्हणून त्यांनी राष्ट्रीय नमुना पाहणी (National

Sample Survey), पाचवा वेतन आयोग, पहिला निर्गुंतवणूक आयोग इत्यादी संस्थांवर काम केले. त्यांची मते परखड व किंबहुना सत्ताधारी मंत्रीगटांना अडचणीची ठरणारी असली तरी ती ऐकून घेऊन त्यावर विचारविनिमय होऊन कार्यवाही करावयाला भाग पाडणारी ठरली. भारतातील पहिल्या राष्ट्रीय सांख्यिकीय आयोगाचे अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या आर्थिक सल्लागार समूहाचे ते काही काळ अध्यक्ष होते व सदस्य म्हणून त्यांनी पाच वर्ष काम केले. रिझर्व्ह बँकेच्या संचालक बोर्डात ते बरीच वर्ष सदस्य म्हणून त्यांनी आपली कामगिरी पार पाडली.

भारतील दारिद्र्याचे मोजमाप करण्याचा पाया महाराष्ट्रातील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिक्स या संस्थेतील डॉ. वि. म. दांडेकर आणि डॉ. नीलकंठ रथ यांनी घातला. त्यांनी उष्मांक हा निकष गृहीत धरून भारतातील दारिद्र्याची मोजदाद केली. तदनंतर नियोजन आयोग, राष्ट्रीय नमुना पाहणी, राष्ट्रीय प्रगत अर्थशास्त्रीय संशोधन परिषद (N.C.A.E.R.) इत्यादी अभ्यास गटांनी दरडोई मासिक खर्च व इतर निकष वापरून दारिद्र्याची गणना केली. आर्थिक सुधारणांचे यश सांगताना सरकारी माध्यमे (नियोजन आयोग व लोकसभा) भारतातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होत जाऊन २००४-०५ या वर्षी २७.५% झाले असल्याचे सांगत असताना, प्रा. डॉ. सुरेश तेंडूलकरांनी त्यास आक्षेप नोंदवून नव्याने विस्तारित निकष वापरून दारिद्र्याची मोजमाप व्हावे अशी रास्त मागणी केली.

पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यांच्या मागणीला दुजोरा देत डॉ. सुरेश तेंडूलकर यांचे अध्यक्षतेखाली दारिद्र्याचे मोजमाप पद्धती अभ्यासगटाची स्थापना केली. कालानुरूप दारिद्र्य मोजणीचे निकष विस्तारून त्यांनी खाद्यान्न, शिक्षण, आरोग्य, वीज, कपडे व पादत्राणे या सर्वांवरील दरडोई मासिक खर्च निकष वापरून मोजमाप केले असता भारतात २००९ मध्ये ३७.५% जनता दारिद्र्य रेषेखाली असल्याचे निदर्शनास आणून दिले. आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचे यश सामाजिक सुधारणा व न्याय याबाबत एकूणच मर्यादित असल्याचे त्यांनी वेळोवेळी सरकारच्या लक्षात आणून दिले. शहरी दारिद्र्य १९९१ नंतर प्रचंड वेगाने वाढत असल्याची बाब त्यांनी आपल्या संशोधनातून सिद्ध केली.

अन्न सुरक्षितता विधेयक मंजूर झाल्यास दरवर्षी रू. ४५,००० कोटी खर्च अपेक्षित असतांना प्रा.डॉ. तेंडूलकरांच्या दारिद्र्य मोजणीमुळे त्यात भर पडून वार्षिक रु.६५,००० कोटी खर्च करावे लागतील. भुकेल्या पोटांसाठी पोटभर अन्न देण्याची तरतूद सरकारने केली तर डॉ. तेंडूलकरांच्या संशोधनाला यश आले

असे म्हणता येईल व ही बाब त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. डॉ. सुरेश तेंडूलकर हे व्यक्तिमत्त्व अतिशय साधे, मृदू स्वभावाचे, स्वतःवर विश्वास ठेवणारे होते. अर्थशास्त्रात मोलाची भर घालून विकासात्मक अर्थशास्त्र (Developmental Economics) शाखा समृद्ध करतांना ती कल्याणकारी अर्थशास्त्राच्या जवळ नेण्याचा त्यांचा प्रयत्न आदरणीय आहेच, परंतु अवर्णनीय देखील ठरला. अलिकडे काही स्वतःला अर्थतज्ज्ञ म्हणवून घेणारे इतरांच्या संशोधनावर व अभ्यासावर आणि सरकारी आकडेवारीवर पोटतिडकीने भाष्य करतात व मला खूपच अर्थशास्त्राचे गाढे ज्ञान आहे व मीच धोरण कर्ता (Policy Maker) व्हावा अशा अविर्भावात गावभर भाषणे देऊन मिडीयाला सामोरे जातात. या ग्लॅमरपासून डॉ. सुरेश तेंडूलकर खूपच दूर होते कारण ते खरे अर्थतज्ज्ञ होते.

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद: ३५वे राष्ट्रीय अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन दि.७,८ व ९ नोव्हेंबर २०११ रोजी नांदेड येथील नांदेड एज्युकेशन सोसायटीचे पीपल्स कॉलेज या ठिकाणी आयोजित केले आहे. या अधिवेशनात (१) जगदीश भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान, (२)भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल, (३) ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना या विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन केले आहे. आयोजकांकडून आपणास निमंत्रण पत्रिका येणारच आहेत. सभासदांनी परिषदेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

विकास सुकाळे
(स्थानिक कार्यवाह)

अनिल सूर्यवंशी
(कार्यवाह खजिनदार-म.अ.प.)

# महाराष्ट्रातील व्यापारी बँकाच्या थकीत कर्जाचा तुलनात्मक अभ्यास

**गजानन भाकरे, व्ही.एम.चव्हाण,** कोल्हापूर,

भारती विद्यापीठ

भारतात बँकांनी राष्ट्रीयीकरणाच्या पर्वातून जात आर्थिक उदारीकरण जागतिकीकरण माहिती तंत्रज्ञानाच्या पर्वात प्रवेश केला. सन १९९० नंतर आर्थिक सुधारणांचे रणशिंग वाजल्यानंतर भारतीय बँकिंग क्षेत्राची दिशा आणि दशा बदलून गेले आहेत. राष्ट्रीयीकरणानंतर बँकांचे जाळे भारतभर पसरण्यास सुरुवात झाली. खाजगी बँकांची स्थापना आणि मर्यादित व्यवसायासाठी विदेशी बँकांना दिलेली परवानगी यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील स्पर्धा अधिकाधिक तीव्र होत आहे.

बँकिंग व्यवसायाने मुक्त आर्थिक धोरण स्विकारले परंतु अनेक कडक नियंत्रणे लागू केलेत. पूर्वी बँकेची स्थिती मिळवलेल्या ठेवी, कमावलेला नफा या तत्त्वावर आधारीत होती परंतू सद्यस्थितीत ती बँकेने केलेल्या कर्ज वाटपावरुन व थकबाकीवरुन ठरविली जात आहे.

अर्थ मंत्रालय भारत सरकार यांनी १४ ऑगस्ट १९९१ रोजी उच्चस्तरीय समिती रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली. बँकिंग क्षेत्रातील उचित सुधारणांची शिफारस समितीने या अहवालात केली आहे. तसेच एन.पी.ए. संदर्भात एकुण ४८ शिफारशी केल्या आहेत.

बँकिंग क्षेत्र जागतिक स्तरावर समृध्द करण्यासाठी अनेक नवीन संकल्पना अस्तित्वात येत आहेत. त्यात नरसिंहम समितीने शिफारस केलेली महत्त्वाची संकल्पना म्हणजे एन.पी.ए. (उत्पन्न क्षमता नसलेली जिंदगी/ थकीत कर्ज) या संकल्पनेने बँकिंग क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणला आहे. बँकिंग व्यवसाय करणे किती कठीण आहे याची जाणीव या संकल्पनेने करुन दिली. एन.पी.ए. ची मार्गदर्शक तत्त्वे बँकांनी दि.३१ मार्च १९९३ पासून अंमलात आणण्यास सुरवात केली.

आर्थिक पत्रकात पारदर्शकता आणण्यासाठी एन.पी.ए. ची संकल्पना अंमलात आणली गेली. भारतीय बँकांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जा सुधारण्यासाठी ही संकल्पना फारच महत्त्वाची व आवश्यक मानली गेली.

एन.पी.ए. संकल्पनेचे निकष प्रामुख्याने तीन प्रकारात विभागले आहेत.

१. उत्पन्न संकल्पना/ मान्य संकल्पना (Income Recognition)

२. संपत्तीचे/ कर्जाचे वर्गीकरण (Assets Classification)

३. तरतुदी (Provisioning)

**१. उत्पन्न संकल्पना किंवा मान्य संकल्पना:**

जे उत्पन्न प्रत्यक्षात प्राप्त होते त्याला मान्य उत्पन्न म्हणतात. सामान्यत: बँका संपूर्ण कर्जावर व्याज आकारणी करुन ते व्याज उत्पन्नात अधिक करतात, म्हणजे प्रत्यक्षात न मिळालेले व्याज नफ्यात अधिक केल्याने नफ्याचे प्रमाण वाढलेले दिसते असे होवू नये म्हणून एन.पी.ए. चे निकष लागू करण्यात आले. जी अनुत्पादित कर्जे आहेत, ज्या कर्जाची वसुली होत नाही अशा कर्ज व्यवहाराचे मुल्यमापन हे कर्जाचे हप्ते व व्याजावर आधारित केले जाते. त्यानुसार उत्पन्न क्षमता असलेली कर्जे व उत्पन्न क्षमता नसलेली कर्जे यांचा विचार करणे गरजेचे ठरते.

**अ) उत्पन्न क्षमता असलेली कर्जे :**

ज्या कर्ज खात्याची वसुली नियमित आहे, कर्ज खात्यावर थकीत बाकी दाखवली नसेल अशा कर्ज खात्याला उत्पन्न क्षमता असलेले कर्ज म्हणतात.

**ब) उत्पन्न क्षमता नसलेली कर्जे :**

ज्या खात्याची वसुली नियमित होत नाही, अथवा खात्यावर व्यवहार होत नाहीत, ज्या खात्यावरील मागील ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधीचे व्याज किंवा मुद्दल वसुल झाले नसल्यास अशा खात्याला एन.पी.ए. कर्ज खाते म्हटले जाते. म्हणजेच मान्य उत्पन्नाची संकल्पना प्रत्यक्ष वसुलीवर ठरवली जाते, म्हणजेच पी.ए. म्हणजेच ''पैसा आया'' आणि एन.पी.ए. म्हणजेच ''पैसा नही आया'' असा ढोबळ मानाने अर्थ ठरविला जातो.

**२) संपत्तीचे वर्गीकरण :**

नरसिंहम् समितीने शिफारस केलेल्या पद्धतीनुसार कर्ज खात्याची वसुली कशी केली जाते हे खालील प्रमाणे दाखवता येईल.

**उत्तम कर्जे (Standard Assets) :**

ज्या कर्ज खात्याला एन.पी.ए. तरतुदी लागू होत नाहीत, त्या कर्ज खात्याला उत्तम कर्जे म्हणतात.

**अंशतः उत्पादित/ दुय्यम कर्जे (Sub-standard Assets)**

जी कर्जे एन.पी.ए. होऊन १८ महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधी झाला आहे अशा कर्जाला दुय्यम कर्जे म्हणतात. बिगर शेती, मुदत कर्जे, खेळत्या भांडवलासाठी दिलेली कर्जे यांचा यात समावेश होतो. (मार्च २००७ पासून दुय्यम कर्जाचा कालावधी १८ महिन्यांऐवजी १२ महिने करण्यात आला आहे.)

**संशयित कर्जे (Doubtful Assets) :**

जी कर्जे एन.पी.ए. होऊन १८ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी झाला आहे, असे कर्ज खाते संशयीत समजले जाते.

**बुडीत कर्जे (Loss Assets) :**

कर्ज खाते किंवा कर्जाची रक्कम व त्यावरील व्याज, बँक ऑडीटर, आर.बी.आय. यांनी बुडीत म्हणून जाहीर केलेली असतात अशी कर्जे बुडीत कर्जे समजली जातात. तसेच ज्या कर्जासाठी तारण नसते किंवा तारणाचे मुल्य कर्जाच्या रक्कमेच्या १० टक्के पेक्षा कमी आहे अशा कर्जाला बुडीत कर्जे म्हणतात.

**३) तरतुदी (Provision Norms):**

नरसिंहम समितीने शिफारस केल्याप्रमाणे थकीत कर्ज खात्याची वर्गवारी झाल्यानंतर थकीत कालावधीनुसार आवश्यक ती व्याजाची तरतुद कर्जखात्यावर बँकेला स्वतःच्या नफ्यातून करावी लागते. बँकेला एखादेवेळी तोटा झाला तरी देखील बँकेला तशी तरतुद करावी लागते. अशा तरतुदी किती प्रमाणात करावयाच्या हे कर्जाच्या वर्गवारीनुसार ठरवले आहे.

| मालमत्ता वर्गवारी | व्याजाचे तरतुदीचे प्रमाण |
|---|---|
| १. उत्तम कर्जासाठी | कमीत कमी ०.२५ टक्के उत्तम कर्जासाठी |
| २. दुय्यम कर्जासाठी | खात्यावरील एकूण येणे बाकीच्या १० टक्के |
| ३. संशयीत कर्जासाठी | १.खात्यावरील एकूण येणे बाकी पैकी असुरक्षित रक्कमेच्या १०० टक्के<br>२.खात्यावरील एकूण येणेबाकी रक्कमेपैकी सुरक्षित रक्कमेच्या<br>अ) पहिल्या १ वर्षापर्यंत - २० टक्के<br>ब) १ ते २ वर्षापर्यंत - ३० टक्के<br>क) ३ वर्षापुढे - ५० टक्के |
| ४. बुडीत कर्जासाठी | खात्यावरील मुद्दलापैकी एकूण येणे बाकीच्या किंवा असुरक्षित रक्कमेच्या १०० टक्के |

अनुत्पादित कर्जामुळे बँकिंग व्यवसायात निर्माण होणाऱ्या परिणामांचा अभ्यासासाठी खाजगी व सहकारी बँका विचारात घेऊन थकीत कर्जाचा तुलनात्मक अभ्यासासाठी खालील बँका निवडण्यात आल्या.

१. दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड, सातारा

२. दि गणेश बँक ऑफ कुरुंदवाड लिमिटेड, कोल्हापूर -

३. दि रत्नाकर बँक लिमिटेड, कोल्हापूर

४. दि इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

५. दि कराड अर्बन को. ऑप बँक लि., कराड

६. दि जनता सहकारी बँक लि, पुणे

देशामध्ये एकुण १३० बँका असून त्यापैकी ५७ बँका खाजगी व ७३ बँका सहकारी क्षेत्रातील आहेत. महाराष्ट्राचा विचार केला असता एकुण बँकांची संख्या ५७ असून त्यामध्ये खाजगी बँका २७ व सहकारी बँका ३० आहेत. यातून प्रत्येक क्षेत्रातील ३ बँकांची निवड करण्यात आली.

■ **संशोधनाचा उद्देश :**

१. खाजगी व सहकारी बँकींग क्षेत्रातील निवड केलेल्या बँकांचा नफा व कर्जखात्यांच्या वर्गवारीचा अभ्यास करणे.

२. खाजगी व सहकारी बँकाच्या थकीत कर्जाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. थकीत कर्जाची जिंदगीची योग्य प्रकारे वर्गवारी करणे व त्या प्रमाणात केलेल्या तरतुदीचा अभ्यास करणे.

■ **एन.पी.ए. होण्याची कारणे :**

कर्जखात्याची वसुली झाली नाही की, ते खाते एन.पी.ए. होते. तसेच खाते एन.पी.ए होण्याची इतरही बरीच कारणे आहेत -

१. बहिर्गत घटक २) कर्जदारांसंबंधीत घटक ३) अंतर्गत घटक

**१) बहिर्गत घटक :**

या घटकावर कर्जदार किंवा बँक नियंत्रण ठेवू शकत नसल्याने त्यांचे परिणाम संपूर्ण बँकिंग क्षेत्रावर दुरवर होतात.

**अ) मंदी** - मंदीच्या लाटेमुळे विक्री कमी प्रमाणात होते. मालाला योग्य भाव मिळत नसल्याने वसुलीवर परिणाम होतो. त्यामुळे कर्जखाते एन.पी.ए. त जाऊ शकते.

**ब) शासकिय/ सामाजिक योजना** - काही योजना शासनाच्या अंगीकृत असल्याने बँकांना स्विकाराव्या लागतात. परंतु अशा योजना पासून वसुली मोठ्या प्रमाणावर थकते.

**क) राजकीय जाहीर घोषणा** - अनेक वेळा राजकीय प्रतिनिधींनी कर्जाची माफी किंवा व्याज माफी अशा योजना केलेल्या असतात, त्यामुळे देखील कर्ज खात्यावर वसुली होत नाही.

**ड) बाजारपेठेवर बंदी आल्यामुळे** - सरकार काही वेळा एखाद्या व्यवसायावर बंदी घालते किंवा काही व्यवसाय बेकायदेशीर ठरवले जातात त्यामुळे कर्ज थकीत होतात.

**इ) निसर्गाचा विकोप** - भूकंप, दुष्काळ, रोगराई इत्यादींमुळेही वसुलीस अडथळा निर्माण होतो.

**२) कर्जदारासंबंधी घटक :**

काही वेळा कर्जदाराने त्याचा व्यवसाय निवडताना केलेल्या चुकीमुळे देखील थकबाकी निर्माण

होते.

**अ) जुनी बाहेरील देणी व अपुरा स्वनिधी** - काही कर्जदारांची असलेली अवाजवी देणी व देण्याबाबतीतील केलेल्या अपुऱ्या तरतुदी यामुळे कर्जखाते एन.पी.ए. होऊ शकते.

**ब) आवश्यकतेपेक्षा कमी/ अधिक कच्च्या मालाचा साठा बाळगणे** - कर्जदार कच्च्या मालाच्या साठ्याविषयी अपुरे ज्ञान असल्याने थकबाकी निर्माण होते.

**क) बाहेरील येणे, वसुलीत दिरंगाई/अव्यवस्थापन** - कर्जदाराची उधारी, विक्री व वसुलीस दिरंगाई या दोन कारणांमुळे थकीत कर्जात वाढच होते.

**ड) कच्च्या मालाचा अपुरा व आवश्यकतेप्रमाणे पुरवठा न होणे** - या परिस्थितीमुळे कर्जदार अडचणीत येतो यात कर्जदाराची काहीही चुक नसते.

**३) अंतर्गत घटक -**

**क) चुकीचे/ अयोग्य कर्जदार** - एखाद्या कर्जदाराने पुर्वी घेतलेल्या कर्जाचीही माहिती न घेता पुढील कर्ज देणे.

**ख) जाणुन-बुजून थकबाकीदार** - कर्जाची परतफेड करण्यामध्ये टाळाटाळ करणे, कर्जदार यांच्यामुळे खाते एन.पी.ए. होऊ शकते.

**ग) अपूर्ण व्यवस्थापन** - कर्जदाराला कर्ज देताना योग्य व कायदेशीर आवश्यक कागदपत्रे न घेणे तसेच ठेवलेल्या तारणाबद्दल योग्य माहिती नसणे हे एन.पी.ए. होण्याचे कारण होवू शकते.

**घ) आर्थिक बेशिस्त/ निधीचा अयोग्य वापर** - कर्ज ज्या कारणांसाठी घेतलेले असते त्या कारणांकरिता न वापरता दुसऱ्याच कारणासाठी त्याचा वापर केला जातो.

**च) चुकीची/ अपुरी माहिती देणे अथवा माहिती सादर करण्यास टाळाटाळ करणे** - दुसऱ्या बँकेत असलेले कर्जासंबंधी कर्जदार माहिती देण्यास टाळाटाळ करतात तसेच काही वेळा मालकी हक्कांच्या दस्तऐवजाबद्दलही योग्य व पुरेशी माहिती दिली जात नाही.

**छ) प्रकल्प तयार होताना उशीर यामुळे किंमतवाढ/ प्रकल्प अपुरा राहणे इत्यादी** - कर्जदाराच्या नियोजनवृत्तीच्या अभावामुळे खाते थकबाकीत जावू शकते.

**ज) कर्जदारांचे आपापसातील/ अंतर्गत वाद** - एकापेक्षा जास्त कर्जदार असतील, कर्जे सयुक्तिक असल्यास कर्ज परतफेडीच्यावेळी होणाऱ्या मतभेदामुळे कर्जाची वसुली होवू शकत नाही.

**झ) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव/ दुर्लक्ष** - काही कर्जदार व्यवसाय पारंपारिक पद्धतीनेच चालवतात. यामुळे त्यांच्यात असलेला दूरदृष्टीचा अभाव, नवीन तंत्रज्ञानाविषयी असलेली अपुरी माहिती इत्यादीमुळे देखील व्यवसायाच्या फायद्यावर परिणाम होऊन बँकेचे खाते थकबाकीत जाऊ शकते.

**त) संशोधन आणि विकास यांचा अभाव/ दुर्लक्ष** - व्यवसायात अत्याधुनिक नवनविन संशोधनाचा वापर न करणे, यामुळे देखील नफ्यात घट होऊन बँकेतील कर्जखात्यावरही परिणाम होऊ शकतो.

**थ) व्यवसायाच्या जागेची अयोग्य निवड** - व्यवसायाच्या जागेच्या चुकीच्या निवडीमुळे देखील व्यवसायावर परिणाम होऊ शकतो.

एन.पी.ए. हा बँकेच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक असल्याने त्याचे परिणाम जसे कर्जदारावर होतात तसेच ते बँकेवरही होतात पर्यायाने देशाच्या आर्थिक परिस्थितीवरही होतात.

■ **एन.पी.ए. मुळे बँकेच्या परिस्थितीवर होणारे परिणाम :**

१. **उत्पादनात घट** - कर्जखात्यावरील व्याजाची किंवा मुद्दलाची वसुली न झाल्यास बँकेच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होतो.

२. **गुणवत्तेत घट** - एन.पी.ए. हा बँकेच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम करणारा असल्याने बँकेच्या गुणवत्तेत घट होऊन बँकेची वर्गवारी कमी होते.

३. **ठेवी वाढीस घट** - एन.पी.ए. मुळे बँकेच्या ठेवी वाढीस खीळ बसते.

४. **उत्पादन क्षमतेवर** - उत्पादन क्षमतेवर मोठा परिणाम होत असल्याने बँकेच्या प्रगतीवर परिणाम होतो. पर्यायाने बँकेची वर्गवारी खाली येऊन जनमानसात बँकेची पत कमी होते.

५. **भांडवलाची कमतरता** - एन.पी.ए. मुळे उत्पादनात घट झाल्यामुळे भांडवलाची, निधीची मोठ्या प्रमाणावर कमतरता जाणवते. त्यामुळे बँकेच्या नवीन योजना राबवताना त्यांचा प्रत्यक्ष परिणाम होतो. पर्यायाने भांडवल उभारणी खर्चातही वाढ होते.

६. **शाखा** - कार्यक्षेत्र विस्तारावर परिणाम होतो - भांडवलाच्या कमतरतेमुळे शाखा वाढवण्यावर बंदी येते. त्यामुळे व्यवसायात घट होते.

७. **व्यवस्थापन खर्चात वाढ** - एन.पी.ए. मुळे वसुलीसाठी म्हणुन व्यवस्थापनास जादा खर्च करावा लागतो.

८. **एन.पी.ए.** वाढीमुळे बँकेच्या व्याजदरावर मोठा परिणाम होतो.

९. एन.पी.ए. वाढला तर बँकेची वर्गवारी कमी होते. आर.बी.आय. कडून बँक आजारी घोषीत केली जाते.

## ■ संशोधनाचा निष्कर्ष :

१) वरील अभ्यासाअंती एन.पी.ए. वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे कर्जदाराची कर्ज भरण्याबद्दलची उदासीनता, माहितीचा अभाव तसेच बँक व्यवस्थापनाचे नियोजनशून्य धोरण इत्यादी असू शकते.

२) अभ्यासाअंती असे निदर्शनास आले की, खाजगी क्षेत्रातील बँकेचा एन.पी.ए. चा दर कमी होता. कारण त्यांच्याकडे असलेली उत्तम कर्जे ही होय. सहकार क्षेत्रातील सर्वात कमी उत्तम कर्जे असलेली बँक जनता सहकारी बँक लि. पुणे होय.

३) दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे आय.डी.बी.आय. बँकेत विलीनीकरण होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे युनायटेड वेस्टर्न बँकेतील एन.पी.ए. चे प्रमाण ३% पेक्षा जास्त वाढल्याने विलीनीकरणाचा निर्णय घेतला गेला.

४) आर.बी.आय. च्या नियमाप्रमाणे रु.३०० कोटी पेक्षा जास्त भागभांडवलाची पूर्तता न केल्याने तसेच सतत ३ वर्षे एन.पी.ए. चा दर सर्वात जास्त राखल्याने खाजगी क्षेत्रातील दोन बँका - गणेश बँक ऑफ कुरुंदवाड लि. व युनायटेड वेस्टर्न बँक लि. यांचे विलीनीकरण अनुक्रमे फेडरल बँक व आय.डी.बी.आय. बँकेत करण्यात आले.

५) आर.बी.आय. च्या परिपत्रकानुसार (NO.D.S.B.- P.P.B. C - 9/ 11/ 01/ 05/2002-2003) ज्या बँका आपला एन.पी.ए. चा दर १० टक्के ते १५ टक्के दरम्यान आणण्यास अपयशी ठरल्या त्यांना आजारी बँका म्हणून घोषीत करण्यात आले. त्यामध्ये सहकार क्षेत्रातील जनता सहकारी बँक, पुणे ही बँक आजारी म्हणून घोषीत करण्यात आली.

६) अभ्यासाअंती असे निदर्शनास आले की, सहकारी क्षेत्रातील बँकेमध्ये असलेले नफ्याचे प्रमाण/ठेवीचे प्रमाण हे बँकेच्या एन.पी.ए. च्या प्रमाणात समाधानकारक नाही.

७) सर्वसाधारण असे एकूण एन.पी.ए. चे प्रमाण हे ३ टक्के पेक्षा अधिक असू नये. बँकेच्या तुलनात्मक अभ्यासावरुन असे दिसून येते की, खाजगी क्षेत्रातील तसेच सहकारी क्षेत्रातील बँकेचे एन.पी.ए. चे प्रमाण हे सर्वसाधारण नव्हते.

८) तुलनात्मक अभ्यासात असे दिसून आले की, खाजगी क्षेत्रातील बँकेतील गुणवत्तेतील घट ९.०४ टक्के इतकी दिसून आली तर सहकार क्षेत्रातील बँकेतील याचे प्रमाण १२.८५ टक्के इतके दिसून येते.

यावरुन असे लक्षात येते की, सहकार क्षेत्रातील बँका आपली चमक दाखवू शकल्या नाहीत.

९) संचालकांचे कर्ज वाटपाबद्दलचे उदार धोरण तसेच कर्ज वसूलीचे अत्यल्प प्रमाण यामुळे बहुतांशी बँका बुडीत झाल्या आहेत.

१०) खाजगी क्षेत्रातील बँकांची वसुली व्यवस्था सक्षम असल्यामुळे एन.पी.ए. चे प्रमाण थोडे घटले आहे.

११) दोन्ही क्षेत्रातील बँकानी नरसिंहम समितीच्या अहवालाप्रमाणे सूचना सन २००१ पासून अंमलात आणल्यामुळे दोन्ही क्षेत्रातील बँकाचे एन.पी.ए. चे प्रमाण थोड्या प्रमाणात कमी झाले आहे.

१२) सद्यस्थितीत बँका आपले स्थैर्य टिकवण्यासाठी ठेवीचा व कर्जाचा वेग कमी झाला तरी चालेल परंतु थकबाकीचा वेग वाढता कामा नये असा उद्देश ठेवून वसुलीसाठी विशेष प्रयत्न करीत आहेत.

■ **एन.पी.ए. कमी करण्यासाठी उपाययोजना :**

१) रिकव्हरी पॉलिसीचे धोरण ठरवत असताना सर्वप्रथम बँकांनी आपली थकीत कर्जे व आपले भांडवल यांची योग्य ती सांगड घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच पॉलिसी ठरवत असताना बँकांनी कर्जदारांचाही विचार करणे क्रमप्राप्त असते. कारण कर्जदाराची कर्ज फेडण्याइतपत ऐपत असणारी मालमत्ता आहे का? याचीही पुरेशी दखल घेणे जरुरीचे आहे.

२) एखाद्या कर्जदाराला कर्ज देताना सर्व कागदपत्रे व्यवस्थित तपासून द्यावीत. उदा.गृहकर्ज देताना रक्कम टॅक्स परतावा, मालमत्तेवर असलेला बोजा, जमीन एन.ए. आहे किंवा कसे इत्यादी कागदपत्रे पाहणे हिताचे ठरते.

३) कर्जदारांना कर्ज देण्यासाठी जो अनावश्यक वेळ लागतो तो कमी करण्यासाठी बँकांनी वेगळी कर्जसमिती नेमावी. त्यामध्ये शाखाधिकाऱ्यांचा समावेश करुन त्यांना जास्तीत जास्त ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज रक्कम मंजूर करण्याचे अधिकार सर्वानुमते द्यावेत.

४) अलिकडच्या काळात कर्जदार व बँकेमध्ये काही अंशी दुरावा निर्माण होत आहे. तो दुरावा कमी केल्यास बँकांची वसुली मोठ्या प्रमाणावर वाढण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे कर्जदारांच्या काही अडीअडचणी असतील तर त्या संबंधित विभागाला कळवून त्यावर लवकर तोडगा काढणे बँक व कर्जदारांच्या हिताचेच ठरते.

५) बँक शाखाधिकारी यांना ठराविक मर्यादेपर्यंत ओ.टी.एस. चे आदेश दिल्यास एन.पी.ए. चे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

६) कर्ज वसुलीसाठी प्रत्येक बँकांनी शाखेमधीलच कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देऊन तयार करावे.

अशा प्रकारे बँकानी एन.पी.ए. चे प्रमाण कमी करण्यासाठी वरील मुद्यांचा विचार केल्यास एन.पी.ए. चे प्रमाण निश्चितच घट होण्यास मदत होईल.

बँकांचे एन.पी.ए. (थकीत कर्जे) सर्वसामान्यतः प्रमाण वाढण्याचे प्रमुख कारण वसुली कमी असणे. कर्जदार ज्या कारणासाठी कर्ज घेतो त्या कारणासाठी न वापरता इतरत्र खर्च करतो, तसेच राजकीय हस्तक्षेप, बँकिंग कायद्याविषयी उदासीनता, योग्य व्यवस्थापनाचा अभाव, नैसर्गिक आपत्ती यांच्यामुळे बँकांचे एन.पी.ए. प्रमाण वाढत आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँकाना करावी लागणारी थकीत कर्जा संबंधीची तरतुद त्यामुळे नफा वाढीवर परिणाम होवून बँका तोट्यात गेल्या आहेत; हे प्रमाण सहकारी बँकेत खाजगी बँकेपेक्षा जास्त आहे. बँक व्यवसायामध्ये उत्तम कर्जाचा भाग महत्वाचा असतो. ज्या बँकेचे उत्तम कर्जाचे प्रमाण जास्त त्या बँकेचे थकीत कर्जाचे प्रमाण कमी असते. रिझर्व्ह बँकेचे नियमानुसार थकीत कर्जाचे प्रमाण (एन.पी.ए टक्केवारी) ३ टक्के पेक्षा जास्त नसावी, मात्र अभ्यासाचे कालावधीत सन २००२ पर्यंत दोन्ही (सहकारी व खाजगी) क्षेत्रामध्ये थकीत कर्जाचे प्रमाण ३ टक्के पेक्षा जास्त दिसून आले. सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये एन.पी.ए. चे (थकीत कर्ज) प्रमाण जास्त आहे याचे महत्वाचे कारण म्हणजे जरी सहकारी क्षेत्रावर रिझर्व्ह बँक, राज्य सहकार विभाग, नाबार्ड इत्यादींचे नियंत्रण असले तरीसुद्धा कायद्याच्या अंमलबजावणीत एकसूत्रता नसल्यामुळे तसेच काही वेळा असलेल्या राजकिय हस्तक्षेपामुळे सहकारी बँका अडचणीत येवू लागलेल्या आहेत. याऊलट खाजगी बँकींग क्षेत्रावर रिझर्व्ह बँकेचे पुर्णतः नियंत्रण असल्यामुळे त्यांचे थकीत कर्जाचे प्रमाण कमी आहे.

रिझर्व्ह बँकेचे पूर्णतः नियंत्रण, कायद्याची योग्य अंमलबजावणी, वसुलीचे नियोजन इत्यादी बाबीची योग्य पूर्तता केल्यास सहकारी बँकिंग क्षेत्रास सुधारणेचा गुणात्मक व संख्यात्मक आलेख उंचावण्यास, व्यवसायात पारदर्शकता आणण्यास नक्कीच मदत होईल.

# मुद्रा परिमाण सिद्धांत आणि किन्सचे पुनर्निर्माण

**सुषमा देशमुख**, अमरावती,
सहयोगी प्राध्यापक, महिला महाविद्यालय

*या शोध निबंधात मुद्रा परिमाण सिद्धांत आणि २००८-०९ मध्ये किन्सच्या विचारांचे पुनर्निर्माण या बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.*

■ **मुद्रा परिमाण सिद्धांत उगम व विकास:**

कोपरनिकस यांना मुद्रा परिमाण सिद्धांताचा जनक म्हणता येईल. धातूमुद्रेमध्ये चांदीच्या आणि सोन्याच्या आयातीमुळे इतर वस्तुंच्या किंमती वाढतात हे स्कूल ऑफ सॅलमॅनका, जिन बोडीन आणि विविध अर्थतज्ज्ञांच्या लक्षात आले. मिलच्या मते विनिमयाच्या समिकरणानुसार मूद्रेचे मूल्य व्यवहार हे मूद्रेच्या पुरवठ्याशी संबंधित असतात. एकोणिसाव्या व विसाव्या शतकात सिमॉन न्युकाँब, अल्फ्रेड डे फोविल, आयरविंग फिशर आणि ल्युडविंग वोन मिसेस यांनी मूद्रा परिमाण सिद्धांत विकसित केला. कार्ल मार्क्स ने त्याचे मत विसाव्या शतकात विशद केले. किन्सच्या अगोदर मिल्टन फ्रिडमॅन यांनी सिद्धांत विकसित केला.

■ **विनिमय समीकरण (Exchange Equation):**

आधुनिक रचनेमध्ये परिमाणाचा सिद्धांत हा खालील व्याख्यानुरूप संबंधावर आधारित आहे.

$$M.V_T = \sum_i (p_i \cdot q_i) = p_T q$$

जेथे $M$ = आर्थिक वर्षातील कालावधीमध्ये व्यवहारात असलेली एकूण मुद्रा

$V_T$ = मुद्रेचा व्यावहारिक प्रयोग

यामध्ये एकक मूद्रा खर्च केल्यानंतर एकंदर व्यवहारातील सरासरी वारंवारिता लक्षात घेतली आहे. तसेच आर्थिक संस्थेची उपलब्धता, आर्थिक घटक (जनता त्यांची मूद्रेची उलाढाल किती लवकर करेल याबाबतची निवड) या बाबी दर्शविते.

$p_i$ आणि $q_i$ = अनुक्रमे किंमत आणि परिमाणाचे i-th व्यवहार

$p$ = किंमतीच्या i-th व्यवहाराचा स्तंभ आलेख

$T$ = बदलाचे घटक

$q$ = परिमाणाच्या i-th व्यवहाराचा स्तंभ आलेख

विनिमयाचे समीकरण सर्वसाधारणपणे अर्थशास्त्र प्रवाहात पुढीलप्रमाणे मान्य करण्यात आले.

$M.V_T = p_T.T$

जेथे $p_T$ = विशिष्ट कालावधीतील व्यवहारासंबंधी किंमत पातळी

$T$ = सरासरी व्यवहाराच्या वास्तव मूल्याचा निर्देशांक

समीकरण एक मध्ये सर्व व्यवहाराच्या संबंधित सामग्री उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत होत्या. राष्ट्रीय उत्पन्न व उत्पादन खात्याच्या विकासामुळे एकूण व्यवहारांऐवजी राष्ट्रीय उत्पन्नाला महत्त्व प्राप्त झाले, त्यामुळे अर्थशास्त्रज्ञांनी खालील समीकरण मांडले.

$M.V = P.Q$

जेथे, $V$ = अंतिम खर्चातील मूद्रेचा प्रवेग

$Q$ = अंतिम खर्चातील वास्तव मूल्याचा निर्देशांक

उदा.: सार्वजनिक खात्यातील चलन व ठेव M दर्शविते. वास्तव उत्पादन Q दर्शविते. किंमत पातळी P दर्शविते.

$P.Q$ = अल्प उत्पादन मूल्य

एका व्यावहारिक समीकरणात चालू किंमतीमधील निव्वळ राष्ट्रीय उत्पादन व मूद्रेचा साठा याच्या प्रमाणात प्रवेग मोजला जातो.

विनिमयाच्या समिकरणामध्ये समानता असल्याने सिद्धांतात विरोधाभास नाही. समिकरणातील चारही घटकांचा संबंध एकमेकाशी गृहीत धरावा लागतो. हे प्रत्येक घटक एकमेकांवर अवलंबून असतात. मूद्रेच्या पुरवठ्यात बदल झाल्यास मूद्रेचे मूल्य बदलते. त्याचा P व Q वर किंवा P.Q वर परिणाम होत नाही. मुद्रा परिमाण सिद्धांतात M व P वर परिणाम होतो.

■ **परिमाण सिद्धांताचे प्राथमिक स्वरूप:**

मूद्रेच्या वाढीचा स्फितीवर होणाऱ्या परिणामाचा, परिमाण सिद्धांताचे प्राथमिक स्वरूप दर्शविण्यासाठी विनिमय समिकरणाचा वापर करता येतो.

$$P = \frac{M.V}{Q}$$

जर V आणि Q स्थिर असेल तर

$$\frac{dP}{P} = \frac{dM}{M}$$

$$\therefore \quad \frac{dP/P}{dt} = \frac{dM/M}{dt}$$

जेथे t म्हणजे वेळ

प्रवेग (V) आणि मुद्रा परिमाण (Q) स्थिर असेल तर स्फितीचा दर मुद्रेच्या पुरवठ्याबरोबर असतो. मुद्रास्फिती दर हा मुद्रावृद्धी दराचे (function) कार्य आहे.

V व q मध्ये बदल झाल्यास,

$$\frac{dP/P}{dt} = \frac{dM/M}{dt} + \frac{dV/V}{dt} - \frac{dQ/Q}{dt}$$

वरील समिकरणानुसार स्फितीचा दर हा मुद्रेच्या वाढीचा दर अधिक मुद्रा प्रवेगाच्या वाढीचा दर वजा वास्तव खर्चाच्या वाढीच्या दराबरोबर असतो.

परिमाण सिद्धांतामध्ये दीर्घकाळाकरीता

१) मुद्रावाढीचा दर केंद्रिय मध्यवर्ती अधिकोषाने नियंत्रित केल्यास,

२) प्रवेगाच्या वाढीचा दर हा वेतन यंत्रणेच्या बदलावर अवलंबून असेल,

३) वास्तव खर्चाच्या वाढीचा दर हा तांत्रिक विकासावर आणि मजुर वाढीच्या दरावरून ठरल्या जात असेल तर स्फितीचा दर हा मूद्रावाढीच्या दराबरोबर असू शकत नाही.

## ■ केंब्रिज दृष्टिकोनः

केंब्रिज विद्यापीठाशी संबंधित असलेले मार्शल, पिगू व किन्स यांचा परिमाण सिद्धांताविषयी वेगळा दृष्टिकोन आहे. मुद्रेच्या पुरवठ्याऐवजी मुद्रेच्या मागणीचा विचार केला आहे. मुद्रेच्या पुरवठ्याचा काही

भाग व्यवहारामध्ये येत नाही तो (रोख रकमेत) सुरक्षिततेकरीता ठेवला जातो.

त्यांनी त्यांच्या परिमाण सिद्धांतात रोख रकमेचा भाग k ने दर्शविला आहे. उत्पन्नाचा शेष भाग p.y ने दर्शविला आहे. त्यामुळे केंब्रिज समीकरण खालीलप्रमाणे मांडले आहे.

$$M^d = k.p.y$$

अर्थव्यवस्थेत समानता असेल असे गृहित धरल्यास ($M^d = M$), y वर बाह्य घटकांचा परिणाम होतो आणि k हा अल्पकाळाकरीता स्थिर राहतो. तर, केंब्रिज समीकरण हे विनिमयाच्या समीकरणाबरोबर असते आणि प्रवेग हा k च्या व्यस्त प्रमाणात राहील तेंव्हा,

$$M.\frac{1}{k} = p.y$$

- **परिमाण सिद्धांत आणि पुरावे:**

मिल्टन फ्रिडमनने परिमाण सिद्धांतात विविध घटकांमध्ये खालील संबंध दाखविले आहे. सर्वसाधारण खर्चाचे मुल्य PQ ने दर्शविले आहे. किंमत पातळी p ने दर्शविली आहे. मुद्रा परिमाण M ने दर्शविला आहे.

१) $P.Q = f(M^+)$

२) $P = g(M^+)$

सर्वसाधारण खर्चाचे मुल्य हे मुद्रा पुरवठ्याबरोबर बदलते असे गृहित धरले आहे. किंमत पातळी ही सुद्धा त्यानुसार बदलते.

- **किन्सचे पुनर्निर्माण (२००८-०९):**

२००८ ची सुरूवात म्हणजे किन्सच्या अर्थशास्त्राचे पुनर्निर्माण होय असे जगातील अनेक अर्थतज्ज्ञांचे मत आहे. महामंदीच्या किन्सच्या शिफारसीच्या अनुषंगाने काही आर्थिक धोरणांची अंमलबजावणी व चर्चा यामध्ये अंतर्भूत आहे. उदा. राजकोषीय व मौद्रिक धोरण.

महामंदीच्या शेवटापासून ते १९७० पर्यंत किन्सचे अर्थशास्त्र हे आर्थिक धोरणाला प्रोत्साहन देणारे होते. २००८ ची जागतिक आर्थिक मंदी सुरू झाली तेव्हा किन्सच्या अर्थशास्त्राचे पुनर्निर्माण झाले. त्यावेळच्या किन्सच्या ज्या कल्पना होत्या त्या प्रस्तुत करून त्यावर पुनर्विचार करण्यात आला. २००८-०९ मध्ये किन्सचे अर्थशास्त्र विरोधाभासी वाटले. परंतु २०१० मध्ये त्याचा विरोधाभास कमी झाला. त्यामुळे आधुनिक अर्थशास्त्राचा किन्सच्या कार्यावर उत्साह वाढत गेला.

■ **किन्सच्या विचारांना पुनरुज्जीवन (२००८-०९):**

२००७-१० मधील आर्थिक संकटामुळे मुक्त व्यापारावर नकारात्मक मत येऊ लागले. यावरील बहुसंख्य विषयावर पुन्हा विचार होणे आवश्यक आहे असे अनेक तज्ज्ञांचे मत होते. त्यापैकी राजकोषीय बाबींविषयी संबंधित किन्सच्या विचारांवर पुन्हा लक्ष देण्यात आले. मात्र इतर क्षेत्रांमध्ये किन्सच्या जुन्याच विचारांचा अंतर्भाव होता.

आंतरराष्ट्रीय व्यापारातील आधिक्य व अंतर याला किन्सने अधिक महत्त्व दिले. परंतु या किन्सच्या विचारावर शासनाने लक्ष केंद्रित केले नाही त्यामुळे २००८ नंतर जागतिक व्यापारात असंतुलन निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय भांडवल हालचालींवर नियंत्रण असावे असे किन्सचे ठाम मत होते. विशेषतः अल्पकालीन प्रवाहावर १९७० ते १९८० च्या दशकामध्ये पाश्चिमात्त्य अर्थशास्त्रज्ञांचे मत किन्सच्या विरोधात होते. परंतु २०१० मध्ये भांडवलावरील नियंत्रण हे शासनाच्या स्थूल आर्थिक धोरणामध्ये महत्त्वाचा भाग असल्याचे दिसते. किन्सने आर्थिक समस्या सोडविण्याकरीता गणितीय प्रारूपाचा प्रामुख्याने उपयोग केला. त्यामुळे शासन अधिकोषीय व वित्तीय व्यवहारात गणितीय प्रारूपावर जास्त अवलंबून होते. परंतु अधिकोषीय व वित्तीय व्यवहारात गणितीय प्रारूपावर अवलंबून राहू नये असे आधुनिक अर्थतज्ज्ञांचे मत आहे कारण त्यामुळेच आर्थिक अरिष्ट निर्माण झाले असाही एक विचारप्रवाह दिसून येतो.

■ **युनायटेड स्टेट्स् व ग्रेट ब्रिटन:**

२००८ फायनान्शोयल टाईम मध्ये जागतिक मुक्त व्यापार गुंतवणूकीचा अंत झाला आहे असे म्हटले आहे. त्यानंतर वित्तीय संकट निवारण्यासाठी रॉबर्ट शिलर याने शासनाला किन्सच्या तत्त्वाचा वापर करण्याचे सुचविले. सध्याचे आणि पुढे येणारे जे आर्थिक अरिष्ट आहे, ते निवारण्यासाठी किन्सचे अर्थशास्त्र हे अतिशय उत्तम असल्याबाबत जेम्स गलब्रेथ यांनी मिल्टन फ्रेडमनच्या २५ व्या वार्षिक अधिवेशनात उहापोह केला. ब्रिटीश चान्सलरने सुद्धा आर्थिक अरिष्ट निवारण्यासाठी किन्सच्या तत्त्वाचा वापर करण्याबाबत सुचविले. नोबेल विजेता पॉल क्रुगमन, रॉबर्ट रीच, ग्रेग मॅनक्यू व जोसेफ स्टिगलीटझ यांच्या मते आर्थिक अरिष्ट निवारण्यासाठी किन्सच्या अर्थशास्त्रामध्ये दिशा मिळते परंतु राजकोषीय बाबींवर अधिक विचार होणे आवश्यक आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी ८ जानेवारी २००९ मध्ये आर्थिक अरिष्ट निवारण्यासाठी किन्सच्या विचारावर योजना आखण्याचे ठरविले. २००९-१० च्या किन्सच्या धोरणांचा मंदीकरीता जरी पुर्णतः उपयोग झाला नाही तरी इतर देशांचे धोरण राबविण्यामध्ये किन्सच्या तत्त्वांचा विचार केलेला आहे.

■ **समारोप:**

अमेरिकेतील वित्तीय अरिष्टाचे रूपांतर जागतिक स्तरावर, वास्तविक अर्थव्यवस्थेच्या अरिष्टामध्ये झाले. या अरिष्टाच्या विळख्यातून जगातील कोणत्याच देशाची सुटका होऊ शकली नाही. गेली काही महिने अमेरिकेचे आणि अमेरिकन डॉलरचे जागतिक अर्थव्यवस्थेमधील गेली कित्येक वर्षे निर्विवाद असलेले पहिल्या क्रमांकाचे स्थान धोक्यात येईल का अशी चर्चा सुरू आहे. इतिहासाकडे बघितले तर रिचर्ड रसेलच्या अभ्यासानुसार दर १०० वर्षांच्या टप्प्यांनी जगातल्या त्यावेळच्या ताकदवान चलनाची जागा दुसरे चलन घेते. उदा. इ.स. १४५० ते १५३० या ८० वर्षांच्या काळात पोर्तुगीजांचे चलन सगळ्यात श्रेष्ठ होते. त्यानंतर इ.स. १५३० ते १६४० या ११० वर्षांच्या काळात स्पेनच्या चलनाचा जगावर अंमल होता. त्यानंतर इ.स. १६४० ते १७२० या ८० वर्षांमध्ये डच लोकांच्या चलनाचा प्रभाव होता. त्याच्या पाठोपाठ इ.स. १७२० ते १८१५ या ९५ वर्षांमध्ये फ्रेंच चलनाचे साम्राज्य होते. त्यानंतर १८१५ ते १९२० या १०५ वर्षांच्या काळात ब्रिटीश चलनाचे जगावर राज्य होते आणि आता १९२० ते २००९ या ८९ वर्षांच्या काळापर्यंत अमेरिकन डॉलरने आपले प्रभुत्व दाखविले आहे. अशा या अमेरिकन डॉलरला वाचविण्यासाठी किन्सचे अर्थशास्त्र उपयोगी पडेल असा आशेचा किरण म्हणून किन्सच्या तत्त्वांकडे तज्ज्ञ लोक बघत आहेत.

■ **संदर्भ:**


1) http://en.wikipedia.org/wiki/quanti_theory_of_money

2) http://en.wikipedia.org/wiki/crisis 2007_theory

3) http://en.wikipedia.org/wiki/keynesian-economic_global financial crisis

4) Sumita Kale: A Global Keynesen Revival. livemint.com in partnership with the Wall Street Journal.

5) Dr. Wolassa L. Kumo (February 2009): The Global Economic Crisis the resurgence of Keynesen economics.

# किसान क्रेडिट कार्ड योजनेची प्रगती आणि भवितव्य

भागचंद शंकरराव खुरुद, राहुरी
अर्थशास्त्र विभागप्रमुख, कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, राहुरी,जि.अहमदनगर.
संदिप बाबुराव अभंग, खंडाळा,
ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

## प्रस्तावना:

भारत हा शेती प्रधान देश आहे. शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आणि भारतीयांची जीवनप्रणाली असे म्हणतात. भारताच्या आर्थिक विकासात शेतीचे योगदान फार मोठे आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६८ ते ७० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. २००९-१० मधील उपलब्ध आकडेवारीनुसार भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादन, एकूण रोजगार आणि एकूण निर्यातीत शेती क्षेत्राचा वाटा अनुक्रमे १४.६० टक्के, ५८.१० टक्के आणि १०.५९ टक्के इतका आहे. देशातील १२१ कोटी लोकसंख्येला अन्नधान्य पूरविण्याचे, उद्योगांना कच्चा माल आणि ग्रामीण उद्योगीकरणास चालना देण्याचे मोलाचे कार्य शेतीकडून केले जाते. यावरुन शेती क्षेत्राच्या कामगिरीवर भारताचा आर्थिक विकास आणि भवितव्य अवलंबून आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

शेतीचा विकास अनेक आदाने उदा. खते, बि-बियाणे, अवजारे, किटकनाशके, सिंचनसुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो. ही आदाने खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांकडे पुरेसे भांडवल उपलब्ध असावे लागते. त्या दृष्टीने शेती वित्तपूरवठ्याला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होते. भारतात शेतकऱ्यांना बिगर संस्थात्मक स्त्रोत (Non-Institutional Sources) आणि संस्थात्मक स्त्रोतांद्वारे (Institutional Sources) अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन वित्तपुरवठा केला जातो. शेतकऱ्यांच्या मागणीच्या तुलनेत या सर्व मार्गांनी होणारा शेती वित्तपुरवठा मात्र नेहमीच अपुर्ण असतो. त्यामुळे सरकार नवनव्या योजना व कार्यक्रम सुरु करुन त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना पुरेसा वित्तपुरवठा करण्यासाठी प्रयत्नशील असते. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'किसान क्रेडिट कार्ड योजना' (Kisan Credit Card Scheme) होय. १ एप्रिल १९९८ रोजी ही योजना भारतात सुरु करण्यात

आली. शेतकऱ्यांना बँकांमार्फत पुरेसे आणि वेळेवर कर्ज उपलब्ध करुन देणे आणि विशेषतः शेतकऱ्यांची अल्पकालीन कर्जाची गरज भागविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या अंमलबजावणीस आता जवळपास तेरा वर्षे पूर्ण होत आहेत. प्रस्तुत लेखात या कालावधीत किसान क्रेडिट कार्ड योजनेची प्रगती समाधानकारक आहे का? राज्यनिहाय आणि बँकनिहाय योजनेची कामगिरी कशी आहे? किसान क्रेडिट कार्ड योजनेची अंमलबजावणी करतांना बँका आणि शेतकऱ्यांना कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो? याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. विश्लेषणासाठी १९९८-९९ ते २००९-१० हा कालावधी विचारात घेण्यात आला आहे.

■ **अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

या अभ्यासात प्रामुख्याने पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहे.

१. किसान क्रेडिट कार्ड योजनेचे स्वरुप व उद्दिष्ट्ये स्पष्ट करणे.
२. सन १९९८-९९ ते २००९-१० दरम्यान किसान क्रेडिट कार्ड योजनेने केलेल्या प्रगतीचे मूल्यांकन करणे.
३. किसान क्रेडिट कार्ड योजनेची बँकनिहाय प्रगती कशी आहे याचा अभ्यास करणे.
४. किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या राज्यनिहाय कामगिरीचा परामर्श घेणे.
५. किसान क्रेडिट कार्ड योजनेचे संबंधित घटक उदा. लाभार्थी शेतकरी, बँक अधिकारी आणि कर्मचारी इत्यादींना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना सूचविणे.

■ **अभ्यास पध्दती:**

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतांद्वारे माहिती व आकडेवारीचा आधार घेतला आहे. द्वितीय स्त्रोतांद्वारे माहिती व आकडेवारी विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके, भारताची आर्थिक सर्वेक्षणे (Economic Surveys), नाबार्डचे वार्षिक अहवाल (Annual Reports of NABARD), रिझर्व्ह बँकेची विविध प्रकाशने उदा. भारतातील बँक व्यवसायाची प्रगती आणि प्रवृत्ती संबंधी अहवाल (Report on Trends and Progrees of Banking In India), हॅण्डबुक ऑफ स्टॅटिस्टीक्स ऑन इंडियन इकॉनॉमी (Hand Book of Statistics on Indian Economy) आणि विविध संकेतस्थळे (Websites) इत्यादी स्त्रोतांमधून संकलित

करण्यात आली आहे. किसान क्रेडिट कार्ड योजनेचे लाभार्थी शेतकरी आणि योजनेची अंमलबजावणी करणारे बँक कर्मचारी व अधिकारी यांनी व्यक्त केलेल्या अभिप्रायांची देखील दखल अभ्यासात घेण्यात आली आहे. संकलित माहितीचे शास्त्रीय वर्गीकरण, सारणीयन व विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी (Percentage) आणि पटीतील वाढ (Growth in Folds) या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

## ■ किसान क्रेडिट कार्ड योजनेचे स्वरुप:

'किसान क्रेडिट कार्ड योजना' (Kisan Credit Card Scheme - KCCs) भारतात १ एप्रिल १९९८ रोजी सुरु करण्यात आली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बँकांच्या मार्फत पुरेसे आणि वेळेवर कर्ज उपलब्ध करुन देणे, शेतकऱ्यांची अल्पकालीन कर्जाची गरज भागविणे, शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ घडवून आणणे आणि त्यांच्या राहणीमानात सुधारणा करणे, ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. सद्यस्थितीत ही योजना भारतातील २७ राष्ट्रीयीकृत व्यापारी बँका, ३७६ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका आणि १९६ प्रादेशिक ग्रामीण बँका यांच्यामार्फत संपूर्ण देशभर राबविली जात आहे. या योजनेंतर्गत विविध बँकाकडून वितरित केली जाणारी किसान क्रेडिट कार्डस् वेगवेगळ्या नावांनी ओळखली जातात. उदा. बँक ऑफ इंडिया - किसान समाधान कार्ड, देना बँक - किसान गोल्ड क्रेडिट कार्ड, पंजाब नॅशनल बँक - पी. एन. बी. कृषी कार्ड, स्टेट बँक ऑफ इंडिया व तिच्या सहाय्यक बँका - किसान क्रेडिट कार्ड, विजया बँक - विजया किसान कार्ड इत्यादी. योजनेत योजनेचा जास्तीत जास्त लाभ लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना मिळेल याची दक्षता घेतली जाते. कर्ज मंजूर करतांना प्रादेशिक ग्रामीण बँकाकडून ५० ते ६० टक्के, सहकारी बँकाकडून ३० ते ८० टक्के आणि व्यापारी बँकाकडून ३० ते ७० टक्के प्राधान्य लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना दिले पाहिजे अशी अपेक्षा करण्यात येते.

किसान क्रेडिट कार्ड योजनेत कर्जाबाबतचे अंतिम निर्णय बँकांचे शाखाधिकारी घेत असतात. शेतकऱ्यांसाठी कर्ज मर्यादा निश्चित करतांना वर्षाच्या पूर्ण उत्पादनासाठी कर्जाची गरज, विशिष्ट पीक, पिकांची पध्दत, लागवडी खालील क्षेत्र आणि जिल्हास्तरीय तांत्रिक समितीने (District Level Technical Committee) संबंधित पिकासाठी शिफारस केलेल्या खर्चाचा अंदाज इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातात. कर्ज मंजूर केल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना

बँकेमार्फत 'पासबुक' व 'क्रेडीट कार्ड' उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे एका विशिष्ट मर्यादेत शेतकऱ्याला त्याच्या बँक खात्यातून कितीही वेळा पैसे काढता येतात किंवा जमा करता येतात. शेतकऱ्याला वाढीव कर्जाची गरज भासत असेल तर बँका त्यासाठी सकारात्मक विचार करतात. शेतकऱ्यांच्या वार्षिक व्यवहाराचा आढावा घेऊन किसान क्रेडिट कार्ड तीन वर्षांसाठी वैध ठरविले जाते. कर्ज म्हणून उचललेली रक्कम १२ महिन्यात सव्याज परत करावयाची असते. कर्ज तारण मर्यादा आणि व्याजाचा दर रिझर्व्ह बँकेच्या मापदंडानुसार ठरतात. चांगल्या पिकास उत्तेजन म्हणून कर्जाची सीमा बँकांकडून वाढविली जाते. नैसर्गिक आपत्तीत पिकांचे नुकसान झाल्यास कर्जाच्या परतफेडीत बदल केले जातात.

## ■ किसान क्रेडीट कार्ड योजनेची प्रगती:

प्रस्तुत विभागात किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या प्रगतीचे मूल्यांकन केलेले आहे. मूल्यांकनासाठी या योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेले किसान क्रेडिट कार्ड, वितरित करण्यात आलेले कर्ज आणि योजनेची बँकनिहाय व राज्यनिहाय कामगिरी इत्यादी बाबी विचारात घेतल्या आहेत.

### १. किसान क्रेडिट कार्ड वितरण

किसान क्रेडिट कार्ड योजनेची अंमलबजावणी भारतात व्यापारी बँका, सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांच्यामार्फत केली जाते. योजनेंतर्गत १९९८-९९ ते २००९-१० दरम्यान सर्व बँकांनी शेतकऱ्यांना वितरित केलेल्या कार्डचा तपशील तक्ता क्र. १ मध्ये दिला आहे. त्यावरुन १९९८-९९ मध्ये बँकांनी एकूण ७.८४ लाख किसान क्रेडिट कार्ड वितरित केल्याचे स्पष्ट होते. त्यानंतर वितरित करण्यात आलेल्या कार्डांची संख्या वाढत जाऊन २००४-०५ मध्ये ती ९६.८० लाखापर्यंत पोहचली. २००५-०६ ते २००९-१० या काळात बँकांनी वर्षाला सरासरी ८३ ते ८६ लाख किसान क्रेडिट कार्ड वितरित केले. सन १९९८-९९ ते २००९-१० या १२ वर्षांच्या काळात वितरित करण्यात आलेल्या एकूण ९३९.०७ लाख क्रेडिट कार्डचा बँकनिहाय तपशील पाहिल्यास त्यात सहकारी बँकांनी वितरित केलेल्या क्रेडिट कार्डचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ४४.९४ टक्के असल्याचे दिसते. (तक्ता क्र.१) त्या खालोखाल व्यापारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांचा क्रमांक लागतो. त्यांनी अनुक्रमे ३९१.५८ लाख (४१.७० टक्के) आणि १२५.४६ लाख (१३.३६ टक्के) इतके क्रेडिट कार्ड वितरित केले.

तक्ता क्र.1

किसान क्रेडीट कार्ड योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेले कार्डस् (1998-99 ते 2009-10) (कार्ड वितरण लाखात)

| अ.क्र. | वर्ष | सहकारी बँका | प्रादेशिक ग्रामीण बँका | व्यापारी बँका | एकूण कार्ड वितरण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 1998-99 | 1.56 (19.90) | 0.06 (0.76) | 6.22 (79.34) | 7.84 (100.00) |
| 2. | 1999-00 | 35.95 (70.02) | 1.73 (3.37) | 13.66 (26.61) | 51.34 (100.00) |
| 3. | 2000-01 | 56.14 (64.89) | 6.48 (7.49) | 23.90 (27.62) | 86.52 (100.00) |
| 4. | 2001-02 | 54.36 (58.19) | 8.34 (8.93) | 30.71 (32.88) | 93.41 (100.00) |
| 5. | 2002-03 | 45.79 (55.55) | 9.64 (11.70) | 27.00 (32.75) | 82.43 (100.00) |
| 6. | 2003-04 | 48.78 (52.75) | 12.75 (13.79) | 30.94 (33.46) | 92.47 (100.00) |
| 7. | 2004-05 | 35.56 (36.74) | 17.29 (17.86) | 43.95 (45.40) | 96.80 (100.00) |
| 8. | 2005-06 | 25.98 (32.43) | 12.49 (15.59) | 41.65 (51.98) | 80.12 (100.00) |
| 9. | 2006-07 | 22.98 (26.98) | 14.06 (16.52) | 48.08 (56.50) | 85.12 (100.00) |
| 10. | 2007-08 | 20.91 (24.69) | 17.73 (20.93) | 46.06 (54.38) | 84.70 (100.00) |
| 11. | 2008-09 | 36.14 (42.69) | 11.47 (13.55) | 37.05 (43.76) | 84.66 (100.00) |
| 12. | 2009-10 | 37.88 (40.44) | 13.42 (14.33) | 42.36 (45.23) | 93.66 (100.00) |
| एकूण | (1998-99 ते 2009-10) | 422.03 (44.94) | 125.46 (13.36) | 391.58 (41.70) | 939.07 (100.00) |

*टिप : कंसातील आकडे एकूणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात.*

**Source:** *1) Govt. of India, Ministry of Finance (2009): Economic survey 2008-09, P.102*

*2) RBI (2010): Report on Trends and Progress of Banking in India 2009-10, P.197*

२. कर्ज वितरण:

किसान क्रेडिट कार्ड योजनेची कर्ज वितरणातील कामगिरी बऱ्यापैकी समाधानकारक आहे. तक्ता क्र. २ मध्ये दिलेल्या माहितीवरुन याची प्रचिती येते. त्यानुसार १९९८-९९ मध्ये या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मंजूर व वितरित करण्यात आलेले कर्ज २,३०७ कोटी रुपये इतके होते. त्यानंतरच्या काळात त्यात सतत वाढ होऊन २००२-०३ मध्ये ते २६,२७७ कोटी रुपये झाले. २००९-१० मध्ये मंजूर व वितरित करण्यात आलेले कर्ज ४,२७,७४८ कोटी रुपये इतके होते. अभ्यास काळात किसान क्रेडिट कार्ड योजनेंतर्गत वितरित केलेल्या एकूण कार्डात व्यापारी बँकांनी वितरित केलेल्या कार्डचे प्रमाण ४१.७० टक्के (तक्ता क्र.१) एवढे असले तरी १९९८-९९ ते २००९-१० दरम्यान योजनेंतर्गत संवितरित केलेल्या एकूण कर्जात (१०,७६,५२५ कोटी रुपये) सर्वात जास्त वाटा (५०.३१ टक्के किंवा ५,४१,५७१ कोटी रुपये) व्यापारी बँकांचा असल्याचे दिसून येते. सहकारी बँकांचा वाटा ३७.०३ टक्के (३,९८,६४३ कोटी रुपये) तर प्रादेशिक ग्रामीण बँकांचा वाटा १२.६६ टक्के (१,३६,३११ कोटी रुपये) इतका होता.

३. राज्यनिहाय प्रगती:

भारतात सध्या २८ घटक राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. त्या सर्वांमध्ये १ एप्रिल १९९८ पासून किसान क्रेडिट कार्ड योजना राबविली जात आहे. राज्यनिहाय वितरित करण्यात आलेल्या किसान क्रेडिट कार्डचा तपशील पाहिल्यास (तक्ता क्र.३) त्यामध्ये कमालीचा असमतोल निर्माण झालेला दिसून येतो. उदा. २००५-०६ ते २००९-१० या काळात एकूण वितरित करण्यात आलेल्या किसान क्रेडिट कार्डात (४२८.२६ लाख) उत्तर प्रदेशचा वाटा सर्वाधिक १७.४४ टक्के (७४.७० लाख) आहे. त्या खालोखाल, आंध्रप्रदेश १६.२० टक्के (६९.४० लाख), महाराष्ट्र १०.३० टक्के (४४.१० लाख), तामिळनाडू ६.३३ टक्के (२७.११ लाख), मध्यप्रदेश ५.५३ टक्के (२३.६८ लाख), ओरीसा ५.५० टक्के (२३.५४ लाख) आणि कर्नाटक ५.४७ टक्के (२३.४३ लाख) या घटक

राज्यांचा क्रमांक लागतो. त्यानंतर राजस्थान आणि पश्चिम बंगाल या घटक राज्यांचा क्रमांक लागतो. राजस्थान आणि पश्चिम बंगाल या घटक राज्यांचा एकूण वितरित करण्यात आलेल्या किसान क्रेडिट कार्डमधील वाटा अतिशय अल्प म्हणजे ५ टक्क्यांपेक्षाही कमी आहे. उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, ओरिसा आणि कर्नाटक या सहा घटक राज्यांचा एकूण वितरित करण्यात आलेल्या (४२८.२६ लाख) किसान क्रेडिट कार्डमधील एकत्रित वाटा हा ६१.२४ टक्के (२६२.२८ लाख) इतका असून उर्वरीत सर्व घटक राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे प्रमाण केवळ ३८.७६ टक्के (१६५.९८ लाख) आहे.

किसान क्रेडिट कार्डद्वारे वितरित करण्यात आलेल्या कर्जाची राज्यनिहाय आकडेवारी पाहीली तर हीच परिस्थिती दिसून येते उदा. २००५-०६ ते २००९-१० या काळात किसान क्रेडिट कार्डद्वारे भारतात एकूण ९,४२,१३४ कोटी रुपये कर्ज वितरित करण्यात आले. (तक्ता क्र. ४) त्यापैकी १,३१,७०२ कोटी रुपये म्हणजे १३.९८ टक्के कर्जाचे वितरण उत्तरप्रदेशात झाले. महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या राज्यांत वितरित करण्यात आलेल्या कर्जाचे मूल्य अनुक्रमे १,०९,३२९ कोटी रुपये (११.६० टक्के) आणि ९७,५०४ कोटी रुपये (१०.३५ टक्के) एवढे होते. त्या खालोखाल मध्यप्रदेश (७.७८ टक्के), राजस्थान (७.३७ टक्के), कर्नाटक (६.९३ टक्के) आणि तामिळनाडू (४.७६ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. २००५-०६ ते २००९-१० या काळात किसान क्रेडिट कार्डद्वारे वितरित करण्यात आलेल्या एकूण कर्जात (९,४२,१३४ कोटी रुपये) उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, कर्नाटक आणि तामिळनाडू या सात घटक राज्यांचा एकत्रित वाटा ६२.७४ टक्के (५,९१,०७२ कोटी रुपये) एवढा होता. उर्वरित घटक राज्यांचा वाटा फक्त ३७.२६ टक्के (३,५१,०६२ कोटी रुपये) होता. यावरुन किसान क्रेडिट कार्ड योजना आर्थिकदृष्ट्या विकसित राज्यात जास्त यशस्वी तर अल्पविकसित राज्यात कमी यशस्वी झाल्याचे स्पष्ट होते. बँकांची योजना राबविण्यातील उदासिनता, राज्य शासनाचे अपुरे प्रयत्न, शेतकऱ्यांना माहितीचा अभाव, पायाभूत सुविधांचे अल्प प्रमाण याबाबी यास कारणीभूत असल्याचे सांगितले जाते.

तक्ता क्र.2

किसान क्रेडीट कार्ड योजनेंतर्गत संवितरित करण्यात

आलेले कर्ज (1998-99 ते 2009-10) (कर्ज - कोटी रुपये)

| अ.क्र. | वर्ष | सहकारी बँका | प्रादेशिक ग्रामीण बँका | व्यापारी बँका | एकूण कार्ड वितरण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | 1998-99 | 826<br>(39.63) | 11<br>(0.53) | 1,473<br>(59.84) | 2,307<br>(100.00) |
| 2. | 1999-00 | 3,606<br>(47.77) | 405<br>(5.37) | 3,537<br>(46.86) | 7,548<br>(100.00) |
| 3. | 2000-01 | 9,412<br>(57.30) | 1,400<br>(8.52) | 5,615<br>(34.18) | 16,427<br>(100.00) |
| 4. | 2001-02 | 15,952<br>(61.69) | 2,382<br>(9.21) | 7,524<br>(29.10) | 25,858<br>(100.00) |
| 5. | 2002-03 | 15,841<br>(60.28) | 2,955<br>(11.25) | 7,481<br>(28.47) | 26,277<br>(100.00) |
| 6. | 2003-04 | 9,855<br>(45.24) | 2,599<br>(11.93) | 9,331<br>(42.83) | 21,785<br>(100.00) |
| 7. | 2004-05 | 15,597<br>(45.63) | 3,833<br>(11.21) | 14,756<br>(43.16) | 34,186<br>(100.00) |
| 8. | 2005-06 | 20,339<br>(42.73) | 8,483<br>(17.82) | 18,779<br>(39.45) | 47,601<br>(100.00) |
| 9. | 2006-07 | 13,141<br>(28.12) | 7,373<br>(15.78) | 26,215<br>(56.10) | 46,729<br>(100.00) |
| 10. | 2007-08 | 20,492<br>(41.00) | 9,074<br>(18.15) | 20,421<br>(40.85) | 49,987<br>(100.00) |
| 11. | 2008-09 | 1,32,988<br>(35.94) | 43,832<br>(11.84) | 1,93,249<br>(52.22) | 3,70,069<br>(100.00) |
| 12. | 2009-10 | 1,40,594<br>(32.87) | 53,964<br>(12.62) | 2,33,190<br>(54.51) | 4,27,748<br>(100.00) |
| एकूण | (1998-99 ते 2009-10) | 3,98,643<br>(37.03) | 1,36,311<br>(12.66) | 5,41,571<br>(50.31) | 10,76,525<br>(100.00) |

*टिप : कंसातील आकडे एकूणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात.*

**Source:** *1) Samantra, Samir (2010) : Kisan Credit Card : A Study, Department of Economic Analysis and Research, NABARD, Mumbai, P. 16.*

*2) RBI (2010) : Report on Trends and Progress of Banking in India 2009-10, P.197.*

तक्ता क्र.३

किसान क्रेडीट कार्डचे राज्यनिहाय वितरण

(2005-06 ते 2009-10) (कार्ड वितरण लाखात)

| अ.क्र. | घटक राज्याचे नाव | वर्षनिहाय वितरीत कार्ड 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 | 2009-10 | एकूण (3+4+5+6+7) | 8 शी शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | आंध्रप्रदेश | 13.45 | 13.78 | 12.16 | 14.43 | 15.58 | 69.40 | 16.20 (2) |
| 2. | कर्नाटक | 5.05 | 3.87 | 3.80 | 5.04 | 5.67 | 23.43 | 5.47 (7) |
| 3. | केरळ | 2.40 | 3.17 | 3.54 | 3.12 | 3.47 | 15.70 | 3.67 (10) |
| 4. | मध्यप्रदेश | 4.98 | 3.73 | 4.04 | 5.15 | 5.78 | 23.68 | 5.53 (5) |
| 5. | महाराष्ट्र | 7.78 | 10.88 | 8.82 | 7.92 | 8.70 | 44.10 | 10.30 (3) |
| 6. | ओरीसा | 4.94 | 3.49 | 4.63 | 4.93 | 5.55 | 23.54 | 5.50 (6) |
| 7. | राजस्थान | 3.46 | 2.65 | 2.78 | 4.76 | 5.22 | 18.87 | 4.40 (8) |
| 8. | तामिळनाडू | 5.28 | 5.18 | 4.68 | 5.81 | 6.16 | 27.11 | 6.33 (4) |
| 9. | उत्तर प्रदेश | 13.33 | 13.58 | 15.26 | 15.42 | 17.11 | 74.70 | 17.44 (1) |
| 10. | पश्चिम बंगाल | 4.80 | 1.82 | 3.88 | 3.10 | 3.45 | 17.05 | 3.98 (9) |
| 11. | इतर राज्ये | 14.65 | 22.97 | 21.11 | 14.98 | 16.97 | 90.68 | 21.18 |
| एकूण | | 80.12 | 85.12 | 84.70 | 84.66 | 93.66 | 428.26 | 100.00 |

*टिप : कंसातील अंक संबंधित घटक राज्याचा क्रमांक दर्शवितात.*

***Source :*** *RBI, Report on Trends and Progress of Banking in India 2005-06 to 2009-10.*

तक्ता क्र.4

किसान क्रेडीट कार्ड योजनेंतर्गत राज्यनिहाय कर्ज वितरण

(2005-06 ते 2009-10) (कर्ज कोटी रुपये)

| अ.क्र. | घटक राज्याचे नाव | वर्षनिहाय वितरीत कर्ज | | | | | एकूण (3+4+5 +6+7) | 8 शी शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 | 2009-10 | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | आंध्रप्रदेश | 4,504 | 6,318 | 4,170 | 38,476 | 44,036 | 97,504 | 10.35 (3) |
| 2. | कर्नाटक | 7,907 | 1,707 | 1,592 | 25,260 | 28,808 | 65,274 | 6.93 (6) |
| 3. | केरळ | 918 | 1,104 | 1,567 | 9,831 | 11,241 | 24,661 | 2.63 (10) |
| 4. | मध्यप्रदेश | 3,461 | 2,309 | 7,565 | 27,770 | 32,209 | 73,314 | 7.78 (4) |
| 5. | महाराष्ट्र | 5,101 | 4,392 | 9,787 | 42,852 | 47,197 | 1,09,329 | 11.60 (2) |
| 6. | ओरीसा | 2,206 | 1,663 | 2,090 | 14,011 | 15,649 | 35,619 | 3.78 (8) |
| 7. | राजस्थान | 3,002 | 1,873 | 1,679 | 28,556 | 34,298 | 69,408 | 7.37 (5) |
| 8. | तामिळनाडू | 1,904 | 2,364 | 1,931 | 17,594 | 20,748 | 44,541 | 4.76 (7) |
| 9. | उत्तर प्रदेश | 6,538 | 6,963 | 6,419 | 50,153 | 61,629 | 1,31,702 | 13.98 (1) |
| 10. | पश्चिम बंगाल | 787 | 1,145 | 3,328 | 10,816 | 12,352 | 28,428 | 3.00 (9) |
| 11. | इतर राज्ये | 11,273 | 16,891 | 9,859 | 1,04,750 | 1,19,581 | 2,62,354 | 27.82 |
| एकूण | | 47,601 | 46,729 | 49,987 | 3,70,069 | 4,27,748 | 9,42,134 | 100.00 |

*टिप : कंसातील अंक संबंधित घटक राज्याचा क्रमांक दर्शवितात.*

**Source:** *RBI, Report on Trends and Progress of Banking in India 2005-06 to 2009-10.*

## ■ योजनेचे दोष आणि समस्या:

किसान क्रेडिट कार्ड योजना ही भारतातील ग्रामीण शेतकऱ्यांना अल्प मूदतीचे वित्तसहाय्य करणारी एक उपयुक्त योजना असून १९९८-९९ ते २००९-१० या काळातील तिची प्रगती

काहीशी समाधानकारक आहे, असे असले तरी या योजनेत काही दोष आहेत. तसेच योजनेचे विविध घटक उदा. शासकीय यंत्रणा, बँका आणि शेतकऱ्यांना अंमलबजावणीच्या विविध स्तरावर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. योजनेचे ठळक दोष आणि समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. किसान क्रेडिट कार्डद्वारे कर्ज मंजूर करतांना प्रादेशिक ग्रामीण बँकांनी ५०-६० टक्के, सहकारी बँकांनी ३०-८० टक्के आणि व्यापारी बँकांनी ३०-७० टक्के प्राधान्य लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना द्यावे अशी नाबार्डने अपेक्षा व्यक्त केली आहे. परंतु बँका या मार्गदर्शक तत्त्वांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे या योजनेचे फायदे लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना मिळत नाही.

२. या योजनेत विशिष्ट पिकांसाठी कर्ज मर्यादा ठरवितांना लागवडी खालील क्षेत्र, पिकांची पध्दत यासारखे निकष विचारात घेतले जातात. त्यामुळे या योजनेचा अधिकाधिक फायदा मोठ्या शेतकऱ्यांना होतो. कारण त्यांच्याकडे असणारी अधिक शेतजमीन आणि व्यापारी पिके घेण्याचा त्यांचा दृष्टिकोन यामुळे त्यांना या योजनेद्वारे अधिक कर्ज मंजूर होते. याऊलट लहान आणि सीमांत शेतकऱ्यांकडे असणारे अल्पधारण क्षेत्र व शेतीकडे उदरनिर्वाहाच्या दृष्टीने पाहणे यामुळे या योजनेचा लाभ लहान व सीमांत शेतकऱ्यांना कमी होतो.

३. किसान क्रेडिट कार्ड योजनेत शेतकऱ्यांना कर्जाची रक्कम अगोदरच मंजूर केली जाते. ही रक्कम पाहिजे तेव्हा काढण्याचे व खर्च करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्यांना दिलेले असते. यातील बरेच शेतकरी त्यांना मिळालेले कर्ज अनुत्पादक कार्यावर खर्च करतात. त्यामुळे शेतीच्या समस्या कायम राहतात आणि शेती उत्पादनात अपेक्षित वाढ होत नाही.

४. शासनाच्या विविध विकास योजना आणि कार्यक्रमांमध्ये आढळून येणारे भ्रष्टाचार, लाचलुचपत आणि लालफितीचा कारभार यासारखे दोष या योजनेतही निर्माण झालेले दिसतात. मोठे व प्रतिष्ठित शेतकरी बँकांचे शाखाधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी असलेल्या ओळखीचा फायदा घेऊन योजनेचे जास्त फायदे मिळविण्यात यशस्वी होतात. त्यामुळे गरजू, लहान आणि सीमांत शेतकऱ्यांवर अन्याय होतो.

५. किसान क्रेडिट कार्ड योजनेची अंमलबजावणी भारतात व्यापारी बँका, सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकाकडून केली जाते. परंतु ही योजना प्राधान्याने राबविण्यातील बँकांचा उदासीनपणा तसेच कर्ज मंजुरीतील विलंब यासारख्या कारणांमुळे बँकनिहाय योजनेच्या प्रगतीत असमानता दिसून येते. अभ्यासकाळात या योजनेच्या अंमलबजावणीत व्यापारी बँका आघाडीवर तर सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका मागे असल्याचे दिसून येते.

६. या योजनेंतर्गत मिळविलेल्या कर्जाचा अनुत्पादक कार्यासाठी वापर, व्याजाची रक्कम वेळेवर न भरणे, तसेच एकापेक्षा अधिक बँकांची कार्ड वापरणे इत्यादीमुळे कर्जाची परतफेड करण्यास विलंब होतो. परिणामी कर्ज बुडविण्याचे प्रमाण वाढते आणि बँकासमोर ही योजना राबवितांना अनेक अडचणी निर्माण होतात.

७. किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या प्रगतीचा राज्यनिहाय अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, विकसित आणि आर्थिकदृष्ट्या पुढारलेली घटक राज्ये ही योजना राबविण्यात अधिक यशस्वी तर अल्पविकसित आणि मागासलेली राज्ये अपयशी ठरली आहेत. त्यामुळे भारतात या योजनेच्या प्रगतीत प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. बँकांची ही योजना राबविण्यातील उदासीनता, राज्य शासनांचे अपुरे प्रयत्न, शेतकऱ्यांना माहितीचा अभाव, पायाभूत सुविधांचे अल्प प्रमाण यासारखे घटक यास कारणीभूत आहेत.

■ **शिफारसी:**

किसान क्रेडिट कार्ड योजनेची सध्याची कार्यपध्दती, समस्या व दोष लक्षात घेता या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील शिफारसी करता येतील.

१. किसान क्रेडिट कार्डद्वारे कर्ज मंजूर करतांना प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी बँका आणि व्यापारी बँकांनी नाबार्डने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करुन या योजनेचा अधिकाधिक लाभ लहान व सीमांत शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

२. योजनेंतर्गत विशिष्ट पिकांसाठी कर्ज मर्यादा ठरवितांना लागवडीखालील क्षेत्र व पिकांचा प्रकार या निकषांबरोबर शेतकरी कोणत्या गटात मोडतो याचा देखील विचार करुन कर्ज मंजूर

करण्यात यावे. त्यामुळे या योजनेचा गरीब शेतकऱ्यांना जास्त फायदा होईल.

३. या योजनेचे संपूर्ण यश शेतकऱ्यांच्या मानसिकतेवर अवलंबून आहे. कारण मंजूर केलेली रक्कम शेतकऱ्यांनी ज्या कारणांसाठी घेतली आहे, त्यासाठीच वापरली पाहिजे. कर्जाचा उत्पादक कार्यासाठी वापर केल्यास शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे हा योजनेचा उद्देश पूर्ण होण्यास मदत होईल.

४. शेतकऱ्यांनी योजनेंतर्गत घेतलेले कर्ज व व्याजाची रक्कम वेळेवर परत केल्यास त्यांची बँकेत पत निर्माण होईल व त्याला कार्ड तीन वर्षासाठी वैध करणे सोपे जाईल. त्यामुळे त्याला आपली पैशाची गरज भागविता येईल.

५. बँकांनी किसान क्रेडिट कार्डद्वारे कर्ज मंजूर करतांना शेतकऱ्यांकडे यापूर्वी इतर बँकांचे कार्ड नाहीत याची शहानिशा करुनच कर्ज मंजूर करावे. त्यामुळे थकित कर्ज किंवा कर्ज बुडण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

६. केंद्र सरकारने अल्पविकसित आणि मागासलेल्या घटक राज्यात ही योजना राबविण्यासाठी बँकांना जास्त प्रोत्साहन द्यावे असे केल्यास मागासलेल्या घटक राज्यांतील शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. परिणाम स्वरुप ग्रामीण विकासास चालना मिळून समतोल प्रादेशिक विकास साध्य होण्यास मदत होईल.

■ **समारोपः**

उपरोक्त विश्लेषणावरुन किसान क्रेडिट कार्ड योजना ही शेती विकास व पर्यायाने ग्रामीण विकासास चालना देणारी भारतातील एक महत्त्वाची योजना असल्याचे स्पष्ट होते. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना अल्प हप्त्यात विमा संरक्षण मिळणे, कर्ज प्रकरणाचा प्रशासकीय खर्च कमी येणे, अल्प व्याज दरात कर्ज मिळणे असे लाभ मिळतात. तर बँकांना कामाचा भार कमी होणे, कमीत कमी कागदपत्रांची गरज आणि बँका व ग्राहक शेतकऱ्यात चांगले संबंध निर्माण होणे यासारखे फायदे मिळतात. त्यामुळे योजनेबद्दलच्या शेतकऱ्यांच्या व विशेषतः लहान व सीमांत शेतकऱ्यांच्या अपेक्षा बऱ्याच वाढलेल्या आहेत. म्हणून सरकारने किसान

क्रेडिट कार्ड योजनेतील दोष व समस्या दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. बँकांनी देखील योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भरीव सहकार्य करावे. असे झाले तरच योजनेचे लाभ ग्रामीण भागातील लहान व सीमांत शेतकऱ्यांपर्यंत पोहचतील आणि योजनेचे हेतू साध्य होण्यास मदत होईल.

## ■ संदर्भ सूची:


1. Govt. of India, Ministry of Finance (2009) : Economic Survey 2008-09, P. 102.
2. Jamunarani, N. (April - June 2010) : Kisan Credit Cards A Viable Tol for Rural Credit, Co-operative Perspective, Journal of Co-operative Management, Vol. 45, No. 1, PP. 17-23.
3. Kamble Balaji (August 2009) : Role of Kisan Credit Cards in the Benefit of Small farmers, Shodh Samiksha Aur Mulyankan, Vol. II, Issue - 7, pp - 201-204.
4. RBI (2005 to 2010) : Report on Trends and Progress of Banking in India.
5. Samantara, Samir (2010 : Kisan Credit Card - A Study, Department of Economic Analysis and Research. NABARD, Mumbai, PP. 15-35.
6. www.rbi.org.in


---

### अर्थतज्ज्ञ डॉ.भ.ग.बापट यांना भावपूर्ण श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य, अर्थसंवादचे माजी प्रमुख संपादक व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.भ.ग.बापट(पुणे) यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. अर्थसंवाद त्रैमासिकासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विविध उपक्रमांत त्यांचा सक्रीय सहभाग होता. अमेरिकेतील कोलोराडो विद्यापीठातून प्रगत अर्थशास्त्रात पीएच्.डी. प्राप्त केल्यानंतर पुण्यातील गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये त्यांनी अध्यापनकार्य केले. डॉ.बापट यांचा अर्थशास्त्राप्रमाणेच तत्त्वज्ञान, भाषा व विविध धर्मांचा गाढा अभ्यास होता. अर्थशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांबरोबरच त्यांनी रशियातील पुनर्रचना, कार्ल मार्क्स:व्यक्ती आणि विचार, आंतरराष्ट्रीय व्यापार:सिध्दान्त व धोरण हे ग्रंथ लिहिलेत. असामान्य बुध्दिमत्तेचा माणूस काळाने आपल्यातून ओढून नेला आहे.मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने डॉ.भ.ग.बापट यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

- प्रमुख संपादक(अर्थसंवाद)

# महाराष्ट्र आणि खान्देशच्या पीक रचनेतील बदलांचा तौलनिक अभ्यास

महेश मोहनीराज बडवे, जळगाव.
व्यावसायिक अर्थशास्त्र व बँकींग विभागप्रमुख, मूळजी जेठा महाविद्यालय.

*(प्रस्तुत लेखात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात पी.एच.डी.प्राप्त प्रबंधाचा सारांश दिला आहे.)*

■ **प्रस्तावना:**

भारतात आर्थिक उदारीकरणाचे देशातील कृषी,औद्योगिक व सेवाक्षेत्रांवर विविध परिणाम झालेले दिसून येतात.त्यातील महाराष्ट्र व खान्देशच्या कृषीक्षेत्रावर आणि विशेषत:पीक रचना, उत्पादकता व रोजगाराच्या संधी (रोजगार निर्मिती)यावर त्याचे काय परीणाम झाले हे पाहण्यासाठी आणि त्यातील बदलांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी **'आर्थिक सुधारणांच्या कालखंडातील महाराष्ट्र आणि खान्देशातील पीक रचनेतील बदलांचा तौलनिक अभ्यास** ' या विषयाची निवड केली.

■ **संशोधनाची उद्दिष्टे** (Objectives):

भारतीय अर्थव्यवस्थेतील १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांचा अभ्यास करणे.
आर्थिक सुधारणांमुळे पीकरचनेत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
आर्थिक सुधारणांमुळे कृषीक्षेत्राच्या उत्पादकतेत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
आर्थिक सुधारणांमुळे कृषीक्षेत्रात निर्माण झालेल्या रोजगारांच्या संधीचा अभ्यास करणे.
महाराष्ट्र व खान्देशातील पीक रचनेतील बदलांचा तौलनिक अभ्यास करणे.
खान्देशातील पीक पध्दतीतील बदलांचा धारणक्षेत्रानुसार तौलनिक अभ्यास करणे.

■ **गृहिकृत्य /परिकल्पना** (Hypothesis):

आर्थिक सुधारणांच्या कालखंडात (१९९१ ते२००६) पीकरचनेत बदल घडून आला.
आर्थिक सुधारणांच्या कालखंडात शेतीक्षेत्रात रोजगारामध्ये वाढ झाली.
आर्थिक सुधारणांच्या कालखंडात शेतीक्षेत्राच्या उत्पादकतेत वाढ झाली.

■ **संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनामध्ये आर्थिक सुधारणांच्या कालावधीत भारताच्या शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे.त्यात प्रामुख्याने पीक रचनेतील बदल, उत्पादकतेतील बदल व रोजगार निर्मिती यावरील परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास दोन पध्दतीने करण्यात येणार आहे.

एक स्थूल पातळीवरील विश्लेषण त्यात अखिल भारतीय पातळी, महाराष्ट्र राज्य व जिल्हा यांचा समावेश होतो. त्यासाठी दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीचा आधार घेण्यात आला आहे. दुय्यम आकडेवारी (Secondary Data) जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, भारताचे अर्थसंकल्पपुर्व सर्वेक्षण, रिझर्व्ह बँकेचे बुलेटीन, महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण अहवाल, राष्ट्रीय पातळीवरील प्रकाशित होणारी मासिके व त्रैमासिके, साप्ताहिके, कृषी विद्यापीठ व कृषी विभागातील विविध अहवाल तसेच प्रकाशित ग्रंथ व विविध अभ्यासकांचा अप्रकाशित प्रबंध, विविध नियतकालिके, दैनिक वृत्तपत्रे, वेबसाईट इ.चा आधार घेण्यात आला आहे.

दुसरी-सूक्ष्म विश्लेषण पध्दती, जी नमुना निवडलेल्या शेतकऱ्यांच्या प्राथमिक माहितीवर आधारलेली आहे. प्राथमिक आकडेवारी गोळा करण्यासाठी खान्देशातील जळगाव, धुळे व नंदुरबार या तीनही जिल्ह्यातील प्रत्येकी दोन तालुक्यांची निवड केली आहे व या एकूण सहा तालुक्यातील प्रत्येकी पाच गावांची निवड केली आहे. या निवडलेल्या (३० गावे) प्रत्येक गावातून १० शेतकऱ्यांची याप्रमाणे एकूण ३०० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. या निवडलेल्या नमुन्याची मुलाखत घेऊन प्राथमिक माहिती संकलित केली आहे.

■ **सांख्यिकीय मध्य (Statistical Average):**

अध्ययनासाठी संकलित केलेल्या खान्देशातील तिन्ही जिल्हयातील विविध पिकांखालील क्षेत्राच्या व उत्पादकतेच्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय मध्य (Satistical Average) व प्रमाण विचलन (Standard Deviation) यांचा वापर केला आहे.

■ **संकलित केलेल्या सामग्रीचे विश्लेषण:**

संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करून पीक पध्दतीतील बदल ,उत्पादकतेतील व रोजगार संधीत झालेले बदल यांचे अध्ययन करण्यासाठी ज्ञान निर्देशांक, अनुकरण निर्देशांक, उत्पादकता वाढ निर्देशांक व रोजगार वाढ निर्देशांक काढण्यात आले.

■ **ज्ञान निर्देशांक (Knowledge Index)**

ज्ञान म्हणजे एखाद्या व्यक्तीने प्राप्त केलेली माहीती होय. प्रस्तुत अध्ययनात आर्थिक सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेत जे बदल झाले त्याबाबतची माहिती व जागरूकता म्हणजे ज्ञान होय. शेतकऱ्यांना आर्थिक सुधारणांमुळे जे बदल झालेले आहेत त्याबाबतचे ज्ञान मोजण्यासाठी ज्ञानचाचणी (Knowledge Test)तयार करण्यात आली आहे. यात आर्थिक सुधारणांमुळे जे बदल झालेले आहेत त्याबाबतचे १९ घटक समाविष्ट आहे. त्याबाबतची उत्तरे आधीच दिलेली आहेत. त्यातील पूर्णत: माहीती असणाऱ्यांसाठी ३ गुण, अंशत: माहीती असणाऱ्यांसाठी २ गुण व माहीती/ज्ञान नसणाऱ्यांसाठी १ गुण (Score) दिला आहे. मिळालेल्या एकूण

गुणांची बेरीज करून त्याचे रूपांतरण ज्ञान निर्देशांकात खालील सूत्राचा वापर करून केले आहे.

$$\text{ज्ञान निर्देशांक} = \frac{\text{माहीतीचे मिळालेले एकुण गुण}}{\text{माहीतीचे मिळण्यायोग्य महत्तम गुण}} \times १००$$

ज्ञान निर्देशांक म्हणजेच आर्थिक सुधारणांमुळेच झालेल्या बदलांचे ज्ञान (माहीती)असणाऱ्याचे शेकडा प्रमाण होय. शेतकऱ्यांच्या ज्ञानाचे (माहीतीचे) मोजमाप करण्यासाठी आर्थिक सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांची यादी- किंमतीतील बदल, बाजारपेठेच्या उपलब्धतेत वाढ, करार शेतीचे प्रमाण वाढले, बिगरशेतीसाठी जमिनाच्या मागणीत वाढ (प्लॉट, उद्योग, शाळा), संघटीत क्षेत्राकडून (औद्योगिक घराणे) शेतीजमिनीच्या मागणीत वाढ, साठवणूक व शीत गृहांच्या उद्योगात वाढ, शेतमालावरील प्रक्रिया उद्योगात वाढ, जैविक तंत्रज्ञानात प्रगती, शेतीच्या यांत्रिकिरणातील वाढ, वाहतुकीच्या सोयी -सुविधा वाढ, दळणवळणाच्या सोयीत वाढ, शेती व्यवसायाला मिळणाऱ्या अनुदानात बदल, पीक व इतर विमा सुविधेत वाढ, शेती व्यापारी तत्वावर केली जाऊ लागली, व्याजदरातील झालेला किफायतशीर बदल, शेतीव्यवसायात रोजगाराच्या संधीत वाढ, ग्रामीण भागात मजुरांची संख्या कमी झाली, पाणी पुरवण्याच्या सुविधेत बदल, धारणक्षेत्रात बदल झाला.

■ **अनुकरण निर्देशांक (Adoption Index):**

अनुकरण ही अशी मानसिक प्रक्रिया आहे की ज्यात व्यक्ती एखाद्या नाविन्यपुर्ण बदलाबाबतची माहिती प्रथम ऐकल्यापासून तिचा अंतिमत: वापर करण्यापर्यंतचा प्रवास होय. प्रस्तुत अध्ययनात अनुकरण म्हणजे शेतकऱ्यांनी आर्थिक सुधारणांमुळे झालेल्या बदलांच्या ज्ञानामुळे शेती व्यवसायात केलेले बदल, प्रामुख्याने पीक रचनेत केलेले बदल होय. पाहणी केलेल्या शेतकऱ्यांची अनुकरणाची पातळी काढण्यासाठी अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांच्या १९ घटकांची यादी ज्ञान पातळीप्रमाणेच तयार केली आहे. निवडलेल्या शेतकऱ्यांना त्याबाबतच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्याबाबत विनंती करण्यात आली. उत्तरदात्यांनी दिलेली उत्तरे तीन भागात विभागली ते म्हणजे १) पूर्णत: बदल २) अंशत: बदल व ३)बदल नाही व त्यास अनुक्रमे ३,२ व १असे गुण (Score) दिले आहे मिळालेल्या एकुण गुणांची बेरीज करून त्याचे रूपांतरण अनुकरण निर्देशांकात खालील सूत्रांच्या साह्याने केले आहे.

$$\text{अनुकरण निर्देशांक} = \frac{\text{अनुकरणाचे मिळालेले एकुण गुण}}{\text{अनुकरणाचे मिळण्यायोग्य महत्तम गुण}} \times १००$$

■ **उत्पादकता वाढ निर्देशांक (Productivity Index):**

पाहणी केलेल्या शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत बदल झाला किंवा नाही व तो कितपत झाला हे पाहण्यासाठी

उत्पादकता निर्देशांकाचा वापर केला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना पर्यायी प्रश्न विचारून त्यांना उत्तरे देण्याची विनंती केली व त्या उत्तरांना पुढीलप्रमाणे गुण देण्यात आले. ज्या शेतकऱ्यांनी सर्व पिकांची उत्पादकता वाढली असे उत्तर दिले त्यांच्या पिकाला ५ गुण, बागायती पिकांची उत्पादकता वाढली त्यास ४ गुण, काही पिकांची उत्पादकता वाढली त्यास ३ गुण, जिरायती पिकांची उत्पादकता वाढली त्यास २ गुण व कोणत्याही पिकांची उत्पादकता वाढली नाही त्यास १ गुण याप्रमाणे गुण देण्यात आले. मिळालेल्या एकुण गुणांची बेरीज करून त्यांचे रूपांतरण उत्पादकता वाढ निर्देशांकात खालील सुत्राच्या साह्याने केले .

$$\text{उत्पादकता वाढ निर्देशांक} = \frac{\text{उत्पादकता वाढीबाबत मिळालेले एकुण गुण}}{\text{उत्पादकता वाढीबाबतचे महत्तम गुण}} \times १००$$

उत्पादकता वाढ निर्देशांक म्हणजे उत्पादकतेत झालेल्या वाढीचे शेकडा प्रमाण होय.

■ **रोजगार वाढ निर्देशांक** (Employment Index) संशोधनासाठी पाहणी केलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर आर्थिक सुधारणांचा परिणाम म्हणून रोजगार निर्मितीत वाढ झाली का? याबाबत शेतकऱ्यांना प्रश्न विचारण्यात आले व त्यांची उत्तरे देण्याची विनंती करण्यात आली व त्यानी दिलेल्या उत्तरांना गुण देण्यात आले. जर उत्तर रोजगारात १०० टक्के वाढ झाली असे असेल तर ५ गुण, ७५ टक्के वाढ झाली असेल तर ४ गुण, ५० टक्के वाढ झाली असे असेल तर ३ गुण, २५ टक्के वाढ झाली असेल तर २ गुण आणि रोजगारात वाढ झाली नाही असे उत्तर असेल तर १ गुण देण्यात आला. मिळालेल्या एकुण गुणांची बेरीज करून त्याचे रूपांतरण रोजगार वाढ निर्देशांकात खालील सूत्र वापरून केले आहे.

$$\text{रोजगारवाढ निर्देशांक} = \frac{\text{रोजगारवाढीबाबत मिळालेले एकुण गुण}}{\text{रोजगार वाढीबाबतचे महत्तम गुण}} \times १००$$

रोजगार वाढ निर्देशांक म्हणजेच रोजगारात झालेल्या वाढीचे शेकडा प्रमाण होय.

■ **संशोधनाची व्याप्ती व कालखंडः**

प्रस्तुत अध्ययनाची व्याप्ती स्थूल अध्ययनासाठी महाराष्ट्र व खान्देशापुरती मर्यादित असून सूक्ष्म अध्ययनासाठी खान्देशातील तीन जिल्ह्यांपुरती मर्यादित आहे. या अध्ययनाचा कालावधी १९९१ ते २००१ असा निश्चित करण्यात आला होता. परंतु आकडेवारी (तथ्य)अद्ययावत करण्याच्या दृष्टीकोनातून हा कालावधी २००४-०५ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

■ **संशोधनाची उपयुक्तताः**

आर्थिक सुधारणांच्या कालावधीत कृषीक्षेत्रातील सुधारणा धीम्या गतीने होत आहेत. या पार्श्वभूमीवर या

सुधारणांच्या कृषीक्षेत्रावरील परिणामांचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल. या अभ्यासाच्या आधारावर भविष्यात कृषिक्षेत्रातील सुधारणा कोणत्या दिशेने व्हाव्यात याचा अंदाज बांधता येईल. हा अभ्यास शासनकर्ते, नियोजनकार, वित्तसंस्था, शेतकरी व संशोधकांना उपयुक्त ठरेल.

■ **संशोधनाच्या मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन हे नमुना निवड पध्दतीवर आधारलेले आहे. त्यामुळे नमुना निवड पध्दतीच्या मर्यादा या संशोधनाला लागू पडतात. तसेच हे संशोधन खान्देशातील निवडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रतिसादावर आधारलेले आहे. या मर्यादा असल्यातरी प्रस्तुत संशोधन हे याच प्रकारची भौतिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती असलेल्या भारतातील इतर भागांना पर्यायाने संपूर्ण कृषी क्षेत्राला लागू केल्यास उपयुक्त ठरेल.

■ **प्रमुख निष्कर्ष:**

१. राष्ट्रीय पातळीवर आर्थिक सुधारणांच्या कालावधीत शेतीच्या उत्पादकतेत वाढ झालेली आहे.
२. राष्ट्रीय पातळीवर कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीचे सकल देशांतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण खूपच कमी आहे.(१.३ ते २.२ टक्के दरम्यान) तसेच कृषी क्षेत्रातील सरकारी गुंतवणुकीचे प्रमाण खाजगी गुंतवणुकीच्या तूलनेने कमी आहे. (सरकारी गुंतवणूक २४.२ टक्के तर खाजगी गुंतवणूक ७५.८ टक्के.)
३. महाराष्ट्रात संख्येने खूप जास्त अल्पभूधारकांकडे खूप थोडी तर संख्येने कमी असलेल्या मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांकडे जास्त जमिनीची मालकी आहे.
४. जळगाव जिल्ह्यातील यावल व रावेर तालुक्यांचा अपवाद वगळता खान्देशातील जवळपास ८० टक्के लागवडीखालील क्षेत्र जिरायती आहे.
५. खान्देशातील जवळपास ९० टक्के सिंचन हे विहिरीच्या माध्यमातून म्हणजेच भूगर्भीय पाण्यावर अवलंबून आहे.
६. अन्नधान्य लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण खान्देश विभागामध्ये राज्याच्या तुलनेत जास्त आहे. तसेच खान्देशात व राज्यात त्यात जवळपास समान घट झालेली आहे. महाराष्ट्र राज्यात अन्नधान्याच्या लागवडीखालील क्षेत्रफळाचे प्रमाण वरील सर्व घटकांच्या तुलनेत सर्वात कमी असून त्यात झालेल्या घटीचे प्रमाण खान्देश विभाग व जळगाव जिल्ह्याच्या तुलनेत कमी आहे तर धुळे व नंदुरबार जिल्ह्यांच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसून येते.
७. महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत खान्देशात तृणधान्याखाली असणाऱ्या क्षेत्रफळाचे प्रमाण कमी आहे. दोन्ही ठिकाणी तृणधान्याखालील क्षेत्रफळाचे प्रमाण घटले आहे.
८. कडधान्याच्या लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण खान्देश विभागामध्ये राज्याच्या तुलनेत जास्त आहे आणि त्यात झालेली घटही राज्याच्या तुलनेत जास्त आहे.

९. ऊस पिकाच्या लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण खान्देश विभागामध्ये राज्याच्या तुलनेत कमी आहे. तसेच खान्देशामध्ये या पिकाच्या क्षेत्रांच्या प्रमाणात झालेली घट राज्याच्या तुलनेत कमी आहे.

१०. कापसाच्या लागवडीखालील क्षेत्राच्या प्रमाणात राज्यात घट झालेली आहे तर खान्देश विभाग व खान्देशांतर्गत तीनही जिल्ह्यात वाढ झालेली दिसून येते.

११. तेलबियांचे लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण खान्देश विभागामध्ये राज्याच्या तुलनेत जास्त आहे. राज्याच्या बाबतीत तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाणात अल्पशी वाढ झालेली आहे तर खान्देशात त्यामध्ये लक्षणीय घट झालेली दिसून येते. तुलनात्मकदृष्ट्या पाहिले असता तेलबियांच्या लागवडीखालील क्षेत्रांच्या प्रमाणात राज्य व नंदुरबार जिल्ह्यात वाढ तर खान्देश विभाग तसेच जळगाव व धुळे जिल्ह्यांच्या बाबतीत घट झालेली निदर्शनास येते.

१२. सर्व पिकांचा एकत्रित विचार केला असता महाराष्ट्रामध्ये अन्नधान्याच्या पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण कमी होऊन त्यांची जागा प्रामुख्याने सोयाबीन या पिकाने घेतली आहे तर खान्देशात अन्नधान्याची जागा कापूस व सोयाबीन या नगदी पिकाने घेतली आहे.

१३. महाराष्ट्र व खान्देशातील प्रमुख पिकांच्या उत्पादकतेचा एकंदरित आढावा घेतला असता तृणधान्याची उत्पादकता दोन्ही ठिकाणी वाढली आहे. कडधान्याची उत्पादकता स्थिर असून एकूण अन्नधान्याच्या उत्पादकतेत वाढ झाल्याचे दिसून येते. कापूस या नगदी पिकाची उत्पादकतादेखील वाढली आहे. परंतु राज्याच्या तुलनेत खान्देशात ती जास्त वाढली आहे. गळीत धान्यांपैकी भूईमुग या पिकाची उत्पादकता घटली असून सोयाबिनच्या उत्पादकतेत वाढ झालेली आहे व ही वाढ राज्याच्या तुलनेत खान्देशातील जळगाव जिल्ह्यात जास्त दिसून आली.

१४. आर्थिक सुधारणांच्या कालावधीत विविध घटकांमध्ये जे बदल झाले त्या बदलांच्या माहितीचा निर्देशांक खान्देशातील पाहणी केलेल्या ३०० शेतकऱ्यांच्या बाबतीत ६९.७०टक्के आहे. म्हणजेच ६९.७० टक्के पाहणी केलेल्या शेतकऱ्यांना अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलाचे ज्ञान आहे. खान्देशातील पाहणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या बाबतीत पीक रचनेतील बदलाचा निर्देशांक ५१.८७ टक्के आहे. म्हणजेच ५१.८७ टक्के शेतकऱ्यांनी पीक रचनेत बदल केला आहे.

१५. जिल्हानिहाय पाहणी केली असता जळगाव जिल्ह्याच्या आर्थिक घटकांच्या बदलाच्या माहितीचा निर्देशांक ७३.३९ टक्के आहे. तसेच पीक रचनेत केलेल्या बदलाचा निर्देशांक ५५.३० टक्के आहे. म्हणजेच जळगाव जिल्ह्यातील पाहणी केलेल्या ७३.३९ टक्के शेतकऱ्यांना आर्थिक घटकात झालेल्या बदलाचे ज्ञान होते व ५५.३० टक्के शेतकऱ्यांनी आपल्या पीकरचनेत बदल केला असे दिसून येते. खान्देशाच्या प्रमाणापेक्षा जळगाव जिल्ह्याचे वरील दोन्ही घटकांच्या बाबतीतील (ज्ञान व पीकरचनेतील बदल) प्रमाण

अधिक होते. धुळे जिल्ह्यातील पाहणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ६८.०२ टक्के शेतकऱ्यांना आर्थिक घटकातील बदलाचे ज्ञान होते तर ४८.५३ टक्के शेतकऱ्यांनी पीक पध्दतीत बदल केला. नंदुरबार जिल्ह्याच्या बाबतीत हे प्रमाण अनुक्रमे ६७.७० टक्के व ५१.७७ टक्के आहे. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील पाहणी केलेल्या शेतकऱ्यांना बदलाचे ज्ञान व पीक पध्दतीतील बदल यांचा निर्देशांक खान्देशातील निर्देशांकापेक्षा कमी आहे.

१६. खान्देशात आर्थिक सुधारणांच्या कालावधीत ज्या विविध घटकांमध्ये बदल झाला त्यांच्या ज्ञानाचे प्रमाण आणि त्यामुळे पीक रचनेत केलेला बदल यामध्ये सर्वात जास्त प्रमाण शेती व्यापारी तत्त्वावर केली जाऊ लागली. त्यानंतर अनुक्रमे शेती व्यवसायात रोजगाराच्या संधीत वाढ झाली, ग्रामीण भागात मजुरांची संख्या कमी झाली, शेतमालाच्या किंमतीतील बदल आणि शेतीच्या यांत्रिकीकरणातील वाढ हे प्रमुख घटक दिसून येतात.

१७. खान्देशचा माहिती निर्देशांक ६९.७०टक्के असून पीकरचनेतील बदलाचा अवलंबन निर्देशांक ५१.८७ टक्के आहे. सीमांत शेतकऱ्यांपैकी ६१.१० टक्के शेतकऱ्यांना आर्थिक बदलाची माहिती होती व त्यामुळे ४५.८८ टक्के शेतकऱ्यांनी पीक रचनेत बदल केले. लहान शेतकऱ्यांपैकी ६४.०७ टक्के शेतकऱ्यांना बदल माहीत होते व ४८.०९ टक्के शेतकऱ्यांनी पीक रचनेत बदल केला. मध्यम शेतकऱ्यांच्या बाबतीत ज्ञान निर्देशांक ७१.३७ टक्के असून अवलंबन निर्देशांक ५३.११ टक्के आहे. मोठ्या शेतकऱ्यांच्या बाबतीत हेच निर्देशांक अनुक्रमे ७८.१४ टक्के व ५७.५२ टक्के एवढे आहेत. एकंदरीत धारणक्षेत्राच्या वाढीबरोबर आर्थिक घटकांच्या बदलाचे ज्ञान व त्यामुळे पीकरचनेत केलेला बदल यांचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसून आले.

१८. खान्देशात आर्थिक सुधारणांच्या कालावधीत ज्या विविध घटकांमध्ये बदल झाला त्याच्या ज्ञानाचे प्रमाण आणि त्यामुळे पीक रचनेत केलेला बदल यामध्ये सर्वात जास्त प्रमाण शेती व्यापारी तत्त्वावर केली जाऊ लागली. खान्देशातील पाहणी केलेल्या ८८ टक्के शेतकऱ्यांना या घटकाचे ज्ञान असून त्यामुळे ७६.४१ टक्के शेतकऱ्यांनी पीक रचनेत बदल केला आहे. पाहणी केलेल्या मोठ्या व मध्यम शेतकऱ्यांना शेती व्यापारी तत्त्वावर केली जाऊ लागली या घटकाचे असलेले ज्ञान (अनुक्रमे ९६.२५ टक्के व ९१.१४ टक्के) व त्यामुळे पीक रचनेत केलेला बदल (अनुक्रमे ८७.६४ टक्के व ७७.५० टक्के) यांचे प्रमाण खान्देशाच्या प्रमाणापेक्षा (अनुक्रमे ८८ टक्के व ७६.४१ टक्के) जास्त आहे तर पाहणी केलेल्या लहान व सीमांत शेतकऱ्यांना या घटकांचे असलेले ज्ञान (अनुक्रमे ८१.५७ टक्के व ७८.७२ टक्के) व त्यामुळे पीक रचनेत केलेला बदल (अनुक्रमे ६९.४१ टक्के व ६५.२५ टक्के) यांचे प्रमाण कमी आहे.

१९. खान्देशातील पाहणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी खंडीत वीजपुरवठा हा अडथळा सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे

प्रमाण सर्वाधिक असून त्यानंतर अनुक्रमे मजूरांची कमतरता, सिंचनासाठी पाण्याची कमी उपलब्धता, आर्थिक प्रेरणेचा अभाव, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव, भांडवलाचा अभाव, संपर्क माध्यमांचा अपुरा वापर, धारणक्षेत्र लहान, आदानांच्या जास्त किमती, विस्तार सेवांची अपूर्णता, पीक व इतर विम्याच्या माहितीचा अभाव, कर्ज आणि अनुदानाच्या स्त्रोताच्या माहितीचा अभाव, हरितगृहांची अनुपलब्धता, सामाजिक मूल्य/रुढी परंपरांचा प्रभाव, सहकारी पतसंस्थांकडून अपुरा कर्जपुरवठा, दूरदृष्टीचा अभाव, शीतगृहांचे अंतर व भाडे जास्त, पुढाकाराचा अभाव, साठवणूक व शीतगृह उपलब्ध नसणे आणि उत्साह/उत्स्फूर्ततेचा अभाव हे प्रमुख घटक दिसून येतात.

२०. खान्देशात ज्वारी पिकाव्यतिरिक्त इतर सर्व तृणधान्यांच्या बाबतीत बागायती क्षेत्रातील हेक्टरी उत्पादकता जिरायती क्षेत्रापेक्षा अधिक असल्याने दिसून आले.

२१. खान्देशात कडधान्यांपैकी तूर व उडदाची जिरायती क्षेत्रातील हेक्टरी उत्पादकता जास्त तर मूग व हरभरा पिकाची बागायती क्षेत्रातील उत्पादकता जास्त आहे.

२२. खान्देशात गळीत धान्याची हेक्टरी उत्पादकता जिरायती क्षेत्रापेक्षा बागायती क्षेत्रात जास्त आहे.

२३. बहुतेक सर्व पिकांच्या बाबतीत मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांची दर हेक्टरी उत्पादकता तुलनेने जास्त असल्याचे दिसून आले.

२४. बाजरी, मका, उडीद, भूईमुग, सोयाबीन, सूर्यफूल, केळी, ऊस या पिकांची उत्पादकता जळगाव जिल्ह्यात तुलनेने जास्त, तर तूर, तीळ, कांदा, मिरची, भाजीपाला व फळे या पिकांच्या उत्पादकतेबाबत धुळे जिल्हा आघाडीवर आहे. ज्वारी, तांदूळ, गहू, मूग, हरभरा व कापूस या पिकांची उत्पादकता नंदूरबार जिल्ह्यात तुलनेने जास्त आहे.

२५. खान्देशातील पाहणी केलेल्या शेतकऱ्यांनी आर्थिक सुधारणांमुळे त्यांची उत्पादकता वाढली किंवा नाही यांची पाहणी करण्यात आली. संपूर्ण खान्देशाचा विचार केला तर पाहणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ८६ टक्के शेतकऱ्यांनी उत्पादकता वाढल्याचे सांगितले. जिल्हानिहाय विचार केला असता जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील पाहणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी उत्पादकता वाढली असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे ८८ टक्के, ८६ टक्के व ८४ टक्के होते. एकंदरीत जळगाव जिल्ह्यातील उत्पादकतेत वाढ झाली असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण खान्देशाच्या प्रमाणापेक्षा जास्त तर नंदुरबार जिल्ह्याचे प्रमाण कमी आहे. धुळे जिल्ह्याचे व खान्देशचे प्रमाण समान असल्याचे दिसून येते. खान्देशातील तसेच खान्देशांतर्गत येणाऱ्या जळगाव, धुळे व नंदुरबार या तीनही जिल्ह्यातील उत्पादकतेत वाढ झाली असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण लक्षणीय असल्याचे दिसून आले.

२६. धारणक्षेत्रनिहाय विचार केला असता पाहणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी आर्थिक सुधारणांमुळे उत्पादकतेत

वाढ झाली असे सांगणाऱ्यांमध्ये मोठ्या शेतकऱ्यांचे प्रमाण (९७.७५ टक्के) तुलनेने सर्वात जास्त असून त्यानंतर मध्यम शेतकरी (९६.२० टक्के), लहान शेतकरी (८८.२४ टक्के) व शेवटी सीमांत शेतकरी (४२.५५ टक्के) असा क्रम दिसून येतो. मोठ्या, मध्यम व लहान शेतकऱ्यांचे हे प्रमाण खान्देशाच्या (८६ टक्के) प्रमाणापेक्षा अधिक तर सीमांत शेतकऱ्यांचे कमी असल्याचे निदर्शनास येते.

२७. आर्थिक सुधारणांमुळे जिल्हानिहाय उत्पादकता निर्देशांकाचा विचार केला असता सर्वाधिक उत्पादकता जळगाव जिल्ह्याची (७२.६ टक्के) वाढली असून त्यानंतर धुळे जिल्हा (७२.४ टक्के) व नंदुरबार जिल्हा (७०.८ टक्के) असा क्रम लागतो. जळगाव व धुळे जिल्ह्यातील आर्थिक सुधारणांमुळे उत्पादकतेत झालेली वाढ खान्देशाच्या (७१.९३ टक्के) वाढीपेक्षा जास्त तर नंदुरबार जिल्ह्यातील कमी आहे. खान्देश विभाग तसेच खान्देशांतर्गत येणाऱ्या जळगाव, धुळे व नंदुरबार या तीनही जिल्ह्यांतील आर्थिक सुधारणांमुळे उत्पादकतेत झालेल्या वाढीचा निर्देशांक म्हणजेच उत्पादकतेतील वाढ लक्षणीय असल्याचे दिसून येते.

२८. धारणक्षेत्रनिहाय उत्पादकता निर्देशांकाची पाहणी केली असता आर्थिक सुधारणांमुळे खान्देशातील पाहणी केलेल्या मोठ्या शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत (७९.६ टक्के) तुलनेने सर्वाधिक वाढ झालेली असून त्यानंतर अनुक्रमे मध्यम शेतकरी (६१.६ टक्के), लहान शेतकरी (५४.२ टक्के) व सीमांत शेतकरी (२०.४ टक्के) असा क्रम दिसून येतो.

२९. मोठ्या, मध्यम, लहान व सीमांत या सर्व शेतकऱ्यांच्या शेतावर कापूस या पिकासाठी लागलेले एकूण श्रमदिवस तुलनेने सर्वाधिक असून त्यानंतर अनुक्रमे ऊस, ज्वारी, गहू, भूईमुग, हरभरा, मका, मूग, केळी आणि बाजरी या पिकांसाठी लागलेले एकूण श्रमदिवस तुलनेने जास्त आहेत. मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतीवर तुलनेने अधिक श्रमदिवस निर्माण होणे अपेक्षित असले तरी सीमांत व लहान शेतकऱ्यांच्या तुलनेत मोठे व मध्यम शेतकरी श्रमप्रधान नगदी पिकांकडे झुकल्याचा हा परिणाम आहे.

३०. आर्थिक सुधारणांच्या कालखंडात पीक रचनेतील बदलामुळे जळगाव जिल्ह्यातील रोजगारात वाढ झाली आहे असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण (८६ टक्के) खान्देशातील (८१.३४ टक्के) प्रमाणापेक्षा जास्त तर नंदुरबार (८० टक्के) व धुळे (७८ टक्के) जिल्ह्याचे प्रमाण कमी आहे.

३१. आर्थिक सुधारणांच्या कालावधीत पीक रचनेतील बदलामुळे रोजगारात वाढ झाली असे सांगणाऱ्या मोठ्या (९६.६२ टक्के) व मध्यम (९४.९४ टक्के) शेतकऱ्यांचे प्रमाण खान्देशाच्या (८१.३४ टक्के) प्रमाणापेक्षा जास्त तर लहान (७४.१२ टक्के) व सीमांत (४२.५५ टक्के) शेतकऱ्यांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. सीमांत व लहान शेतकऱ्यांचा अपवाद वगळता मध्यम व मोठ्या शेतकऱ्यामध्ये तसेच खान्देश विभागामध्येही रोजगारात वाढ झाली असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे.

■ **उपाययोजना:**

१. कृषी क्षेत्रातील एकूण गुंतवणूकीचे प्रमाण स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या तुलनेत अत्यल्प आहे. कृषीक्षेत्राच्या जलद विकासासाठी कृषी क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण वाढले पाहिजे. त्यातही खाजगी गुंतवणुकीच्या तुलनेत सरकारी गुंतवणूक (२४ टक्के दरम्यान) कमी आहे. कृषीक्षेत्रातील शासकीय गुंतवणुकीचे प्रमाण भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात वाढणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र राज्यात व खान्देशात स्थूल सिंचनाखालील क्षेत्राचे स्थूल लागवडीखालील क्षेत्राशी असणारे प्रमाण अजूनही कमी आहे. त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी सिंचन प्रकल्पाच्या निर्मिती बरोबरच सिंचनाच्या आधुनिक तंत्राचा (तुषार व ठिबक सिंचन) वापर वाढण्यासाठी प्रोत्साहनात वाढ केली पाहिजे. तसेच भूमी व जलव्यवस्थापनाच्या आधुनिक तंत्राचा वापर वाढला पाहिजे.

३. आर्थिक सुधारणांच्या कालावधीत ज्या आर्थिक घटकात बदल झाले त्यामुळे साधारणत: ५२ टक्के शेतकऱ्यांनी पीक रचनेत बदल केल्याचे आढळले. मात्र उर्वरित शेतकऱ्यांना आर्थिक सुधारणांची माहिती मिळवून घेणे व त्याचे अनुकरण करणे यात अनेक अडथळे आले. या अडथळ्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने पुढील उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात:

- शेतीच्या उत्पादकतेत वाढ होण्यासाठी ग्रामीण भागात अखंडित व शक्य तितक्या अधिक काळासाठी वीजपुरवठा होणे गरजेचे आहे.
- शेतीत निर्माण होणाऱ्या रोजगारांचे स्वरुप हंगामी असते. त्यामुळे ग्रामीण मजूर शहराकडे स्थलांतरित होतात व शेतीमध्ये मजूरांच्या तुटवड्याची समस्या निर्माण होते. त्याकरिता हंगामा व्यतिरिक्तच्या कालावधीत ग्रामीण भागात इतर क्षेत्रात रोजगार निर्माण होईल या दृष्टीने शासकीय पातळीवर प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे.
- आर्थिक सुधारणांमुळे पीकरचनेत बदल करण्यासाठी शेतीत मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज निर्माण झाली आहे. परंतु आजही वित्तसंस्थांमार्फत पुरेसा भांडवल पुरवठा होत नाही. म्हणून किफायतशीर व योग्य वेळी पुरेसा भांडवल पुरवठा करण्यासाठी ग्रामीण भागात संस्थात्मक पातळीवर वित्तसंस्थांचे जाळे सुदृढ करणे गरजेचे आहे.
- कृषी विस्तार सेवा व संपर्क माध्यमांचा अपुरा वापर होत असल्याने अनेक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. त्यासाठी कृषी विस्तार कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. तसेच संपर्क माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीविषयीच्या उपयुक्त सूचना मोफत व वेळेवर देण्याची योजना करावी.
- नंदुरबारसारख्या मागासलेल्या जिल्ह्यात कृषी मालावरील प्रक्रिया उद्योगांची कमतरता आढळून आली त्यामुळे ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग सुरू झाले तर हंगामा व्यतिरिक्तच्या काळात ग्रामीण जनतेला रोजगार निर्माण होईल तसेच शेतमालाला किफायतशीर भावही मिळेल.
- धारणक्षेत्र लहान असल्यामुळे अनेक शेतकरी शेतीव्यवसायात नवीन उपक्रम राबवित नाहीत. अशा वेळी सहकारी तत्त्वावरील शेतीस प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

National Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२९४
मो.९०११३३९९०६

डॉ.अविनाश निकम
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

# शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा तौलनिक अभ्यास

**सुरेश ढाके**, जळगाव, अर्थशास्त्र विभागप्रमुख, कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे
**अशोक खाचणे**, जळगाव, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय

## ■ प्रस्तावना:

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान असून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शेतीमध्ये काम करणाऱ्या शेतमजुराला आज मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. शेती क्षेत्राव्यतिरिक्त इतर बऱ्याच व्यवसायांमध्ये श्रमिकांच्या संघटना स्थापन झालेल्या आहेत. परंतु शेती क्षेत्राचे आकारमान बघता शेती क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शेतमजुरांच्या आजपर्यंत संघटना स्थापन झालेल्या नाहीत. शेतमजूर असंघटित असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती सापेक्षेतेने कमी आहे त्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे दिसून येते. म्हणून समाजात त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

केंद्रीय सांख्यिकी संघटनेच्या मते (CSO) बाजारासाठी उत्पादन करणाऱ्या ज्या उपक्रमांमध्ये विजेचा वापर होतो, त्या ठिकाणी १० पेक्षा कमी व ज्या उपक्रमांमध्ये विजेचा वापर होत नाही, त्या ठिकाणी २० पेक्षा कमी कामगार काम करतात ते असंघटित क्षेत्र होय.

मुक्ताईनगर तालुका हा जळगांव जिल्ह्यातील कृषीप्रधान तालुका असून हतनूर धरणामुळे अलिकडील काळात मुक्ताईनगर तालुक्यातील शेतीचा कायापालट झाला आहे. बागायती क्षेत्रात वाढ झाल्यामुळे व शेतीला आधुनिकतेची जोड मिळाल्यामुळे शेतीच्या उत्पादन क्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. शेतमजुरांना बाराही महिने रोजगार मिळून त्यांच्याही उत्पन्नात वाढ झालेली दिसते. परंतु असे असले तरी अलिकडे एका बाजूला शेतमजुरांच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसते तर दुसऱ्या बाजूला त्यांना अनेक आर्थिक समस्या भेडसावतांना दिसतात. या गोष्टीचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

## ■ उद्दिष्टे:

१) शेतमजुरांच्या कामाच्या दिवसातील बदलांचा अभ्यास करणे.

२) शेतमजुरांच्या मजुरीच्या दरातील बदलांचा अभ्यास करणे.

३) शेतमजुरांच्या वार्षिक उत्पन्नातील बदलांचा अभ्यास करणे.

४) शेतमजुरांच्या राहणीमानातील बदलांचा अभ्यास करणे.

५) शेतमजुरांच्या आर्थिक समस्यांचा व त्यावरील उपायांचा अभ्यास करणे.

■ **गृहितके:**

१) बागायती क्षेत्रात वाढ झाल्यास शेतमजुरांच्या मजुरीत वाढ होते.

२) उत्पन्नात वाढ झाल्यास व्यक्ती सुखद वस्तूचा उपभोग वाढवितात.

३) शेतमजुरांना अनेक आर्थिक व सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

■ **संशोधन पध्दती:**

मुक्ताईनगर तालुक्यात २००१ च्या जनगणनेनुसार ७९ गावे होती यापैकी ३०% म्हणजे जवळ जवळ २५ गावांची क्षेत्रीय संशोधनासाठी यादृच्छिक (Random) नमुना निवड पध्दतीने निवड केली. निवड केलेल्या या २५ गावांमधून प्रत्येकी ६ अशा एकूण १५० शेतमजुरांची यादृच्छिक पध्दतीने नमुना म्हणून निवड केली. यात ६२ पुरुष,६९ स्त्रिया व १९ मुले (१८ वर्षाच्या आतील) असे प्रमाण होते.

प्रस्तुत शोध निबंधात बहुतांशी माहिती प्रश्नावलीच्या आधारे गोळा करण्यात आलेली असून अशा माहितीला व आकडेवारीला प्रश्नावलीचा आधार आहे. या अभ्यासासाठी २००० ते २०१० पर्यंतचा कालखंड विचारात घेतला आहे. काही तक्त्यांमध्ये गटागटाने माहिती दिलेली आहे. या प्रत्येक गटाची कमाल मर्यादा त्या-त्या गटात समाविष्ट केलेली आहे.

■ **शेतमजुरांच्या कामाच्या दिवसातील बदल:**

**तक्ता क्र. १**

**शेतमजुरांना वर्षभरात काम मिळत असलेले सरासरी दिवस**

| अ.क्र. | कामाचे दिवस | मजुरांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | २००० | २०१० |
| १ | १२० - १८० (४ ते ६ महिने) | ५७(३८ %) | २१ (१४ %) |
| २ | १८० - २४० (६ ते ८ महिने) | ५५(५० %) | २७ (१८ %) |
| ३ | २४० - ३०० (८ ते १० महिने) | १८(१२ %) | २४ (१६ %) |
| ४ | ३०० पेक्षा जास्त(१० महिन्यांपेक्षा जास्त) | १८(१२ %) | २४ (१६ %) |

*(सूची - कंसातील आकडे एकूण १५० शेतमजुरांशी % प्रमाणे दर्शवितात.)*
*(आधार - प्रश्नावलीवरुन)*

तक्ता क्र.१ मध्ये शेतमजुरांना वर्षभरात सरासरीने किती दिवस काम मिळत होते याचे विवरण दिले आहे. या तक्त्यावरुन पुढील निष्कर्ष निघतात.

वर्षभरात ४ ते ८ महिने काम मिळणाऱ्या शेतमजुरांच्या प्रमाणात २००० च्या तुलनेत २०१० ला घट झालेली दिसते. मात्र ८ महिन्यापेक्षा जास्त दिवस काम मिळणाऱ्या शेतमजुरांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झालेली दिसते. याचा अर्थ असा की, २००० च्या तुलनेत २०१० ला शेतमजुरांना वर्षभरात जास्त काम मिळत आहे व हा बदल शेती क्षेत्राच्या रोजगार पुरविण्याच्या क्षमतेत झालेली वाढ दर्शवितो.

क्षेत्रिय संशोधनावरुन असे दिसते की, क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या १५० शेतमजुरांना २००० ला वर्षभरात सरासरी २०३.६ दिवस काम मिळाले होते. मात्र २०१० ला वर्षभरात सरासरी २९७.८ दिवस काम मिळाले होते. याचा अर्थ असा की, २००० च्या तुलनेत २०१० ला कामाच्या दिवसात ४७.२७ % वाढ झालेली दिसते.

तसेच क्षेत्रिय संशोधनावरुन असेही दिसते की, निवड केलेल्या १५० शेतमजुरांपैकी २००० ला एकाही शेतमजुरास वर्षभर काम मिळाले नव्हते. मात्र २०१० ला ७८(५२%) शेतमजूर असे होते की, ज्यांना वर्षभर शेतीत काम मिळाले होते.

वरील सर्व विश्लेषणावरुन एक गोष्ट लक्षात येते की, मुक्ताईनगर तालुक्याच्या शेती क्षेत्रात हतनूर धरणाच्या जलाशयामुळे सुधारणात्मक बदल होऊन शेती क्षेत्राच्या रोजगार पुरविण्याच्या क्षमतेत वाढ झालेली दिसते.

- **शेतमजुरांना मिळणाऱ्या सरासरी शेतमजुरीत झालेला बदल:**

**तक्ता क्र. २**

**शेतमजुरांना मिळणारी सरासरी मजुरी**

| शेतमजूर | २००० | २०१० | शेकडा बदल ( वाढ) |
|---|---|---|---|
| स्त्री | २० | ८० | ३००.०० % |
| पुरूष | ३५ | ११० | २१४.२८% |
| मुले (अठरा वर्षांच्या आतील) | १५ | ६० | ३००.००% |

*(आधार - प्रश्नावलीवरुन )*

- **तक्ता क्र.२ वरुन पुढील निष्कर्ष निघतात:**

क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या स्त्री शेतमजुरांना मिळणाऱ्या मजुरीत २००० ते २०१० या कालावधीत २० रुपयावरुन ८० रु. ( ३०० %) वाढ झाली. पुरुष शेतमजुरांना मिळणाऱ्या शेतमजुरीत याच कालावधीत ३५ रुपयांवरुन ११० रु. (२१४.२८ %) पर्यंत वाढ झाली. तर १८ वर्षाच्या आतील (मुले ) शेतमजुरांना मिळणाऱ्या शेतमजुरीत वरील कालावधीत १५ रुपयांवरुन ६० रु. (३०० %) वाढ झाली.

थोडक्यात २००० ते २०१० या ११ वर्षाच्या कालखंडात सर्वच शेतमजुरांच्या मजुरीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. विशेष म्हणजे या ११ वर्षाच्या कालखंडात स्त्री व लहान मुले या गटातील शेतमजुरांच्या तुलनेत पुरुष शेतमजुरांच्या मजुरीत कमी प्रमाणात वाढ झालेली दिसते. या कालखंडात सर्वच शेतमजुरांच्या मजुरीत सरासरीने २७१.४३% वाढ झालेली दिसते.

महाराष्ट्र शासनाच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत २००९-२०१० या वर्षात मजुरांना मिळणारी मजुरी किमान वेतन कायद्यानुसार पुरुष व स्त्रिया दोघांनाही १०५ रु. निश्चित करण्यात आली आहे. संशोधन क्षेत्रात पुरुष शेतमजुरांना मिळणारी सरासरी मजुरी ११० रु. आहे. तसेच स्त्री मजुरांना संशोधन क्षेत्रात मिळणारी सरासरी मजूरी ८० रु. आहे. म्हणजेच स्त्री शेतमजुरांना किमान वेतन कायद्यानुसार निश्चित केलेल्या मजुरीपेक्षा खुपच कमी मजुरी मिळत असल्याचे दिसते. याचाच अर्थ संशोधन क्षेत्रात स्त्री शेतमजुरांचे आर्थिक शोषण होत असल्याचे दिसून येते.

■ **शेतमजुरांच्या वार्षिक उत्पन्नातील बदल:**

**तक्ता क्र. ३**

**निवड केलेल्या शेतमजुरांना वर्षभरात मिळालेले उत्पन्न** (रुपयात)

| अ.नं. | शेतमजूर | एकूण वार्षिक उत्पन्न | | सरासरी वार्षिक उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| | | २००० | २०१० | २००० | २०१० |
| १ | पुरूष | ४,४१,८१२ | २०,३०,९९६ | ७,१२६ | ३२,७५८ |
| २ | स्त्री | २,८०,९६८ | १४,७७,०८८ | ४,०७२ | २३,८२४ |
| ३ | बाल कामगार | ५८,०२६ | ३,३९,४९२ | ३,०५४ | १७,८६० |
| | एकूण | ७,८०,८०६ | ३८,४७,५७६ | | |

*आधार: १) तक्ता क्र.२, २) प्रश्नावलीवरुन*

तक्ता क्र. ३ क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या शेतमजुरांना वर्षभरात मिळालेले एकूण व सरासरी उत्पन्न दिलेले आहे. यावरुन पुढील निष्कर्ष निघतात.

१) क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या पुरुष शेतमजुरांना २००० मध्ये एकूण ४,४१,८१२ रुपये उत्पन्न मिळाले होते,२०१० ला या उत्पन्नात वाढ होऊन ते २०,३०,९९६ रुपये पर्यंत वाढलेले दिसते.

२) महिला मजुरांचे एकूण वार्षिक उत्पन्न २००० ते २०१० या कालखंडात २,८०,९६८ रुपयांवरुन १४,७७,०८८ रुपयांपर्यंत वाढलेले दिसते.

३) बाल मजुरांचे एकूण वार्षिक उत्पन्न वरील ११ वर्षाच्या कालखंडात ५८,०२६ रुपयांवरुन ३,३९,४९२ रुपयापर्यंत वाढलेले दिसते.

४) सर्व मजुरांना मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न सुध्दा या कालखंडात ७,८०,८०६ रुपयांवरुन ३८,४७,५७६ रुपये पर्यंत वाढलेले दिसते.

५) प्रत्येक मजुरास दर वर्षाला मिळणाऱ्या सरासरी उत्पन्नातसुध्दा बदल झालेले दिसतात. ते बदल खालीलप्रमाणे
(अ) प्रत्येक पुरुष मजुरास मिळणारे सरासरी वार्षिक उत्पन्न या ११ वर्षाच्या कालखंडात रु.७१२६ वरुन रु.३२,७५८ (३५९.७०%)पर्यंत वाढलेले दिसते.
(ब) प्रत्येक स्त्री मजुरास मिळणारे सरासरी वार्षिक उत्पन्न या ११ वर्षाच्या कालखंडात रु.४,०७२ वरुन रु.२३,८२४ (४८५.०७%) पर्यंत वाढलेले दिसते.
(क) प्रत्येक बाल मजुराला मिळणारे सरासरी वार्षिक उत्पन्न या ११ वर्षाच्या कालखंडात रु.३,०५४ वरुन रु.१७,८६० (४४८.८०%) पर्यंत वाढलेले दिसते.

थोडक्यात २००० च्या तुलनेत २०१० ला सर्व शेतमजुरांच्या एकूण व सरासरी उत्पन्नात लक्षणीय वाढ झालेली दिसते. कामाच्या दिवसातील व मुजरीच्या दरातील वाढीमुळे शेतमजुरांच्या एकूण व सरासरी उत्पन्नात वाढ झालेली दिसते.

■ **शेतमजुरांचा सुखद वस्तूंच्या वापरात झालेला बदलः**

**तक्ता क्र. ४**

**शेतमजुरांकडील सुखद वस्तूंचे वर्गीकरण**

| अ.नं. | वस्तूंचे नांव | शेतमजुरांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | २००० | २०१० |
| १ | रेडिओ | २६( १७.३३ ) | १० ( ६.६७ ) |
| २ | टेप रेकॉर्डर | २२ ( १४.६७ ) | ८ ( ५.३३ ) |
| ३ | टिव्ही (कृष्ण धवल) | १४ ( ९.३३ ) | २ ( १.३३ ) |
| ४ | रंगीत टिव्ही | ०० ( ०० ) | १०० ( ६६.६७ ) |
| ५ | डीव्हीडी | ०० ( ०० ) | ७५ ( ५० ) |
| ६ | डीश टिव्ही | ०० ( ०० ) | ८० ( ५३.३३ ) |
| ७ | मोबाईल | ०० ( ०० ) | १०० (६६.६७ ) |
| ८ | मिक्सर | १० ( ६.६७ ) | ७० ( ४६.६७ ) |
| ९ | स्वयंपाकाचा पेट्रोलियम गॅस | ०५ ( ३.३३ ) | ६० ( ४० ) |
| १० | इलेक्ट्रीक पंखा | २९ ( १९.३३ ) | १२५ ( ८३.३३ ) |
| ११ | सायकल | ४० ( २६.६७ ) | ८० ( ५३.३३ ) |
| १२ | मोटार सायकल | ०० ( ०० ) | ५ ( ३.३३ ) |

*सूची: कंसातील आकडे एकूण १५० शेतमजुरांशी शेकडा प्रमाण दर्शवितात.*
*आधारः प्रश्नावलीवरुन.*

तक्ता क्र. ४ वरुन पुढील निष्कर्ष निघतात:

१) क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या १५० शेतमजुरांपैकी रेडिओचा उपभोग घेणाऱ्या शेतमजुरांची संख्या २००० ते २०१० या कालखंडात २६(१७.३३%) वरुन १०(६.६७%) पर्यंत घटलेली दिसते. तर टेपरेकॉर्डरचा उपभोग घेणाऱ्या शेतमजुरांची ही संख्या २२(१४.६७%) वरुन ८(५.३३%) पर्यंत कमी झालेली दिसते.

२) नमुना निवड केलेल्या शेतमजुरांपैकी टि.व्ही.(कृष्ण धवल) चा वापर करणाऱ्यांची संख्या वरील कालखंडात १४(९.३३%) वरुन २(१.३३%) पर्यंत घटलेली दिसते. तर रंगित टि.व्ही. चा वापर करणाऱ्यांची संख्या ०(० %) वरुन १००(६६.६७ %) पर्यंत वाढलेली दिसते.

३) नमुना निवड केलेल्या शेतमजुरांपैकी डी.व्ही.डी. चा वापर करणाऱ्यांची संख्या वरील कालखंडात ०(०%) वरुन ७५ (५०%) पर्यंत वाढलेली दिसते. तर डिश टि.व्ही. चा वापर करणाऱ्यांची संख्या ०(०%) वरुन ८०(५३.३३ %) पर्यंत वाढलेली दिसते.

४) नमुना निवड केलेल्या शेतमजुरांपैकी मोबाईल फोन चा वापर करणाऱ्यांची संख्या वरील कालखंडात ०(०%) वरुन १०० (६६.६७%) पर्यंत वाढली.

५) नमुना निवड केलेल्या शेतमजुरांपैकी स्वयंपाकासाठी पेट्रोलियम गॅस चा वापर करणाऱ्यांची संख्या ५ (३.३३ %) वरुन ६०(४० %) पर्यंत वाढले तर मिक्सर-ग्राईंडरचा वापर करणाऱ्यांची संख्या १०(६.६७%) वरुन ७०(४६.६७%) पर्यंत वाढले.

६) नमुना निवड केलेल्या शेतमजुरांपैकी इलेक्ट्रीक पंख्यांचा वापर करणाऱ्यांची संख्या वरील कालावधीत २९(१९.३३%) वरुन १२५(८३.३३ %) पर्यंत वाढले.

७) नमुना निवड केलेल्या शेतमजुरांपैकी सायकलचा वापर करणाऱ्यांची संख्या वरील कालावधीत ४०(२६.६७%) वरुन ८०(५३.३३%) पर्यंत वाढली. तर मोटारसायकलचा वापर करणाऱ्यांची संख्या ०(०%) वरुन ५(३.३३%) पर्यंत वाढली.

थोडक्यात असे म्हणता येईल की, २००० च्या तलुनेत २०१० ला शेतमजुरांचा वेगवेगळ्या वस्तूंच्या उपभोगाकडे कल वाढत चाललेला आहे. परिणामी शेतमजुरांकडील सुखद उपभोग्य वस्तूंचे प्रमाण वाढत चालले आहे. तसेच रेडीओ, टेप रेकॉर्डर, साधा टिव्ही, डीश टिव्ही, डीव्हीडी, मोबाईल, मिक्सर, गॅस, इलेक्ट्रीक पंखा, सायकल, मोटार सायकल यासारख्या अत्याधुनिक सुखद वस्तूंचे प्रमाणही लक्षणीय वाढलेले आहे. ही बाब शेतमजुरांच्या राहणीमानात भर पडलेली आहे याचे द्योतक आहे.

१९९३-९४ हे मूळ वर्ष(१००) मानल्यास २००० ला किंमत निर्देशांक १५५.७ होता, हा निर्देशांक २०१० पर्यंत २५८.१० पर्यंत वाढला. याचा अर्थ असा की २००० ते २०१० या कालखंडात किंमत निर्देशांक हा ६५.७७% वाढला तर याच कालावधीत शेतमजुरांच्या सरासरी मजुरीत झालेली वाढ २७१.४३ % आहे. शेतमजुरांच्या सरासरी मजुरीतील वाढीमुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा झालेली दिसते. म्हणूनच ते सुखद वस्तूंच्या उपभोगाकडे वळलेले दिसतात. परंतु असे असले तरी एक बाब मात्र लक्षात घेण्यासारखी आहे की २०१० ला सुध्दा २५ (१६.६७% ) शेतमजूर असे आहेत की जे वरीलपैकी एकाही वस्तूंचा उपभोग घेत नाही ही गंभीर बाब संशोधनातून लक्षात आली.

■ **निष्कर्ष:**

१) २००० ते २०१० या कालखंडात शेतमजुरांच्या कामाच्या सरासरी दिवसात लक्षणीय वाढ झालेली दिसते. तसेच २००० च्या तुलनेत २०१० ला ७८(५२%) शेतमजूर असे होते की, त्यांना वर्षभर काम मिळाले होते व यामुळेच शेतमजुरांच्या उत्पन्नात वाढ होवून त्यांचे इतर क्षेत्रावरील अवलंबीत्व कमी होतांना दिसत आहे.

२) वरील कालखंडात सर्वच शेतमजुरांना मिळणाऱ्या मजुरीच्या दरात सरासरीने २७१.४३% एवढी भरघोस वाढ झालेली दिसते. ही बाब त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यास कारणीभूत ठरलेली आहे.

३) वरील कालखंडात कामाच्या दिवसात झालेली भरघोस वाढ व मजुरीच्या दरात झालेली लक्षणीय वाढ या दोन कारणांमुळे शेतमजुरांचे एकूण व सरासरी उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते.

४) वरील कालखंडात निवड केलेल्या शेतमजुरांच्या सुखद वस्तूंच्या उपभोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते.यामागील प्रमख कारणे अभ्यासातून स्पष्ट झाली ती अशी की,

(अ) शेतमजुरांच्या कामाच्या दिवसातील व मजुरीतील वाढीमुळे त्यांचे उत्पन्न वाढले व म्हणून ते सुखद वस्तूच्या उपभोगाकडे वळले.

(ब) सरकारकडून मिळणाऱ्या मदतीमुळे (स्वस्त धान्य, स्वस्त कपडा, मोफत शिक्षण, मोफत घरे, अल्प मोबदल्यात विज जोडणी, स्वस्त रॉकेल इ.) त्यांचा जिवनावश्यक वस्तूंवरील खर्च बराच कमी झाल्यामुळे ते सुखद वस्तूंच्या उपभोगाकडे वळलेले दिसतात. असे असले तरी अभ्यास क्षेत्रातील शेतमजुरांच्या काही ठळक समस्यांमुळे त्यांची स्थिती संघटित औद्योगिक कामगारांच्या तुलनेत अजूनही दयनीय आहे असे संशोधनावरुन दिसते. या समस्या पुढील प्रमाणे:

१) अभ्यासक्षेत्रात पाहणी केलेल्या शेतमजुरांपैकी जवळ जवळ ८५% शेतमजूर मागासलेल्या समाजातील आहे. अशा दलित समाजाच्या शेतमजुरांकडे पिढ्यानपिढ्या दुर्लक्ष झालेले आहे. गरिबी व निरक्षरता

यामुळे समाजात ते आपले स्थान निर्माण करु शकलेले नाही परिणामी त्यांचा सामाजिक दर्जा खूपच खालावलेला आहे.

२) अभ्यास क्षेत्रात बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतकरी शेतात बहुतांशी बारमाही कामे चालतात. असे असले तरी शेतकरी शेतमजुरांना आपल्या सोयीच्या वेळेनुसार कामावर बोलावतात. उदाहरणार्थ दिवसा विजेचे लोड शेडींग असल्यामुळे रात्री कामावर बोलावतात, बऱ्याच वेळा केळी कापणीच्या अनियमित वेळेमुळे सुध्दा शेतमजुरांच्या कामाचे तास आणि वेळ निश्चित नसतात. परिणामी शेतमजुरांना आपल्या कौटुंबिक व सामाजिक जीवनासाठी नियोजित वेळ देता येत नाही व याचा त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो.

३) संशोधन क्षेत्रातील बहुतांश शेतमजूर दलित समाजातील आहेत तर, बहुतेक शेतकरी उच्चवर्णीय व यामुळे मालक आणि मजूर यांच्यात असणारे संबंध सौहार्दपूर्ण नाहीत. मालकांकडून शेतमजुरांना बऱ्याच वेळा हीन दर्जाची वागणुक दिली जाते असे दिसते व यामुळे शेतमजूर आपला आत्मविश्वास गमावून बसलेले दिसतात.

४) संशोधन क्षेत्रातील अज्ञान व निरक्षतेचा फायदा काही दलाल घेतांना दिसतात. संशोधन क्षेत्रात काही गावांमध्ये शेतकऱ्यांना मजूर व शेतमजुरांना काम पुरविणारे दलाल निर्माण झालेले आहेत. ते शेतमजुरांना एकत्र करुन शेतकऱ्यांना मजूर पुरवितात व या कामासाठी ते शेतकऱ्यांकडून एकूण शेतमजुरीच्या १०% तर शेतमजुरांकडून एकूण मजुरीच्या १०% कमिशन घेतात यामध्ये शेतकरी आधीच १०% मजुरी शेतमजुरांना कमी देतात (उदा. १०० ऐवजी ९० रुपये) तर शेतमजुरांना मिळणाऱ्या मजूरीमधून १०% म्हणजे ९ रु. दलाल घेतो व या प्रकारे शेतमजुराला १०० रुपयांऐवजी ८१ रुपये प्रत्यक्ष हातात पडतात ही त्याची आर्थिक पिळवणुक संशोधन क्षेत्रात होताना दिसते.

५) संशोधन क्षेत्रातील शेतमजुरांपैकी बरेच शेतमजूर हे विविध व्यसनांच्या अधीन आहेत. तसेच पिढीजात दारिद्र्य व रुढी परंपरेनुसार करावे लागणारे धार्मिक विधी यामुळे त्याला खर्चासाठी वेळोवेळी कर्ज घ्यावे लागले आहेत म्हणून ते कर्जबाजारी झालेले दिसतात अशा शेतमजुरांचे प्रमाण ४८% आहे.

६) संशोधन क्षेत्रातील जवळजवळ ४८% कामगारांना बारमाही रोजगार उपलब्ध नाही असे दिसते. याचा अर्थ असा की, हंगामाच्या कालखंडातच फक्त त्यांना शेतावर काम मिळते. मात्र उर्वरित कालखंड ते रिकामे असतात. कारण संशोधन क्षेत्रात कोणताही औद्योगिक विकास न झाल्यामुळे त्यांना पर्यायी रोजगार मिळत नाही. परिणामी त्यांची आर्थिक स्थिती सापेक्षतेने खालावलेली दिसते.

७) संशोधन क्षेत्रात शेतातील हंगामाचे दिवस वगळता उर्वरित कालखंडात शेतमजुरांना कामासाठी वणवण फिरावे लागते. संशोधन क्षेत्राला लागून बऱ्हाणपूर(मध्यप्रदेश) हे शहर असल्यामुळे काही शेतमजूर तिथे

स्थलांतरित होऊन मजुरी करतात व हंगामाच्या काळात पुन्हा परत येतात असे दिसते यामुळे शेतमजुरांवर स्थलांतराचे संकट मोठ्या प्रमाणात भेडसावते. यात त्यांचा बराचसा पैसा व वेळ खर्ची होतो.

८) संशोधन क्षेत्रात शेतीची कामे करण्याची ठेकेदारी पध्दत सुरु झाली आहे. यामध्ये ठेकेदार शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन त्यांच्या शेती कामाचा ठेका विशिष्ट रकमेला सौदा करुन घेतात आणि त्या शेतात कामासाठी मजुरांना आणून ते काम करुन घेतले जाते यामध्ये ठेकेदाराच्या हाताखाली काम करणाऱ्या शेतमजुरांना जास्त तास काम करावे लागते व त्यांना कामाच्या बदल्यात मजुरी मात्र पुरेशी दिली जात नाही.

९) अलिकडे संशोधन क्षेत्रात शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर जास्त होऊ लागला आहे. उदाहरणार्थ, खोदकामासाठी जेसीबी यंत्राचा वापर, कोळपणीसाठी व फवारणीसाठी लहान ट्रॅक्टर(मित्सुबिशी) चा वापर, गव्हाची कापणी व मळणीसाठी हार्वेस्टर या यंत्रांचा वापर, नांगरणी/वखरणीसाठी मोठ्या ट्रॅक्टरचा वापर, गहू हरभऱ्याची पेरणी ट्रॅक्टरने करणे, पिकांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन व स्प्रिंकलरचा वापर इत्यादी यंत्रांचा वापर शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असल्याने शेकडो श्रमिकांचा वापर करुन जे काम काही दिवसात होणार होते ते आता या यंत्रांमुळे काही तासातच होऊ लागले आहे.परिणामी भविष्यात आधुनिकीकरणामुळे श्रमिकांना शेतीमध्ये काम मिळेल की नाही अशी भीति निर्माण झाली आहे.

१०) शेतमजुरांना म्हातारपणात काम करणे अशक्य असते. अशा वयोवृध्द शेतमजुरांचा सांभाळ त्यांची मुले करतीलच याची खात्री नसते. अशा वयोवृध्द शेतमजुरांची संख्या संशोधन क्षेत्रात खपच आहे ही एक गंभीर समस्या आहे. अशा वयोवृध्द श्रमिकांना वर्षाकाठी १००० रुपये पेन्शन सरकारने नुकतेच जाहिर केले आहे. महागाईच्या काळात वर्षभरात १००० रु. पेन्शन देणे म्हणजे शेतमजुरांची थट्टा करण्यासारखे आहे.

■ **उपाययोजना:**

१) किमान वेतन ठरवितांना सरकारने किंमत वाढीचा वास्तव विचार करुन किमान वेतन ठरवावे. हे वेतन शेतमजुरांना कायद्याने मिळेल याची व्यवस्था करावी.

२) दलालांना कायद्याच्या चौकटीत आणून दलाल पध्दती संपुष्टात आणून शेतमजुरांचे आर्थिक शोषण थांबवावे.

३) शेतमजुरांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षण प्रसार अभियान राबवावे.

४) शेतमजुरांच्या कामाच्या वेळा व तास कायद्याने निश्चित करुन द्याव्यात.

५) शेतमजुरांसाठी वृध्दापकालीन पेन्शन योजना प्रभावीरित्या अंमलात आणावी.

६) शेतमजुरांचा कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.

७) दलाल शेतमजुरांचा होणारा छळ थांबविण्यासाठी संशोधन क्षेत्रात सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन समाज प्रबोधन करावे व शेतकऱ्यांचे मन:परिवर्तन घडवून आणावे.

८) शेतमजुरांमधील व्यसनाधीनता, अंधश्रध्दा इ. कमी करण्यासाठी संशोधन क्षेत्रात सामाजिक संस्थांनी

पुढाकार घ्यावा.

९) वयोवृध्द शेतमजुरांना सरकारतर्फे किमान दरमहा १५०० रुपये पेंशन मिळणे गरजेचे आहे.

■ **संदर्भ:**


१) श्रमाचे अर्थशास्त्र - डॉ. प्रभाकर देशमुख

२) सामाजिक संशोधन पध्दती - पु. ल. भांडारकर

३) श्रम अर्थशास्त्र - डॉ. मृणालिनी फडणवीस / डॉ. प्राची देशपांडे

४) रिझर्व बँक ऑफ इंडिया बुलेटीन जुलै २०१०

५) रोजगार हमी योजना व महाराष्ट्र ग्रामीण हमी योजना मजुरीचे दरपत्रक(२००९-२०१०)

६) प्रश्नावली


**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०१० ते ३१ डिसेंबर २०१० या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी परिषदेचे कार्यवाह खजिनदार (मोबा. ८८०५६९१४०६) यांच्याशी संपर्क साधावा. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०१० ते ३१/१२/२०१० या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी परिषदेचे कार्यवाह खजिनदार (मोबा. ८८०५६९१४०६) यांच्याशी संपर्क साधावा. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

# स्त्री सबलीकरणासाठी महिला आरक्षण : एक प्रभावी मार्ग

धर्मा रानबा धेडे, कोल्हापूर
अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.

■ **प्रस्तावनाः**

न्यूयॉर्कमधील महिला शिलाई कामगारांनी आपल्या आर्थिक शोषणाविरुध्द पहिले यशस्वी आंदोलन केले तो दिवस होता ८ मार्च १८५७. पुढे एका परिषदेमध्ये महिला कम्युनिस्ट नेत्यांनी हाच दिवस **जागतिक महिला दिन** म्हणून घोषित केला. स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करुन निर्णय प्रक्रीयेत सामील करणे म्हणजेच स्त्री सबलीकरण होय. कोणत्याही देशाचा विकास आणि स्त्री सबलीकरण यांचा जवळचा संबंध आहे. भारताच्या विकासामध्ये स्त्रीच्या सबलीकरणाची आवश्यकता अनेक बाबतीत आहे. भारतामध्येही सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे ही समाधानाची बाब आहे. देशात महिलांची संख्या जवळजवळ निम्मी आहे परंतू महिलांना सर्व राजकीय पक्षांकडून अपेक्षित प्रमाणात उमेदवारी दिली जात नाही. मात्र आज महिला आरक्षणामुळे त्यांना उमेदवारी मिळून त्या निर्णय प्रक्रियेत सक्रिय होत आहेत. त्यामुळे स्त्री सबलीकरणास महिला आरक्षण हा एक प्रभावी मार्ग ठरत आहे.जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ८ मार्च १९९६ रोजी भारतातील महिलांचा स्तर उंचावण्यासाठी स्थायी समिती स्थापन करण्याचा ठराव संसदेने मंजूर केला. त्यानुसार एप्रिल १९९७ मध्ये महिला सक्षमीकरण समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या कामात महिला राष्ट्रीय आयोगाच्या शिफारशीची छाननी करणे, महिलांच्या सर्वसमावेशक शिक्षण आणि वैद्यकिय मंडळावर सेवांमध्ये व इतर क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधीत्व मिळेल याची निश्‍चिती करण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेल्या उपाययोजना तपासून पाहणे, महिला कल्याणविषयक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि समितीने प्रस्थापित केलेल्या उपाययोजनांवर केंद्र सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

■ **उद्दिष्टेः**

१) जगातील विविध देशामध्ये सर्वोच्च पदावर काम केलेल्या महिलांचा अभ्यास करणे.

२) देशाच्या विविध सभागृहातील सध्याचे ३३% महिला आरक्षण प्रमाण अभ्यासणे.

३) महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध पदांवर कार्यरत असलेल्या महिलांचे प्रमाण अभ्यासणे.

४) महिला सबलीकरणासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास करणे.

■ **गृहितकृत्ये:**

महिला आरक्षणामुळे आज विविध पदावर महिला आपला हक्क बजावत आहेत. तसेच निर्णय प्रक्रियेत त्या महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे महिला सबलीकरणास मदत होत आहे.

■ **अभ्यास पद्धती:**

महिला आरक्षण हा सध्या महत्त्वाचा विषय बनलेला आहे. त्यामुळे ***स्त्री सबलीकरणासाठी महिला आरक्षण: एक प्रभावी मार्ग*** हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे. हा शोधनिबंध प्रामुख्याने द्वितीयक स्त्रोतांवर आधारित आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी सांख्यिकीय माहिती दर्शविली आहे.

■ **महिला जागतिक नेतृत्त्व:**

संयुक्त राष्ट्र संघाने १९७६ ते १९८५ हे दशक महिलांसाठी घोषित केल्यानंतर महिलांचे सबलीकरण म्हणजे समाजाच्या व जीवनाच्या प्रत्येक कार्यात स्त्रियांचा समान वाटा हा प्रश्न संपूर्ण जगभर ऐरणीवर आला तेव्हा आजपर्यंत जगातील अग्रमानांकित महिला राज्यकर्त्या कोणत्या आहेत त्यासंबंधीची तपशीलवार माहिती पुढील तक्त्यांत दिलेली आहे.

**तक्ता क्र.१**

**महिला जागतिक नेतृत्त्व**

| अ.क्र. | महिला कार्यकर्त्यांचे नांव | देश | कालखंड | पद |
|---|---|---|---|---|
| १ | सुहबातारीन यांजमा | मंगोलिया | १९५३-५४ | प्रभारी राष्ट्राध्यक्ष |
| २ | सिरीमाओ बंदरनायके | श्रीलंका | १९६०-६५<br>१९७०-७७ | पंतप्रधान |
| ३ | इंदिरा गांधी | भारत | १९६६-७७<br>१९८०-८४ | पंतप्रधान |
| ४ | हिल्दा गिब्ज बायनोई | ग्रेनाडा | १९६७-७२ | गव्हर्नर |
| ५ | गोल्डा मायर | इस्त्रायल | १९६९-७४ | पंतप्रधान |
| ६ | मारिया इबोल पेरॉन | अर्जेंटिना | १९७४-७६ | राष्ट्राध्यक्ष |
| ७ | एलिझाबेथ डॉमिशियन | मध्य आफिक्रन रिपब्लिक | १९७५-७६ | पंतप्रधान |
| ८ | लुसिडा डा कोस्टा | नेदरलँड | १९७७ | पंतप्रधान |
| ९ | डोरिस लुईस जॉन्सन | बहामा | १९७९ | प्रभावी गव्हर्नर जनरल |
| १० | लिडिआ ग्वेयालर तेजादा | बोलिव्हिया | १९७९-८० | प्रभारी राष्ट्राध्यक्ष |
| ११ | श्रीमती प्रतिभाताई पाटील | भारत | विद्यमान | राष्ट्रपती |
| १२ | मीरा कुमार | भारत | विद्यमान | लोकसभा अध्यक्ष |
| १३ | श्रीमती सोनिया गांधी | भारत | विद्यमान | काँग्रेस अध्यक्षा |

तक्ता क्र.१ वरुन असे स्पष्ट होते की, जगातील वेगवेगळया देशातील अनेक महिला कार्यकर्त्यांनी देशातील सर्वोच्च पदावर विराजमान होण्याचा मान पटकाविला आहे हे स्त्री सबलीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊलच म्हणावे लागेल.

■ **महिला आरक्षणाचा जागतिक आढावा:**

निरनिराळया राष्ट्रांच्या संसदेमध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व कसे आणि किती प्रमाणात आहे याविषयी आकडेवारी उदबोधक ठरावी. १९४५ साली २६ राष्ट्रांच्या संसदेमध्ये अवघ्या तीन महिला प्रतिनिधी होत्या तर वरीष्ठ सभागृहात त्यांचे प्रमाण २.८% एवढे कमी होते. १९६५ साली ९४ राष्ट्रांच्या संसदेमध्ये महिलांच्या प्रमाणात अनुक्रमे ८.१ आणि ९.३% वाढ झाली.

१९८५ साली हे प्रमाण १२% आणि १२.७% इतके झाले. २००९ साली १८७ राष्ट्रांच्या संसदेमध्ये महिलांचे प्रमाण १८.८% होते तर वरीष्ठ सभागृहात महिलांची संख्या १७.३५% होती. जगातील १५ राष्ट्रांनी आपल्या देशाच्या संसदेमध्ये महिलांना ३०% प्रतिनिधीत्व दिले आहेत. संपूर्ण जगात **खांडा** हे एकमेव राष्ट्र आहे जेथील संसदेमध्ये ५६.३% महिला आहेत. **बहामा** राष्ट्रात ६०% महिलांची निवड करून नवा विक्रम करण्यात आला आहे पण हा अपवाद म्हणायला हवा. जगातील एक चतुर्थांश संसदेमध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व १०% पेक्षाही कमी आहे. पाच राष्ट्रे अशी आहेत की तेथील संसदेमध्ये महिलांचे प्रतिनिधीत्वच नाही. ज्या राष्ट्रांनी ३०% आरक्षण दिले आहे त्यापैकी ७५% राष्ट्रांनी सर्व क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविला आहे. याशिवाय राजकीय पक्षांनी महिलांना स्वेच्छेने अधिक प्रतिनिधीत्व द्यावे असेही निर्देश दिले आहेत. २००८ मध्ये जगातील महिला राष्ट्र प्रमुखांची संख्या ४.७% एवढी आहे. जगामध्ये १६% मंत्रीपदे महिलांना देण्यात आली आहेत तर १३ राष्ट्रांमध्ये एकही महिला मंत्री नाहीत. महिलांचे प्रतिनिधीत्व संसदेत वाढावे असा संदेश जागतिक परिषदेमध्ये देण्यात आला होता. महिलांसाठी निदान ३०% तरी आरक्षण असावे असेही विचार व्यक्त झाले. थोडक्यात सबलीकरणासाठी कितीही पावले उचलली तरी महिला आरक्षणाशिवाय ती निरर्थक ठरतील.

महिला नेतृत्त्वाचे सध्याचे चित्र व ३३% आरक्षणानंतरचे चित्र तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्र.२

सभागृहातील महिला नेतृत्त्व

| अ.क्र. | सभागृह | एकूण | सध्या महिलांची संख्या | ३३% आरक्षणानंतर महिलांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | लोकसभा | ५४५ | ४६ | १८० |
| २ | राज्यसभा | २५० | १८ | ८३ |
| ३ | महाराष्ट्र विधानसभा | २८८ | १२ | ९६ |
| ४ | महाराष्ट्र विधानपरिषद | ७८ | ५ | २६ |

आरक्षणामुळे महिला नेतृत्त्वाचे प्रमाण वाढून निर्णय प्रक्रियेत महिला सहभागी होत आहेत. त्यामुळे स्त्री सबलीकरणास अनुकूल वातावरण तयार होत आहे. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून आजपर्यंत लोकसभेत महिला संख्या कमी आहे हे उघड आहे. ही संख्या वाढविणे क्रमप्राप्त आहे कारण जोपर्यंत निर्णय प्रक्रियेत महिला सहभागी होत नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने देशातील ५०% महिला वर्गाचा विकास होणार नाही. आजही काही महिला आपला प्रभाव टिकवून आहेत. त्यामध्ये प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी, मायावती, जयललिता, ममता बॅनर्जी, सुषमा स्वराज, वृंदा करात, शिला दिक्षित, वसुंधरा राजे इत्यादींचा समावेश होतो परंतु ही यादी आणखी मोठी व्हायला हवी. निर्णय प्रक्रीयेत त्या सहभागी असायला हव्या तरच त्यांचा राजकारणात असण्याला अर्थ आहे. याशिवाय किरण बेदी, सानिया मिर्झा अशा अनेक महिलांनी जागतिक स्तरांवर आपले स्थान निर्माण केले आहे.

■ **महाराष्ट्रातील महिला राज्य (विधानसभा व विधान परिषद):**

महाराष्ट्र राज्यातील विधानसभा व विधान परिषदेमध्ये महिला कार्यकर्त्या अनेक सन्माननीय पदे भूषवित आहेत. त्यामुळे महिलांना राजकीयदृष्ट्या परिपक्व बनण्याची संधी मिळत असल्याने व निर्णय प्रक्रीयेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने महिला सक्षम बनत आहेत हे यावरुन सिद्ध होते. तक्ता क्र.३ मध्ये महाराष्ट्रातील महिला आमदारांचा तपशील दिलेला आहे.

तक्ता क्र.३

विधानसभा व विधान परिषदेतील महिला (महाराष्ट्र राज्य)

| अ.क्र. | महिला आमदार | संख्या |
|---|---|---|
| १ | विधानसभेतील महिला आमदार | १२ |
| २ | विधान परिषदेतील महिला आमदार | ५ |
| ३ | सरकारमधील महिला मंत्री | २ |

*(संदर्भ: लोकमत दि. २९-३-२००९ )*

■ **महाराष्ट्रातील सद्यस्थिती (जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायत):**

प्रशासकीय विकेंद्रीकरणाची प्रक्रीया साध्य होण्यासाठी शासकीय यंत्रणेचा तिसरा स्तर म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती यांचा समावेश होतो.

बळवंतराय मेहता समितीने १९५९ मध्ये अशी शिफारस केली की, पंचायत समितीमध्ये २० सभासदाव्यतिरिक्त २ महिलांना सहभागी करुन घ्यावे. सन १९६१ मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत राज्य कायद्यानुसार असे ठरले की, महिला सदस्यांची निवड झाली नसेल तेथे तिन्ही स्तरावर १ किंवा २ महिलांची नियुक्ती करावी. सन १९८९ मध्ये ६४ वी घटना दुरुस्ती विधेयक संसदेत सादर करुन त्यात महिलांना ३०% राखीव जागा देण्याची तरतूद केली. सप्टेंबर १९९१ मध्ये हेच विधेयक पुन्हा संसदेत सादर केले आणि त्यात ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती करुन त्यात एक जादा तरतूद केली ती म्हणजे १/३ महिलांचे प्रतिनिधीत्व हे अध्यक्षपदासाठी असावे व हे विधेयक डिसेंबर १९९२ मध्ये अंतरिम मंजूर झाले. त्यामुळे महिलांना राखीव जागा मिळाल्या. परिणामी महिला अनेक पदावर विराजमान झाल्या. तक्ता क्र.४ मध्ये जिल्हा परिषदेतील महिला प्रतिनिधींबाबत माहिती दर्शविली आहे.

**तक्ता क्र.४**

**महाराष्ट्रातील ३३ जिल्हा परिषदातील महिला प्रतिनिधी**

| अ.क्र. | सदस्य प्रकार | एकूण पदे |
|---|---|---|
| १ | एकूण सदस्य | १९५१ |
| २ | अनु. जाती महिला सदस्य | ७५ |
| ३ | अनु. जमाती महिला सदस्य | ८९ |
| ४ | जि.प. महिला अध्यक्ष | १७ |
| ५ | अनु. जाती महिला अध्यक्ष | ७ |
| ६ | अनु. जमाती महिला अध्यक्ष | २ |

*(संदर्भ: लोकमत, दि.२१-३-२००१)*

आज महाराष्ट्र राज्यामध्ये महिला आरक्षणामुळे पंचायत समितीमध्ये अनेक महिला कार्यकर्त्या कार्य करीत आहेत. त्यामुळे या महिला निर्णय प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावत आहेत. या संदर्भात अधिक माहिती तक्ता क्रमांक ५ मध्ये दर्शविली आहे.

### तक्ता क्र.५

### महाराष्ट्रातील पंचायत समित्यां मधील महिला प्रतिनिधी

| अ.क्र. | सदस्य प्रकार | एकूण पदे |
|---|---|---|
| १ | एकूण सदस्य | ३९०२ |
| २ | एकूण महिला अध्यक्ष | ११६ |
| ३ | अनु. जाती महिला सदस्य | १७६ |
| ४ | अनु. जमाती महिला सदस्य | १४९ |
| ५ | खुल्या गटातील महिला सदस्य | ९७६ |
| ६ | अनु. जातीतील महिला अध्यक्ष | १९ |
| ७ | अनु. जमातीतील महिला अध्यक्ष | १३ |
| ८ | खुल्या गटातील महिला अध्यक्ष | ८७४ |

*(संदर्भ : लोकमत , दि. १९-३-२००९)*

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत पंचायतीमध्ये कायद्यानुसार महिलांसाठी सरपंच पदाच्या राखीव जागा ठेवण्यात आल्याने अनेक पंचायतीमध्ये महिला सरपंच म्हणून कार्यरत आहेत.

### तक्ता क्र.६

### सरपंच पदासाठी विविध वर्गातील महिला आरक्षणे

| अ.क्र. | तपशिल | पदे |
|---|---|---|
| १ | अनु.जातीमधून महिलांसाठी जागा | ९५३ |
| २ | अनु. जातीमधून राखीव खुल्या जागा | ११०६ |
| ३ | अनु.जमातीमधून महिलांसाठी राखीव जागा | ५६० |
| ४ | अनु.जमातीमधून राखीव खुल्या जागा | ११९५ |
| ५ | ओबीसी मधून महिलांसाठी राखीव जागा | २२५१ |
| ६ | ओबीसी मधून राखीव खुल्या जागा | ४५०३ |
| ७ | खुल्या गटातील महिलांसाठी जागा | ४५७५ |
| ८ | खुल्या गटातील राखीव जागा | ९१५४ |
| ९ | महिला सरपंच पदासाठी राखीव जागा | ८३३९ |
| १० | सरपंच पदासाठी खुल्या जागा | १६६७८ |
| ११ | निवडणूक झालेल्या एकूण ग्रामपंचायती | २५०१७ |

महिलांच्या राखीव जागांमुळे केवळ दरिद्री व सिमांत महिलांचेच सबलीकरण झाले नाही तर अल्पसंख्याक सनातनी कुटुंबातील स्त्रियांनाही लाभ झाला आहे. या संदर्भात अधिक माहिती तक्ता क्रमांक ६ मध्ये दर्शविली आहे.

राखीव धोरणांचा स्त्रियांच्या प्रतिनिधीत्त्वावर अगदी स्पष्टपणे प्रभाव पडलेला आहे. पंचायतीमधील महिलांच्या राखीव जागामुळे महिला राजकीय प्रक्रीयेत सहभागी होत आहेत. महिला प्रतिनिधी ह्या महिलांच्या समस्यावर पुरुषांपेक्षा जास्त लक्ष केंद्रित करीत आहेत व प्रसंगी त्याबाबत कायदे करण्यातही यशस्वी होत आहे. ग्रामीण भागातील साधनसंपत्ती व कार्यालये यावरील नियंत्रणामुळे व पुरुष वर्गाने दिलेल्या आव्हानांना सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यातील आत्मविश्वास वाढत आहे. त्यामुळे महिलांमार्फत अतिशय चांगली कामे हाती घेतली जात आहेत. उदा. मेटीखेडा. महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्हा येथे कितीतरी दशकात फारसे काम झाले नव्हते. १९९८ मध्ये महिलांचा पंचायतीमध्ये समावेश झाल्यानंतर त्यांनी त्या ग्रामीण भागाचा संपूर्ण कायापालट केला. त्यांनी पाणीपुरवठा योजना, शाळांसाठी जादा खोल्या, इंधन व स्वच्छतागृहे इत्यादी सवलती पुरविल्या त्यामुळे तेथील स्त्रियांवरील ताणतणाव कमी झाला.

■ **पंचायत राज्य व्यवस्थेत महिलांना ५०% आरक्षण:**

महिला सबलीकरणाच्या दृष्टीने ठोस पाऊल उचलताना केंद्रसरकारने ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद अशा तिन्ही स्तरांवरील पंचायत राज व्यवस्थेत महिलांना ५०% आरक्षण ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. दोन दशकांपूर्वी राजीव गांधी यांनी पंतप्रधान असताना ही योजना मांडली होती. राजीव गांधीचे हे स्वप्न केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे प्रत्यक्षात उतरले आहे. या अगोदर तिन्ही स्तरावरील पंचायतीसाठी होणाऱ्या थेट निवडणुकांमध्ये महिलांना ३३% आरक्षण लागू होते ते वाढवून ५०% करण्याचा निर्णय डॉ.मनमोहन सिंग सरकारने दिनांक २७-८-२००९ रोजी घेतला. या बदलासाठी घटनेच्या कलम २४३ (ड) मध्ये सुधारणा करावी लागणार असून त्यास मंत्रिमंडळाने मंजूरी दिली आहे. पंचायत व्यवस्थेतील अनुसूचित जाती व जमातीसाठी असलेले मूळ आरक्षण कायम ठेवून वाढीव आरक्षण लागू होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकशाही विकेंद्रीकरणाच्या महत्त्वपूर्ण कार्यात महिलांच्या सहभागाने पारदर्शकता येणार आहे. तसेच एक जबाबदार शासन व्यवस्था स्थापित करण्यासही या निर्णयाचा फायदा होणार आहे.

देशातील पंचायत राज व्यवस्थेत जवळपास २८.१८ लाख (३६.८७) महिला लोकप्रतिनिधी म्हणून सक्रीय असून ५०% च्या आरक्षण निर्णयाच्या अंमलबजावणीने पंचायत राज व्यवस्थेत जवळपास १४ लाख महिलांना आणखी संधी मिळणार आहे. महिला वर्गाशी लिंग आणि जातीच्या आधारावर भेदभाव केला जात

आहे. पंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थासारख्या सार्वजनिक ठिकाणी त्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी कडक पावले उचलण्याची गरज आहे असे राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील म्हणाल्या होत्या. दरम्यान भाजप आणि त्यांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असलेल्या बिहार, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश या राज्यात आधीपासून महिलांचा पंचायत स्तरावरील निवडणूकांत ५०% आरक्षण लागू आहे. याशिवाय राजस्थानातही २०१० मध्ये होणाऱ्या पंचायत निवडणुकांपासून हे आरक्षण लागू करण्याची घोषणा राज्य सरकारने केलेली आहे. तसेच केरळनेही असाच प्रस्ताव मांडलेला आहे. परंतु आता केंद्राच्या नव्या निर्णयामुळे देशातील महिलांना पंचायत स्तरावरील निवडणुकांत ५०% आरक्षणाचा फायदा होणार आहे.

■ **महाराष्ट्र सरकारने महिलांबाबत घेतलेले काही महत्त्वपूर्ण निर्णयः**

**१) सामाजिक सबलीकरणः**

समाजात वावरताना स्त्रियांनी पूर्ण आत्मविश्वासाने वावरावे स्वतःचा आत्मविश्वास वाढवून बाह्य जगाची माहिती करुन घ्यावी. लघुउद्योग समजून घ्यावेत, त्या संबंधीत छोटे मोठे अभ्यासक्रम पूर्ण करुन स्वतःचे ज्ञान वाढवून त्याचा फायदा समाजाला द्यावा. त्यामुळे स्वतःला स्वावलंबी होता येईल. ज्ञानात भर पडेल व समाजात स्वतःची प्रतिमा तयार करुन स्वतःच्या हक्कांची जाणीव होईल असे पहावे.

**२) आर्थिक सबलीकरणः**

प्रत्येक स्त्री ही आर्थिकदृष्ट्या उत्पन्न मिळविणारीच असते. घरातील ती अत्यंत महत्त्वाची धुरा सांभाळते. स्वयंपाकपाणी, बालसंगोपन या तिच्या कष्टांचे मूल्य काढले तर घराबाहेर जावून मिळविणाऱ्या पुरुषांच्या उत्पादनापेक्षा जास्त असते. याखेरीज ज्या स्त्रिया घरकाम पाहून नोकरी करतात त्यांनी मिळविलेल्या पैशावर त्यांचा हक्क नसतो. कार्यक्षमता व विचारक्षमता याचा तिला वापर करुन अथवा देवून स्वतःवर विश्वास टाकून तिला आर्थिक स्वातंत्र्य द्यावे व तिने आर्थिक स्वातंत्र्याचा गर्व न करता किंवा गैरवापर न करता त्याचा योग्य उपयोग करावा.

**३) शैक्षणिक सबलीकरणः**

शिक्षणाचा प्रसार झाला. सावित्रीबाई फुले यांनी स्वतः त्रास सोसून समाजाची टिका सहन करुन मुलींना शिक्षण देण्याचे महान कार्य केले. म्हणजेच शैक्षणिक सबलीकरणाचीही मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळेच आज स्त्रिया अनेक क्षेत्रात आघाडीवर असल्याचे आढळते. देशाच्या कानाकोपऱ्यात हे शैक्षणिक सबलीकरण पोहोचणे आवश्यक आहे. म्हणजे निव्वळ साक्षर होण्यासाठी शिकू नये, विचारांच्या कक्षा रुंदावतील.

जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून तो उच्च प्रगतीचा होईल असे शिक्षण पाहिजे. शैक्षणिक प्रगतीच स्त्रिला आत्मनिर्भर करेल.

**४) राजकीय सबलीकरण:**

राजकारण आणि महिला यांना आरक्षणाचा दुवा मिळाल्यामुळे तो जिव्हाळ्याचा विषय झाला आहे. पूर्वी महिलांना राजकारणात प्रवेश नव्हता. त्यांना काय कळते किंवा महिला आणि राजकारण हे विषय स्तरीय सूत्र होते ते आज आरक्षणाने उच्चस्तरीय होऊ लागले आहे. तरीही या आरक्षणाचा खरा फायदा ग्रामीण स्त्रियांना व्हायला हवा. शहरी भागातील काही स्त्रिया निर्भय, धाडसी असल्याने राजकारणात जाण्याविषयी स्वत: निर्णय घेऊ शकतात पण ग्रामीण भागात अजूनही आरक्षणाची गरज नाही. आरक्षणाने स्त्री घराबाहेर पडून राजकारणात सहभागी होऊ शकते.

**५) भ्रष्टाचार विरोधी सबलीकरण:**

भ्रष्टाचार ही समाजाला लागलेली कीड आहे पण याबाबत जर स्त्रीने दक्ष राहण्याचे धोरण आखले तर त्याला आळा घालता येऊ शकतो. जर आपल्या घरात मिळकतीपेक्षा चैनीच्या वस्तूंचा पाऊस पडत असेल तर पतीला जाब विचारायला पाहिजे. त्या वस्तू भ्रष्टाचारातून असतील तर त्या वापरण्यावर घरात बंदी घालून, बहिष्कार टाकला पाहिजे.

**६) अत्याचार संरक्षणाबाबत सबलीकरण:**

स्त्रियांना कायद्याने भरपूर संरक्षण दिले आहे पण स्त्रीविषयक कायद्याची अनेक स्त्रियांना माहिती नसते त्यामुळे त्याचा वापर कसा करावा हे त्यांना कळत नाही. स्त्रीविषयक असणाऱ्या कायद्याचा योग्य वापर केला तर स्त्रीला निर्भय जगण्यास अडचणी येणार नाहीत. महिलांनी स्व-सबळ, सक्षम व्हावे म्हणजेच माणूस म्हणून जीवन जगण्याची उद्दिष्टे साध्य होतील.

■ **निष्कर्ष:**

१) जगातील विविध देशातील अनेक महिलांनी सर्वोच्च पदावर विराजमान होण्याचा मान पटकावला आहे हे महिला नेतृत्त्वाचे आदर्श उदाहरण देता येईल.

२) भारताच्या लोकसभा व राज्यसभा यामध्ये महिला आरक्षणामुळे (३३%) अनुक्रमे १८० व ८३ पर्यंत महिलांची संख्या पोहचलेली आहे.

३) महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा व विधानपरिषद यामध्ये आरक्षणामुळे (३३%) अनुक्रमे ९६ व २६ पर्यंत महिलांची संख्या पोहचलेली आहे.

४) महाराष्ट्र राज्यातील ३३ जिल्हा परिषदामध्ये एकूण १९८ विविध पदावर विविध वर्गातील महिला कार्यरत आहेत.

५) महाराष्ट्र राज्यातील पंचायत समित्यामध्ये एकूण ११६ महिला अध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय विविध जातीतील अनेक महिला अध्यक्ष व सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

६) महिला प्रतिनिधी या महिलांच्या समस्यावर पुरुषांपेक्षा जास्त लक्ष केंद्रीत करत आहेत व प्रसंगी त्याबाबत कायदे करण्यातही यशस्वी होत आहेत.

७) देशातील पंचायत राज्यव्यवस्थेत जवळपास २८.१ लाख (३६.८७) महिला लोकप्रतिनिधी म्हणून सक्रिय असून ५०% च्या आरक्षणाच्या अंमलबजावणीमुळे पंचायत राज्य व्यवस्थेत जवळपास १४ लाख महिलांना आणखी संधी मिळणार आहे.

८) महाराष्ट्र शासनाने महिला सबलीकरणासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण हा महत्त्वाचा निर्णय आहे.

९) अनेक संशोधकांनी सुचविलेल्या उपायांची अंमलबजावणी शासन करत असल्यामुळे महिला सबलीकरणाचा मार्ग आणखीच सुकर बनत आहे.

■ **संदर्भः**


१) वर्तमानपत्रे

अ) लोकमत - दिनांक २९-३-२००९, १९-४-२००९, १४-१०-२००९, १०-२-२०१०, पृष्ठ ४

ब) पुढारी, दिनांक ८ एप्रिल २००९, पृष्ठ ४

क) सकाळ, दिनांक १४-३-२०१०, पृष्ठ ५

२) अर्थसंवाद (ऑक्टोंबर-डिसेंबर २००८), ग्रामीण महिला सबलीकरण आणि पंचायत राज्य, खंड ३२, अंक ३

३) योजना (ऑक्टोंबर २००८), समर्थ महिला समर्थ राष्ट्र, वर्ष ३६, अंक ३, पान नं.२

४) Dr.Meenu Agrawal, Dr.Shobana Nelasco, Empowerment of Rural Women in India, (2009), Kanishka Publisher, New Delhi.

५) रोहिणी गवाणकर, उषा ठक्कर, (२००९), घडता... घडविता, प्रकाशक, प्रकाश विश्वासराव, लोकवाङ्‌मय गृह, मुंबई

६) महिलांचे कायदे, भारतीय संविधानः स्त्रीविषयक तरतुदी

७) Information from N+ www.iknowpolitics @ org/en/2008

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा !

*सारं जगच पैशामागं धावतय्..... अर्थव्यवस्थेचं यश -अपयश पैशाच्या मोजपट्टीनं मोजलं जातय्... अर्थव्यवस्थेच्या विकासदराचा आकडा कसा आहे? सिंगल आहे की डबल? हे कायमच महत्त्वाचं असतं. राष्ट्रीय उत्पन्न अन् राष्ट्रीय कर्ज खूप काही सांगून जातं... तसे आर्थिक विषय बरेच आहेत, अनेक वेळा मनाच्या पातळीवर लिहिण्याचा विचार झालेला.... आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... **'अर्थसंवाद'** च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध **Shree-Dev7-2336/Shree-Dev-2336** या फॉन्टमध्ये **PageMaker 6.5/7** या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ **15** असावी. कागदाचा आकार **7.5 X 10** इंच घेऊन टॉप मार्जीन **0.8** इंच, बॉटम मार्जीन **1.0** इंच, लेफ्ट व राईट साईड मार्जीन **0.8** इंच याप्रमाणे सोडाव्यात. लेखातील टेबल्स सामान्यपणे अर्धा ते पाऊण कागद आकारापेक्षा मोठे नकोत.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरीत पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक लिहावा.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा.
- लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

- अविनाश रामलाल निकम

प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास

योगेश अ.पाटील, परभणी, संत तुकाराम महाविद्यालय.
अरूण तवार, परभणी, ज्ञानोपासक महाविद्यालय.

## ■ प्रस्तावनाः

भारतात प्राचीन काळापासूनच स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. आधुनिक काळातही पंचायतराज व्यवस्था ही स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्वाचे अंग बनली आहे. १९४७ साली देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर २६ जानेवारी १९५० पासून सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाही शासनप्रणालीचा आपण स्वीकार केला. भारताच्या राज्यघटनेत नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, अधिकारासाठी जी वचनबध्दता व्यक्त केलेली आहे ती मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वे याद्वारे स्पष्ट केलेली आहे. मूलभूत अधिकारामुळे नागरिकांना मानवी अधिकार प्राप्त झाले, तर मार्गदर्शक तत्त्वांमुळे नागरिकांच्या हिताची जबाबदारी शासनावर पडली. त्यातूनच सर्व लोककल्याणकारी योजनांचा, उपक्रमांचा प्रारंभ झालेला आहे. मानवी विकास आणि लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी आपल्या शासनप्रणालीचे आद्य कर्तव्य बनले.

स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधीजींच्या विचारधारनेनुसार भारताने लोकशाही विकेंद्रीकरणाचा स्वीकार केला. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली. त्यांना पंडित नेहरूंनी पंचायतराज असे नाव दिले. या स्थानिक स्वराज्य संस्थांचा शहरी आणि ग्रामीण भागात आज मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला आहे. शासनाच्या वतीने जनतेला पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, संरक्षण, दवाखाने इत्यादी विविध सेवा पुरविल्या जातात. गावाच्या व शहराच्या गरजा कोणत्या आहेत हे त्या ठिकाणी राहणाऱ्यांनाच चांगले माहीत असते व त्यातूनच स्थानिक लोकांचा कारभार सुरू होतो. या स्थानिक लोकांच्या प्रतिनिधी मंडळालाच 'स्थानिक स्वराज्य संस्था' असे म्हटले जाते. ज्यामध्ये स्थानिक लोकांनी स्थानिक लोकांसाठी केलेला कारभार असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार जेवढा चांगला तेवढा देशाचा कारभार चांगला असे म्हटले जाते.

## ■ स्थानिक स्वराज्य संस्थांचा अर्थः

विविध तज्ज्ञांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

**१) के.व्यंकटरंगय्याः**

"स्थानिक स्वशासन म्हणजे लोकवस्तीचे असे प्रशासन आहे की, जे स्थानिक रहिवाश्यांच्या प्रतिनिधींनी साकार झालेल्या मंडळाद्वारे केले जाते"

२) डॉ.आशिर्वादम्:

''स्थानिक शासन ही केंद्रसरकारच्या अथवा संघराज्यात राज्यसरकारच्या कायद्याद्वारे निर्मित अशा प्रकारची संस्था आहे की ज्यामध्ये शहर किंवा खेड्यासारख्या एका क्षेत्रातील जनतेद्वारे निवडलेले प्रतिनिधी असतात आणि जे आपल्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादित पदस्थ अधिकाराचा उपयोग जनकल्याणासाठी करीत असतात.''

■ **भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास :**

**१) बलवंतराय मेहता समिती :**

१९५७ साली राष्ट्रीय विकास महामंडळाने पंचवार्षिक योजना प्रकल्प समिती नियुक्त केली. या समितीने सामुहिक विकास कार्यक्रमासाठी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नियुक्त केला. सामुहिक विकास कार्यक्रमाच्या साह्याने सामाजिक, आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी स्थानिक उपक्रमशिलतेचा कितपत उपयोग करून घेतला आणि त्या दृष्टीने कितपत संस्था निर्मिती केली हे शोधण्यासाठी हा अभ्यासगट नियुक्त केला. या समितीने डिसेंबर १९५७ मध्ये आपला अहवाल भारत सरकारला सादर केला.

**२) अशोक मेहता समिती :**

भारत सरकारने राष्ट्रीय स्तरावरील पंचायतराज व्यवस्थेच्या मूल्यमापनासाठी व अस्तित्वात असलेली पंचायतराज व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी १९७७ मध्ये एक समिती नियुक्त केली. या समितीचे अध्यक्ष सुप्रसिध्द समाजवादी विचारवंत अशोक मेहता होते. समितीने १९७८ साली केंद्रशासनास अहवाल सादर केला. या समितीने पंचायतराज संस्थांच्या अन्य बाबींबरोबरच वित्तीय घटकांबाबतही शिफारशी केल्या.

■ **अभ्यास विषयाची निवड :**

महाराष्ट्र पंचायतराज व्यवस्था, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कायद्यान्वये १ मे १९६२ पासून लागू करण्यात आली. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासामध्ये जिल्हा परिषदांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. अलीकडील काळात राज्यशासनाने विविध लोकोपयोगी योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करून पंचायतराज व्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्र राज्याचे कोकण, नाशिक, पुणे, अमरावती, नागपूर आणि औरंगाबाद असे ६ प्रशासकीय

विभाग पडतात. त्यापैकी औरंगाबाद म्हणजेच मराठवाडा विभाग १ मे १९६० रोजी निजामांच्या तावडीतून सुटून महाराष्ट्र राज्यात विलीन झाला. मराठवाडा विभागात आठ जिल्ह्यांचा समावेश असून एकूण आठ जिल्हा परिषदा आहेत. त्यापैकी एक परभणी जिल्हा परिषद होय. जिल्हा परिषदांद्वारा ग्रामीण भागाच्या विकासासाठी अनेक योजनांची अंमलबजावणी केली जाते. त्यामध्ये कृषी, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पशुसंवर्धन व शिक्षण या सारख्या महत्त्वाच्या योजनांचा समावेश होतो. परभणी जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ८० टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. एवढ्या मोठ्या संख्येने अवलंबून असलेल्या लोकांसाठी परभणी जिल्हा परिषद कृषी विकासाच्या दृष्टीने नेमक्या कोणत्या योजना राबविते किंवा कृषी विकासासाठी कशी भूमिका बजावते हे अभ्यासणे आवश्यक वाटले म्हणून ''परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास '' या विषयाची अभ्यासासाठी निवड केली.

■ **संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

'परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास' करण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाची प्रवृत्ती शोधणे.

२) परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा योजनानिहाय आढावा घेणे.

३) परभणी जिल्हा परिषदेने कृषी खर्चावर केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदी अभ्यासणे.

४) कृषी क्षेत्राच्या विकासातील त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना करणे.

■ **गृहितके:**

संशोधन कार्यासाठी खालील गृहितके विचारात घेतली आहेत.

१) परभणी जिल्हा परिषदेचा कृषी क्षेत्रावरील खर्च वाढत आहे.

२) परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचे प्रमाण (स्वयं उत्पन्नातील) हे शासनाने केलेल्या खर्चापेक्षा कमी आहे.

■ **संशोधन पध्दती:**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा प्रामुख्याने वापर करण्यात आला. दुय्यम साधनसामग्रीच्या साह्याने माहिती संकलित करीत असतांना कृषी विषयाच्या संदर्भातील अनेक पुस्तके व संदर्भग्रंथ अभ्यासण्यात आली आहेत. अर्थशास्त्र, लोकप्रशासन, कृषी विषया संबंधी नियतकालिके, मासिके, विविध अभ्यासकांचे लेख इत्यादींचा विचार करण्यात आला. परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास करण्यासाठी जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे, जिल्हा परिषदेचे प्रकाशित

साहित्य, राज्यसरकारची कृषीसंबंधीत धोरणे इत्यादींच्या साह्याने संशोधन पूर्ण करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या वार्षिक लेख्यांमधून सांख्यिकीय माहिती संकलित करण्यात आली. संकलित केलेल्या सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी पध्दत, शेकडेवारी पध्दत इत्यादींचा वापर करण्यात आला.

■ **अध्ययन कालावधी:**

परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास करण्यासाठी सन १९९१-९२ ते २००५-०६ असा १५ वर्षांचा कालावधी विचारात घेण्यात आला. मात्र प्रस्तुत संशोधनपर लेखात अध्ययनाच्या अद्ययावत माहितीसाठी १९९१-९२ ते २०१०-११ असा २० वर्षांचा कालावधी विचारात घेण्यात आलेला आहे.

**तक्ता क्र. १**

**परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेला योजनानिहाय खर्च**

| अ. क्र. | योजना | जिल्हा परिषदेने केलेला खर्च | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण तरतूद | एकूण प्रत्यक्ष खर्च | एकूण प्रत्यक्ष जमा/तूट |
| १ | ठिबक सिंचन योजना | ९४३६०० | ८४०००० (८८.७४) | १०३६०० (८.७६) |
| २ | बायोगॅस विकास कार्यक्रम | ५२७२१८ | ५०४११२ (८९.९०) | २३१०६ (८.१६) |
| ३ | रेशीम विकास योजना | १२१०२० | ९०५५० (९६.०८) | ३८४७० (२.११) |
| ४ | पीक संरक्षण योजना | १५०४०४० | १३४०४००(८६.९०) | १६३६४० (१२.८०) |
| ५ | कडबाकटर पुरवठा योजना | ११२५२०० | १०२०२०० (९१.८०) | १०५००० (३.११) |
| ६ | शेतकी निवास योजना | २१०४०० | १८०५०० (७४.८०) | २९९०० (८.९०) |
| ७ | पीक स्पर्धा योजना | ५८३०० | ५४८८० (९४.००) | ३४२० (५.३०) |
| ८ | शेतकरी बहुमान योजना | ३१०५०० | २३५४०० (७५.७४) | ७५१०० (९.१४) |
| ९ | सेंद्रीय शेती विकास कार्यक्रम | ४७५००० | ४३०९०० (९२.५०) | ४४१०० (७.१४) |
| १० | गोदाम दुरूस्ती व बांधकाम योजना | १२०४८९० | ९८७९१७ (८६.९४) | २१६९७३ (४.८०) |
| | एकूण | ६४८८१६८ | ५६८४८५९(८८.३०) | ८८३३०९ (९.१८) |

***टिप:** कंसातील आकडे तरतुदीशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात.*

***संदर्भ:** परभणी जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे १९९१-९२ ते २०१०-११*

तक्ता क्र.१ मध्ये परभणी जिल्हा परिषदेने कृषी योजनांवर केलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आहे. तक्त्यावरून असे दिसून येते की, अभ्यास कालखंडातील २० वर्षात परभणी जिल्हा परिषदेने पीक संरक्षण योजनेवर सर्वाधिक तरतूद व सर्वाधिक खर्च केला आहे. सदरील योजनेसाठी रू.१५,०४,०४० एवढी तरतूद केली असून रू. १३,४०,४०० एवढा प्रत्यक्षात खर्च केला आहे. खर्चाचे तरतुदीशी असलेले प्रमाण ८६.९० टक्के असून तूट ही रू.१,६३,६४० म्हणजेच १२.८० टक्के आहे. तर सर्वात कमी तरतूद व कमी खर्च पीक स्पर्धा योजनेवर करण्यात आला. या योजनेसाठी केवळ ५८,३०० रूपयांची तरतूद केली गेली तर केवळ ५४,८८० रूपये प्रत्यक्ष खर्च करण्यात आले. सन १९९१-९२ ते २०१०-११ या वीस वर्षाच्या अभ्यास कालखंडात परभणी जिल्हा परिषदेने विविध कृषी योजनांवर एकूण ६४,८८,१६८ रुपयांची तरतूद केली तर त्यापैकी रू.५६,८४,८५९ प्रत्यक्ष खर्च करण्यात आला. थोडक्यात असे दिसून येते की, परभणी जिल्हा परिषद कृषी योजनांवर करीत असलेला खर्च हा समान नाही. काही योजनांसाठी जास्त तर काही योजनांसाठी फारच कमी खर्च करण्यात आलेला दिसून येतो.

## ■ निष्कर्ष:

१) भारतात प्राचीन काळापासूनच स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्थानिक स्वराज्य संस्थांना लोकशाहीशी सुसंगत असे स्वरूप प्राप्त झाले.

२) भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हाती दिलेला असून त्यांना कायद्याचा अर्थ प्राप्त झाला. बलवंतराय मेहता समितीने लोकशाही सत्तेचे विकेंद्रीकरण तीन स्तरात असावे असे सुचविले. ज्यामध्ये ग्रामस्तरावर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद असावी असे सुचविण्यात आले.

३) अशोक मेहता समितीच्या शिफारशीनुसार भारतात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेचा प्रारंभ झाला. राजस्थान हे पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार करणारे पहिले राज्य ठरले.

४) वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार *'महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१'* संमत केला गेला व १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेस सुरूवात झाली.

५) जिल्हा परिषदेला आपली कार्ये व विकास योजना पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदांना स्वतःची उत्पन्नाची साधने व शासकीय अनुदाने या दोन मार्गांनी आर्थिक उत्पन्न प्राप्त होते.

६) विविध कृषी योजनांवर परभणी जिल्हा परिषदेने केलेली एकूण तरतूद रू. ६४,८८,१६८ एवढी होती, तर प्रत्यक्ष खर्च हा रू. ५६,८४,८५९ एवढा होता. एकूण खर्चाचे एकूण तरतुदीशी असलेले

हे प्रमाण ८८.३० प्रतिशत एवढे होते. यावरून कृषी योजनांवर १०० प्रतिशत खर्च होत नसल्याचे दिसून येते.

७) परभणी जिल्हा परिषदेने कृषी क्षेत्रावर केलेल्या खर्चात सर्वात जास्त खर्च रू. १५,०४,०४० हा पीक संरक्षण योजनेवर तर सर्वात कमी खर्च हा पीक स्पर्धा योजनेवर रू. ५८,३०० एवढा करण्यात आला. यावरून जिल्हा परिषद सर्वच कृषी योजनांवर एकसमान खर्च करीत नसल्याचे दिसून येते.

■ **शिफारसी:**

१) जिल्हा परिषदेची स्वत:ची उत्पन्नाची साधने अत्यंत अपुरी असल्याने त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी स्थानिक पातळीवर काही कर आकारण्याची मुभा देण्यात यावी.

२) परभणी जिल्ह्यातील शेती ही तांत्रिकदृष्ट्या मागासलेली आहे. ग्रामीण भागात विकसीत तंत्रज्ञानाचा प्रसार होणे आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून कृषी खर्चात वाढ करावी.

३) आज कृषी क्षेत्राच्या अनेक समस्या आहेत. त्याचे कारण म्हणजे सामाजिक व राजकीय सामंजस्याचा अभाव. या दृष्टीने परिस्थिती अभ्यासून यावर उपाय शोधणे आवश्यक आहे. रचनात्मक व नियोजनबध्द सुधारणा करून टिकाऊ विकास घडवून आणता येईल.

४) कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रपुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध योजनांच्या सुयोग्य अंमलबजावणीसाठी शेतकऱ्यांना ग्रामस्तरावर कौशल्यवृध्दी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

५) भारताची कृषीप्रधान देश म्हणून असलेली ओळख लक्षात घेता तसेच अधिकांश लोकसंख्येचे कृषी क्षेत्रावर असलेले अवलंबित्व विचारात घेता कृषी हे आर्थिक व सामाजिक विकासाचे एक प्रभावी साधन आहे हा विचार उचलून धरावा आणि कृषी विकासासाठी खऱ्या अर्थाने कालबध्द कार्यक्रम ठरवावा.

■ **संदर्भसूची:**


१) कुलकर्णी अ.ना. (२०००) - 'भारतातील स्थानिक स्वशासन' - विद्या प्रकाशन, नागपूर.

२) के.सागर (१९९७) - अस्सा हा महाराष्ट्र - के.सागर पब्लिकेशन, पुणे.

३) कवीमंडन विजय (२००२) - प्रिन्सीपल ॲन्ड प्रॅक्टीस ऑफ ॲग्री इकॉनॉमिक्स - मंगेश प्रकाशन, नागपूर

४) दर्शनकार अर्जुनराव (२००५) - पंचायतराज व नागरी प्रशासन - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

५) ॲग्रीकल्चरल रिव्हेन्यू - अंक २००१ ते २००५.

६) परभणी जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे - १९९१-९२ ते २००५-०६.

# महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत शेतीचे स्थान.

करमसिंग राजपूत, यवतमाळ, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी.

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून संपूर्ण जगात ओळखला जातो. तर महाराष्ट्राची एक प्रगत राज्य म्हणून संपूर्ण भारतात ओळख आहे. महाराष्ट्र राज्यात सुध्दा शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. आजही सुमारे ५५% लोकसंख्या महाराष्ट्रात शेती व्यवसायावर अवलंबून असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीची घोडदौड कशी जोमाने सुरु आहे याचे चित्र दूरदर्शनवरुन नेहमीच आपण बघतो. परंतु त्यात शेती क्षेत्राची वास्तविकता फारशी दर्शविली जात नाही.

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जात असला तरी येथील शासकीय धोरणे मात्र कृषीप्रधान नसल्याचे फार पूर्वीपासून अनुभवास येते. त्यामुळेच सुमारे सव्वाशे वर्षापूर्वी महात्मा ज्योतीराव फुले यांनी ***शेतकऱ्याचा आसूड*** व ***गुलामगिरी*** हे ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या व्यथा तत्कालीन शासनासमोर मांडल्या स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री स्व. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सुध्दा भारतीय व पर्यायाने महाराष्ट्रातील शेतीची दुरवस्था ओळखून सुमारे पन्नास वर्षापूर्वी म्हटले होते की, *कृषी संस्कृती हीच खरी संस्कृतीची जननी आहे. तिचा विकास करणे जरुरी आहे. कृषी हा मानवी जीवनाच्या विकासाचा आद्य उद्योग आहे. कृषीशिवाय मानवी जीवन विकासाचा सिध्दांत निरर्थक आहे म्हणून शासनाने शेती विकासाकडे लक्ष पुरविले पाहिजे.* तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सुध्दा आपल्या इनामदार या नाटकातून शेतकऱ्यांची पिळवणूक कशी होते हे स्पष्ट केले. वरील तीनही महानुभावांनी शेती व शेतकऱ्यांविषयी व्यक्त केलेली चिंता शासनाने गांभीर्याने न घेतल्यामुळे आज शेती संकटात सापडली आहे. भारतीय संविधानानुसार कृषी हा राज्याचा विषय आहे. परंतु कृषी संबंधातले सर्व महत्वपूर्ण निर्णय केन्द्र सरकारच्या अधिकारात आहेत जसे (१) शेतमालाचे समर्थन मूल्य ठरविणे. (२)कृषीमाल आयात-निर्यात धोरण ठरविणे. (३) कृषी पतपुरवठ्याचे धोरण ठरविणे इत्यादी. या पार्श्वभूमीवर राज्यसरकार केंन्द्रसरकारला दोषी ठरविते आणि कृषी हा राज्याचा विषय म्हणून केंद्र सरकार राज्य सरकारला दोष देते या टोलवा टोलवीत महाराष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांचा मात्र फुटबॉल झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र स्थापनेच्या वेळी म्हणजे १९६०-६१ मध्ये महाराष्ट्राच्या एकूण राज्य उत्पन्नात शेती उत्पन्नाचा वाटा ३४.४% होता व शेतीवर अवलंबून असणारांची संख्या सुमारे ६५% होती. गेल्या पन्नास वर्षात हे प्रमाण बदलून २००८-०९ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राच्या एकूण राज्य उत्पन्नात शेती

उत्पन्नाचा हिस्सा १३% तर शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण हे सुमारे ५५% एवढे झाले आहे. याचाच अर्थ महाराष्ट्रातील शेतीवर अवलंबून असणाऱ्या ५५% लोकांच्या वाट्याला राज्य उत्पन्ना पैकी केवळ १३% उत्पन्न येते. सारणी क्र.१ वरुन राज्यात प्राथमिक क्षेत्र, व्दितीय क्षेत्र व सेवा क्षेत्राचा एकूण राज्य उत्पन्नातील हिस्सा मागील ४५ वर्षात कसा बदलत गेला हे दिसून येते.

**सारणी क्र. ०१**

महाराष्ट्राच्या राज्य उत्पन्नात कृषी उत्पन्नाचे घटते प्रमाण (शेकडा प्रमाण)

| अ.क्र. | क्षेत्र | १९६०-६१ | १९९३-९४ | २००८-०९ |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक क्षेत्र | ३६.४ | २१.२ | १३.२ |
| २ | द्वितीय क्षेत्र | २८.० | ३१.२ | २७.२ |
| ३ | तृतीय क्षेत्र | ३४.६ | ४७.६ | ५९.६ |
| ४ | एकूण : | १००.० | १००.० | १००.० |

*संदर्भ : शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय -संपादन नरेंद्र लांजेवार*

सारणी क्र- १ वरुन स्पष्ट निदर्शनास येते की शेती व उद्योग या दोन्ही महत्त्वाच्या उत्पादक क्षेत्रांचा राज्याच्या एकूण उत्पन्नातील हिस्सा घसरत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्राची घसरण सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

### ■ महाराष्ट्राच्या शेतीचे आजचे वास्तव:

आज महाराष्ट्रातील ५५% लोक शेतीवर अवलंबून असून त्यांच्या वाट्याला राज्याच्या एकूण उत्पन्नापैकी केवळ १३% उत्पन्न येते. राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३.०८ लाख चौरस किमी असुन त्यापैकी लागवडी खालील क्षेत्राचे प्रमाण देशपातळीवरील सरासरी प्रमाणापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. परंतु महाराष्ट्राची शेती उत्पादकता देशपातळीवरील शेती उत्पादकतेच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याचे दिसून येते याचे कारण म्हणजे देशपातळीवरील बागायती शेतीचे सरासरी प्रमाण ३८% असुन महाराष्ट्रात केवळ १६% शेतीच बागायती असल्याचे दिसून येते. राज्यातील सरासरी हेक्टरी उत्पादन सुध्दा राष्ट्रीय सरासरी पेक्षा कमी असल्याचे दिसून येते. या संदर्भात कापसाचे उदाहरण बोलके आहे. संपूर्ण देशात ९ प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये कापूस लागवडी बाबत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. (राज्यात २००४-०५ मध्ये एकूण कापूस लागवड क्षेत्र २९.०८ लक्ष हेक्टर एवढे होते) तर तामिळनाडूचा शेवटचा म्हणजे ९ वा क्रमांक (१.४२ लाख हेक्टर) लागतो. परंतु कापसाच्या दरहेक्टरी उत्पादनात तामिळनाडूचा प्रथम क्रमांक (६५८ किलो प्रती हेक्टर) असून

महाराष्ट्र मात्र शेवटच्या क्रमांकावर (९ वा) आहे. महाराष्ट्रात दर हेक्टरी कापसाचे उत्पादन २००४-०५ नुसार केवळ १९९ किलो एवढे अल्प होते.

■ **कापसाला पांढरे सोने कसे म्हणावे ?**

कापसाला आज सर्वत्र पांढरे सोने म्हणून संबोधले जाते. परंतु गेल्या ४० वर्षांच्या काळात कापूस व सोने यांच्या भाववाढीतील प्रचंड तफावतीमुळे कापसाला पांढरे सोने कसे म्हणावे हा प्रश्न निर्माण होतो. सारणी क्र.२ वरुन सोने व कापूस यांच्या भाववाढीतील प्रचंड तफावत आपल्या लक्षात येते.

**सारणी क्र. ०२**

**सोने व कापूस यांची झालेली तुलनात्मक भाववाढ (१९७२ ते २०१०)**

| वर्ष | १० ग्रॅम सोन्याचे दर (रुपयात) | एकूण वाढ(%) (१९७२ च्या तुलनेत) | कापसाचे दर (प्रति क्विं.रुपयात) | एकूण वाढ(%) (१९७२ च्या तुलनेत) |
|---|---|---|---|---|
| १९७२ | २०२ | -- | ३२५ | -- |
| १९७३ | २१७ | ७ | ३३५ | ३ |
| १९८२ | १६४५ | ७१४ | ५५० | ६९ |
| १९९२ | ४३३४ | २०४६ | ७०० | ११५ |
| २००२ | ५०१० | २३८० | १८७५ | ४७७ |
| २००५ | ७००० | ३३६६ | १९६९ | ५०६ |
| २००६ | ७००० | ४३५५ | २१०० | ५४६ |
| २००९ | १६००० | ७८२१ | २६०० | ७०० |
| २०१० | १८००० | ८८११ | ३००० | ८२३ |

*(संदर्भ: वणी तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक अध्ययन)*

सारणी क्र. २ वरुन असे निदर्शनास येते की, सन १९७२ ते २०१० या काळात सोन्याची भाववाढ ८८११% एवढी झाली तर याच काळात कापसाची भाववाढ केवळ ८२३% एवढी अल्पप्रमाणात झाली. म्हणजेच कापसाच्या तुलनेत सुमारे दहा पटीने सोन्याची भाववाढ जास्त झाल्याचे दिसून येते. जर याच गतीने कापसाची भाववाढ झाली असती तर आज कापसाचा भाव प्रति क्विंटल सुमारे २९००० रुपये एवढा राहिला असता व अशा परिस्थितीत महाराष्ट्रातच काय पण संपूर्ण जगात एकाही कापूस उत्पादक शेतकऱ्याने आत्महत्या केली नसती. परंतु असे झाले नाही. त्यामुळे कापसाला पांढरे सोने संबोधणे आज उचित ठरणार

नाही असे वाटते.

## ■ नवीन आर्थिक धोरणामुळे शेती कोलमडली:

भारत सरकारने सन १९९१ पासून नवीन आर्थिक धोरण स्विकारले व त्याचा फटका बसून भारतासह महाराष्ट्राचे शेती क्षेत्र कोलमडले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेतीवर एकूण बजेटच्या ३०% खर्च होत होता. चौथ्या पंचवार्षिक योजनेते तो २२% तर पाचव्या पंचवार्षिक योजनेत तो १२% पर्यंत खाली आला. आज ज्या कृषी क्षेत्रावर देशातील ६४% जनता अवलंबून आहे त्या शेती क्षेत्रावर एकूण राष्ट्रीय अर्थसंकल्पाच्या केवळ २.५% खर्च होतो. यावरुन संपूर्ण भारतासह महाराष्ट्राच्या शेतीची किती दुरावस्था झाली हे लक्षात येते. १९८५-९० दरम्यान केंन्द्र व राज्य शासनाचा शेती, सिंचन व अन्य ग्रामीण विकास योजनांवरील खर्च एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १४.५% होता तो २०००-०१ मध्ये घटून ५.९% एवढा कमी झाला. आज तर तो २.५% एवढा अत्यल्प झालेला दिसून येतो. १९८०-९० च्या दशकात शेती विकासाचा दर ३.७२% होता तो १९९०-२००० या दशकात घटून २.२९% झाला सन २००० नंतर हाच दर १ टक्क्यांपर्यंत खाली घसरल्याचे दिसून येते. याचाच अर्थ नवीन आर्थिक धोरणाचा कृषीक्षेत्राला जबर फटका बसला आहे. राष्ट्रीय शेती आयोगाचे माजी सदस्य डॉ. रमाकांत पितळे यांनी आपल्या ***इंडिया-रिच ॲग्रीकल्चर: पुअर फार्मर्स*** या पुस्तकात दिलेल्या आकडेवारी नुसार १९९०-९१ मध्ये शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न ३८०२ रुपये म्हणजेच महिन्याला ३१८ रुपये होते. नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्या नंतरच्या काळात दरडोई उत्पन्न कमी होऊन २००२-०३ मध्ये ३७३२ रुपये म्हणजेच मासिक ३११ रुपये झाले. दिवसेंदिवस महागाई वाढत असताना शेतकऱ्यांचे उत्पन्न जर पूर्वी पेक्षा कमी होत असेल तर या पेक्षा शेती व शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचा आणखी काय पुरावा हवा ? शेतीच्या उत्पादन खर्चात वाढ आणि त्याच्या उत्पादनाला मिळणाऱ्या कमी किमती अशा दुहेरी कात्रीत शेतकरी आज अडकला आहे. अमेरिकेने १९८२ मध्ये आपल्या शेतकऱ्यांवरील सर्व कर्ज माफ करुन त्यांनतरच शेती हा विषय जागतिक व्यापार संघटना (WTO) करारात टाकला. एवढेच नव्हे तर अमेरिकेसह सर्वच विकसित देशांनी शेतीक्षेत्र WTO मध्ये टाकण्यापूर्वी आपापल्या देशात कृषीक्षेत्रासाठी प्रचंड अनुदान वाढवून घेतले व ते सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच वेळ प्रसंगी त्यात वाढ करण्यासाठी **ग्रीन बॉक्स व ब्ल्यु बॉक्स** अशी तरतूद करुन ठेवली. भारत सरकारने मात्र पूर्वी मिळत असलेले तुटपुंजे शेती अनुदानही WTO च्या नियमांतर्गत कमी करण्यास सुरवात केल्याने येथील शेती क्षेत्र धोक्यात आले आहे. विकसित देशांच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्याला किती तुटपूंजे अनुदान मिळते हे सारणी क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

सारणी क्र. ३

शेती क्षेत्राला दिले जाणारे अनुदान (१९९९ नुसार)

| देश | प्रति शेतकरी अनुदान |
|---|---|
| कॅनडा | ३.८० लाख रुपये |
| युरोपीयन देश | ७.३० लाख रुपये |
| जपान | ११.०० लाख रुपये |
| अमेरिका | ९.०० लाख रुपये |
| भारत | २८५७ रुपये |

■ **शेतीच्या आदानांच्या किंमतीत वाढ:**

१९९१ पासून पेट्रोल व डिझेलच्या किंमतीमध्ये भरमसाठ वाढ झाली. १९९० साली ४.३० रु. लिटर डिझेल होते ते वाढून आज ४७ रु. लिटर झाले. रासायनिक खतांच्या व किटकनाशकांच्या किंमती ३ ते ४ पटीने वाढल्या. बियाण्यांच्या किंमती गगनाला भिडल्या तसेच मजुरीचे दर १० ते १५ पटीने वाढले. पाच अश्वशक्तीच्या पंपासाठी १९९० मध्ये ७५० रुपये वार्षिक आकार होता तो वाढून २००६ साली १०८०० रुपये झाला. दुसरी कडे आजही एकूण शेती कर्जा पैकी केवळ ५७% कर्ज पुरवठा बँका व पतसंस्थांकडून केला जातो तर उर्वरीत ४३% कर्ज पुरवठ्यासाठी शेतकऱ्यांना अजूनही सावकारी कर्जावर अवलंबून राहावे लागते. अल्पभूधारक शेतकऱ्यांपैकी तर केवळ २२.६% शेतकऱ्यांनाच बँका मार्फत कर्ज पुरवठा होतो. उर्वरीत सुमारे ७७% अल्पभूधारकांना आजही सावकारी कर्जाशिवाय पर्याय नाही. आदानांच्या किंमतीतील वाढ व महागडे शेती कर्ज यामुळे शेतीचा उत्पादन खर्च भरमसाठ वाढला परंतु त्या तुलनेत शेतमालाला भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात जरी वाढ झाली असली तरी त्यांच्या उत्पन्नात मात्र वाढ झालेली दिसून येत नाही. परिणामी शेती क्षेत्र संकटात सापडले आहे.

■ **आयात खुलीकरणाचा शेतीला फटका:**

१९९६ पासून शासनाने आयात खुलीकरणाची प्रक्रिया सुरु करुन ती १ एप्रिल २००१ रोजी पूर्ण

केली. एकूण १०,००० परदेशी वस्तूंवरील संख्यात्मक निर्बंध शासनाने काढून टाकले. कापूस, तेलबिया, तेल, भाजीपाला, बटाटे, नारळ, सफरचंद, लसूण, डाळिंबे, बेदाणे, दूधपावडर, इत्यादी शेतमाल आणि शेतमाल आधारीत पशूजन्य वस्तू तसेच कपडे, पेन, वह्या, टी. व्ही. मोटारी इत्यादी उत्पादित वस्तू अशा सर्व वस्तुंवरील आयात निर्बंध उठवण्यात आले. त्यामुळे परकीय देशातील प्रचंड अनुदान प्राप्त स्वस्त शेतमाल भारतात आल्यामुळे येथील शेतीक्षेत्र धोक्यात आले आहे. दुसरीकडे विकसित देशांमध्ये मात्र आजही शेतमालाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर आयातकर आकारण्यात येतो. युरोपियन विकास समुदाय गव्हाच्या आयातीवर २१४% बार्लीवर १९७%, मक्यावर१५४% तर केळीवर १८०% आयात कर आकारते. जपान तर धान्य व डाळींवर ४६०% ते ६००% व तांदळावर तब्बल १०००% आयात कर आकारतो. आपण सुध्दा WTO च्या नियमांतर्गत कापूस व खाद्य तेलांसाठी ३००% आयात कर आकारु शकतो. परंतु देशातील कापड मिल लॉबीच्या दबावामुळे व परकीय देशांच्या दबावामुळे भारत सरकार कापसावर केवळ १०% आयातकर आकारते. त्यामुळे १९९७ पासून भारताची ओळख कापूस निर्यातदार देश म्हणून न राहता जगातील तिसऱ्या क्रमांकाचा कापूस आयातदार देश म्हणून झाली आहे. परिणामी येथील कापूस उत्पादक देशोधडीला लागले आहेत.

## ■ शेतीक्षेत्र सुधारण्यासाठी उपाययोजना:

शेतीची झालेली दुरवस्था घालविण्यासाठी नवीन कृषी धोरण तयार करुन त्यात पुढील उपायांवर भर द्यावा.

०१. शेतकरी, शेतमजूर यांच्या हिताचे संरक्षण करणे ही केंन्द्र शासनाची मूलभूत जबाबदारी समजण्यात यावी.

०२. राष्ट्रीय कृषिधोरण निश्चित करुन शेती हा केन्द्राचा विषय मानावा. रेल्वे अंदाजपत्रकाच्या धर्तीवर सर्वांगीण ग्रामीण विकास व शेती करीता स्वतंत्र व पुरेशा तरतूदीचे स्वतंत्र केंन्द्रीय अंदाजपत्रक तयार करावे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

०३. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव द्यावा तसेच सध्याच्या बाजार प्रणाली मध्ये दलाल, अडते व राजकारणी यांच्या कडून शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवावी.

०४. केंन्द्र शासनाने शेतमालाच्या उत्पादन खर्चावर आधारीत हमी किंमती जाहीर करुन त्यानुसार

शेतमाल खरेदीची त्वरीत व्यवस्था करावी.

०५. राष्ट्रीय शेती आयोगाचे अध्यक्ष डॉ. स्वामीनाथन यांच्या शिफारशी प्रमाणे कापसाच्या आयातीवर ६०% आयातकर लावावा व त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी.

०६. केन्द्रशासनाने शेतमाल निर्यातीसाठी निश्चित असे निर्यात धोरण आखून शेतमाल निर्यातीसाठी ठिकठिकाणी पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करावे व शेतकऱ्याने निर्माण केलेला शेतमाल निर्यात होईल याची दक्षता घ्यावी तसेच शेतमाल निर्यातीसाठी निर्यात अनुदान द्यावे.

०७. ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता निर्माण करण्यासाठी मोठया प्रमाणावर गुंतवणूक करणे अत्यावश्यक आहे तेथे केंन्द्र व राज्य शासनाने अंदाजपत्रकाच्या २०% तरतूद करावी.

०८. ज्या गावात नदी अथवा बारमाही पाण्याची सोय नाही अशा प्रत्येक गावात गाव तेथे तळे अशी योजना राबविणे आवश्यक आहे. ही योजना राबविण्याचे काम रोजगार हमी योजने अंतर्गत करावे.

०९. सर्व पिकांसाठी सर्वंकष पीकविमा योजना लागू करावी. या सर्वकष पिकविमा योजनेच्या विमा हप्त्याची ९०%रक्कम केंद्र व राज्य शासनाने अंदाजपत्रकीय तरतूद करुन द्यावी आणि पिकविमा योजना सक्तीची करावी. म्हणजे दुष्काळग्रस्त भागात सरकारला नुकसान भरपाईसाठी कर्ज माफी किंवा अनुदानाचे पॅकेज द्यावे लागणार नाही.

१०. कृषि संशोधन व बी-बियाणे विकास यासाठी स्वतंत्र भरीव तरतूद असावी, बियाणे निर्मिती व विकास ही कामे भारतीय शेती संशोधन अनुसंधान व कृषी विद्यापिठांकडे सोपवावीत.

११. प्रत्येक कृषि महाविद्यालयात स्वतंत्र जैवतंत्रज्ञान व शेती विकास संशोधन विभाग स्थापन करावा. जे विद्यापीठ जैव तंत्रज्ञान व शेती विकास संशोधना बाबत काही काम करणार नाही त्या विद्यापीठाची सर्व अनुदाने कमी करावी. जैव तंत्रज्ञानाच्या मदतीने बियाण्यांचे स्थानिक वाण विकसित करण्यावर भर द्यावा.

१२. शेतकऱ्याला जोडधंदा करता यावा म्हणून दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, शेळीपालन व अन्य कुटीरोद्योग उभारण्यासाठी अल्पदराने कर्ज उपलब्ध करुन द्यावे.

१३. कृषीमालावर प्रक्रिया करण्यासाठी छोटी केंद्रे उभारण्याकरीता शेतकऱ्यांना शून्य टक्केदराने कर्ज उपलब्ध करुन द्यावे.

१४. शेतकऱ्यांना शून्य टक्के दराने पीक उत्पादन कर्ज द्यावे. चीनच्या धर्तीवर असा कर्ज पुरवठा केल्यास शेतीतील गुंतवणूक वाढून त्याचा परिणाम राष्ट्रीय उत्पादन वाढीत होईल.

१५. केंद्र शासनाने व राज्य शासनाने शेतकऱ्यांना केवळ अनुदाने देऊन किंवा कर्ज माफी देऊन दुर्बल करण्या ऐवजी कर्ज बाजारीपणा व पर्यायाने दुर्बलतेच्या कारणांच्या मुळाशी जाऊन मूळ रोगाचे उच्चाटन करावे.

वरील प्रमाणे उपाययोजना केल्यास आज डबघाईस आलेल्या शेतीक्षेत्राला उभारी येऊन पुन्हा आपला महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम् बनल्याशिवाय राहणार नाही हे निश्चित.

■ **संदर्भ :**


१. एका साध्या सत्यासाठी - चंद्रकांत वानखेडे, परिसर प्रकाशन, अंबाजोगाई.

२. शेतकरी जात्यात - सुलभा ब्रम्हे, शंकर ब्रम्हे समाज विज्ञान ग्रंथालय, पुणे.

३. आंदोलन मासिक - संपादक - मेधा पाटकर, व्दारा -६, राघव, श्री. रघुराज सोसायटी ११८-अ, सिंहगड रस्ता, पुणे, अंक जानेवारी २००७

४. एम. फिल. प्रबंध - करमसिंग राजपूत.

५. आंदोलन मासिक - संपादक- मेधा पाटकर अंक जाने-फेब्रुवारी २०१०

६. शेतकऱ्यांच्या आत्महत्या- चिंतन आणि उपाय - संपादक नरेंद्र लांजेवार, बुलढाणा.

७. दैनिक लोकसत्ता, दि. २२/२/०८ डॉ. बुधाजीराव मुळीक यांचा लेख.

# सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती

संतोष कदम, सोलापूर, संतोष भी.पाटील महाविद्यालय, मंद्रुप, जिल्हा सोलापूर

बी. एम. भांज, सोलापूर, संतोष भी.पाटील महाविद्यालय, मंद्रुप, जिल्हा सोलापूर

जागतिकीकरणाच्या काळातही भारतीय शेतीचे अर्थव्यवस्थेत असलेले स्थान कमी लेखता येणार नाही. रोजगारनिर्मिती, उत्पन्न निर्मिती, परकीय चलन प्राप्ती, उदरनिर्वाह इत्यादी बाबतीत असलेली विषमता आजही दूर करता आलेली नाही. मग ती शेतीच्या आकारमानावरुन असेल किंवा शेतकऱ्यांच्या जाती धर्मावरुन असेल. कृषी विकासाच्या संदर्भात आपण शेतीच्या उत्पादनात वाढ होणे गृहित धरतो. परंतु ही वाढ केवळ तांत्रिक बाबींशी संबंधित नसून सामाजिक-आर्थिक घटकांशीही त्याचा संबंध असल्याचे सिध्द झाले आहे. भारतामध्ये भूमी सुधारणा करताना ज्यांच्याकडे जास्त जमीन आहे त्यांच्याकडून त्या काढून घेण्याचा कायदेशीर पध्दतीने प्रयत्न झाला. यामध्ये विशेषत: मध्यस्थांचे उच्चाटन, कुळ हक्कांबाबत सुधारणा, कमाल जमीन धारणा मर्यादा व इतर महत्त्वपूर्ण सुधारणांचा समावेश होता. परंतु या भूमी सुधारणा करीत असताना विविध जाती- धर्मांच्या बाबतीत जमीन वितरण सुधारणा या घटकाचा कधीही विचार झाला नाही. किंबहुना आजही त्यावर फारसा गांभीर्याने विचार होत नाही. मग त्यामध्ये भारतातील हिंदू, मुस्लिम, जैन, ख्रिश्चन, पारशी लोकांकडे किती प्रमाणात जमीन आहे की नाही याचा विचार कुठेही होताना दिसत नाही. विशेषत: भारतामध्ये एकूण लोकसंख्येत हिंदू लोकसंख्येनंतर मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण आढळते, परंतु त्यांच्याकडे असलेले शेतजमीनीचे प्रमाण मात्र केवळ २९ टक्के इतके आहे. थोडक्यात आजही भारतातील मुस्लिमांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाची जेव्हा जेव्हा चर्चा केली जाते तेव्हा तेव्हा त्यांच्या परंपरागत व्यवसायाचाच विचार केला जातो. पण एक शेतकरी म्हणून मुस्लिमांचा विचार कधीच केला जात नाही. म्हणूनच मुस्लिमांच्या या दुर्लक्षित भूमिकेकडे दृष्टिक्षेप टाकण्यासाठी प्रस्तुत संशोधन लेखामध्ये सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीची चर्चा केली आहे.

## ■ अभ्यासाची उद्दिष्ट्ये:

प्रस्तुत अभ्यासाची पुढील मुख्य उद्दिष्टे आहेत ....

१. सोलापूर जिल्ह्याच्या कृषी अर्थव्यवस्थेवर दृष्टिक्षेप टाकणे.

२. सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या शेतीतील पिकांचा आकृतिबंध व उत्पादनाचा आकृतिबंध अभ्यासणे.

३. मुस्लिम शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४. मुस्लिम शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

## ■ संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्याची निवड केली असून या जिल्ह्यातील केवळ मुस्लिम शेतकऱ्यांचीच निवड केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांची निवड करताना प्रथमत: जिल्ह्यातील असे दोन तालुके निवडले (बार्शी व दक्षिण सोलापूर) की जिथे एकूण लोकसंख्येत मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण जास्त असून मुस्लिम शेतकरीही तेथे आहेत. नंतर या दोन्ही तालुक्यातून एकूण अशी १० गावे (बार्शी तालुक्यातून ५ व द. सोलापूर तालुक्यातून ५) निवडली की जेथे मुस्लिम शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. पुढे प्रत्यक्ष मुस्लिम शेतकऱ्यांची निवड करताना प्रत्येक गावातून १० शेतकऱ्यांची निवड शेतजमिनीच्या आकारानुसार प्रत्येक गटातून (मोठे, मध्यम, लहान व सिमांत शेतकरी) समान नमुने घेण्याचा प्रयत्न केला. परंतु काही गावांमध्ये मुस्लिम शेतकऱ्यांकडे असलेल्या शेतजमीनीचा विचार करता ही समानता साधणे शक्य झाले नाही. अशा प्रकारे निवड केलेल्या एकूण १०० मुस्लिम शेतकऱ्यांच्या मुलाखती घेण्यासाठी प्रश्नावलीचा वापर केला असून प्रश्नावलीमध्ये मुस्लिम शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीशी संबंधित प्रश्न व तक्ते यांचा वापर केला आहे. प्रश्नावलीच्या सहाय्याने गोळा केलेल्या प्राथमिक माहितीचे संगणकाच्या सहाय्याने विश्लेषण करुन निष्कर्ष काढले आहेत. यामध्ये सरासरी, टक्केवारी या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे. सन २००९ मध्ये शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन अभ्यास करण्यात आल्याने शोधनिबंधातील माहिती २००९ या वर्षातील आहे.

## ■ सोलापूर जिल्ह्याची कृषी अर्थव्यवस्था:

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हा हा आजही अवर्षणग्रस्त मानला जातो. या जिल्ह्यातील शेती हा प्रमुख व्यवसाय मानला जातो. परंतू शेतीची उत्पादकता व प्रगती ही वेळेवर व पर्याप्त प्रमाणात पडणाऱ्या पावसावर अवलंबून आहे. सोलापूर जिल्ह्यातील जवळजवळ ७५ टक्के शेतजमीन ही लागवडीखाली आणली जात असल्याचे जमीन वापराचा आकृतीबंध दर्शवितो. त्यामुळे जिल्ह्यात निव्वळ लागवडीखालील क्षेत्र सापेक्षपणे महाराष्ट्र राज्यापेक्षा (५८ टक्के) जास्त आहे. याशिवाय जिल्ह्यातील माती व वातावरणामुळे पिकाचा आकृतिबंध हा दुय्यम दर्जाचा असून तो ज्या पिकांची उत्पादकता सापेक्षपणे कमी आहे अशांनी प्रभावीत

होतो. सोलापूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ६८ टक्के लोकसंख्या शेती व शेतीशी संबंधित व्यवसायाशी निगडीत आहे.

■ **अभ्यासाचे निष्कर्ष:**

सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीसंबंधी मिळालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

**१. जमीनधारण क्षेत्र :**

शेतकऱ्याकडे त्याच्या मालकीच्या असलेल्या जमिनीचे क्षेत्र म्हणजे जमीनधारण क्षेत्र होय. कोणत्याही कृषी संरचनेचे स्वरुप हे जमीन धारणेशी संबंधित असते. कारण जमीन धारण हा घटक कृषी उत्पादकतेवर दूरगामी परिणाम करणारा महत्त्वाचा घटक मानला जातो. सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडे असलेले जमीन धारण क्षेत्र तक्ता क्र. १ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र.१**

**जमीनधारण क्षेत्र**

**क्षेत्र एकरमध्ये**

| जमीन | क्षेत्र | टक्केवारी | सरासरी जमीन |
|---|---|---|---|
| बागायत | ३३५ | ३५.६३ | ३.३५ |
| जिरायत | ३१० | ३२.९७ | ३.१ |
| पडीक | २९५ | ३१.३८ | २.९५ |
| **एकूण** | **९४०** | **१००** | **९.४** |

*(संदर्भ: मुस्लिम शेतकऱ्यांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या आकडेवारीवर आधारित)*

तक्ता क्र. १ वरुन असे दिसते की, सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडे सरासरी ९.४ एकर इतकी जमीन असून त्यापैकी जवळजवळ ३१.३८ टक्के क्षेत्र पडीक आहे. तर केवळ ३५.६३ टक्के हे बागायती असून जिरायत क्षेत्राचे प्रमाणही ३२.९७ टक्के इतके आहे. काही भागात क्षारपाड जमीनी तर काही भागात जलसिंचनाच्या अभावामुळे सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडील शेतजमीनी मोठ्या प्रमाणात पडीक असल्याचे दिसते.

**२. पिकाचा आकृतीबंध :**

विशिष्ठ कालावधीत विविध पिकांखालील असलेले क्षेत्र म्हणजे पिकांचा आकृतिबंध होय. पिकांच्या आकृतिबंधात बदल होणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे कारण त्यावर विविध घटकांचा परिणाम होत असतो.

तक्ता क्र. २

पिकाचा आकृतीबंध

(क्षेत्र एकरमध्ये)

| पिकाचे नाव | क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|
| ज्वारी | १०० | १७.८६ |
| बाजरी | २.५० | ०.४४ |
| गहू | ८५ | १५.१८ |
| मका | १५ | २.६७ |
| तूर | १७.५ | ३.१२ |
| हरभरा | ८.५० | १.५१ |
| इतर(सूर्यफुल) | ७.५ | १.३३ |
| एकूण अन्नधान्य | २३६ | ४२.१६ |
| केळी | ६.१४ | १.११ |
| इतर व्यापारी पिके (तुती) | १२.५ | २.२३ |
| इतर पिके (चारा) | २२.५ | ४.०१ |
| एकूण व्यापारी पिके | ३२३.७४ | ५७.८३ |
| **एकूण** | **५५९.७४** | **१००** |

*(संदर्भ: मुस्लिम शेतकऱ्यांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या आकडेवारीवर आधारित)*

तक्ता क्र. २ नुसार सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडील शेतजमीनीवरील पिकांच्या आकृतिबंधावर व्यापारी पिकांचे प्रभुत्व असल्याचे दिसते. व्यापारी पिकांखालील क्षेत्र ५७.८३ टक्के असून अन्नधान्याच्या पिकांखालील क्षेत्र केवळ ४२.१६ टक्के इतके आहे. तरीही एकुण व्यापारी पिकांखालील क्षेत्रापैकी ऊस या पिकाखालील क्षेत्र सर्वात जास्त (८७.२५ टक्के) असून केळी (१.९२ टक्के), तुती (३.८६ टक्के) इत्यादी पिकांखालील क्षेत्रही नोंद घेण्यासारखे आहे. एकुण अन्नधान्याच्या पिकांखालील क्षेत्रापैकी ज्वारी (४२.३७ टक्के), गहू (३६.०१ टक्के) या पिकांखालील क्षेत्राचा वाटा इतर अन्नधान्याच्या पिकांची तुलना करता महत्तम आहे. याशिवाय अन्नधान्याच्या पिकांमध्ये तूर, मका, बाजरी, हरभरा व सुर्यफुल यासारख्या पिकांची लागवडही मुस्लिम शेतकरी करतात. काही भागात उपलब्ध असलेल्या जलसिंचनाच्या सुविधांमुळे पिकांच्या आकृतिबंधावर व्यापारी पिकांचे (विशेषत: ऊस) प्रभुत्व दिसून येते.

**३. उत्पादनाचा आकृतीबंध :**

कृषी उत्पादनांवर वातावरणातील बदलाचा परिणाम होताना दिसतो. सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या प्रमुख पिकांच्या उत्पादनात ज्वारी, गहू, मका व ऊस या पिकांचे उत्पादन इतर पिकांची तुलना करता सर्वात जास्त असल्याचे तक्ता क्र. ३ वरुन दिसते.

**तक्ता क्र. ३**

**उत्पादनाचा आकृतीबंध**

| पिकाचे नाव | क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|
| ज्वारी | २४५ | ३४.६२ |
| बाजरी | ० | ० |
| गहू | २७० | ३८.१६ |
| मका | ९० | १२.७२ |
| तूर | ३७.५ | ५.३० |
| हरभरा | १५ | २.१२ |
| इतर(सूर्यफुल) | ५० | ७.०६ |
| अन्नधान्य(क्विंटलमध्ये) | ७०७.५ | १०० |
| ऊस टनामध्ये | ६६५० | ९९.८८ |
| केळी | ० | - |
| इतर पैशाची पिके (तुती) | ७.५ | ०.२२ |
| **एकूण पैशाची पिके** | **६६६७.५** | **१००** |

*(संदर्भः मुस्लिम शेतकऱ्यांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या आकडेवारीवर आधारित)*

अन्नधान्याच्या पिकामध्ये गव्हाच्या उत्पादनाचा वाटा (३८.१६ टक्के) महत्तम असून त्यापाठोपाठ ज्वारीच्या उत्पादनाचा क्रमांक (३४.६२ टक्के) लागतो. याशिवाय एकूण अन्नधान्य उत्पादनामध्ये मका (१२.७२ टक्के) या कडधान्याबरोबर तृणधान्यांमध्ये सुर्यफुलांच्या उत्पादनाचा वाटाही (७.०६ टक्के) नोंद घेण्यासारखा असल्याचे दिसते. असे असले तरी एकूण अन्नधान्याच्या उत्पादनात तृणधान्याचा वाटा हा केवळ १४.४८ टक्के इतका असल्याचे दिसते. दुसऱ्या बाजूला एकूण पैशाच्या पिकांच्या उत्पादनात मात्र केवळ ऊस या पिकाच्या उत्पादनाचा वाटा महत्तम असून त्यापाठोपाठ तूतीच्या उत्पादनाचा वाटा (०.२२ टक्के) असल्याचे दिसते. तर केळीच्या पिकाखालील क्षेत्रावर नुकतीच लागवड केलेली असल्याने त्या पिकापासून अजून उत्पादन मिळालेले नाही.

**४. पिकांची उत्पादकता :**

कोणत्याही प्रदेशातील कृषी विकासाच्या दृष्टीने पिकाच्या उत्पादनाच्या आकृतीबंधापेक्षा पिकांची दर एकरी/हेक्टरी उत्पादकता महत्वाची मानली जाते. सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची उत्पादकता या ठिकाणी दर एकरी स्वरुपात मानली असून ती पुढील तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ४**

**पिकांची दर एकरी उत्पादकता**

| पिकाचे नाव | क्षेत्र |
|---|---|
| ज्वारी | २.४५ |
| बाजरी | ० |
| गहू | ३.१७ |
| मका | ६ |
| तूर | २.१४ |
| हरभरा | १.७६ |
| इतर(सूर्यफुल) | २ |
| अन्नधान्य(क्विंटलमध्ये) | २.९९ |
| ऊस टनामध्ये | २३.५३ |
| केळी | ० |
| इतर पैशाची पिके (तुती टनामध्ये) | ०.६ |
| **एकूण पैशाची पिके** | **२०.५६** |

*(संदर्भ: मुस्लिम शेतकऱ्यांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या आकडेवारीवर आधारित)*

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, मुस्लिम शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या सर्व पिकांचा विचार करता पैशाच्या पिकांची दर एकरी उत्पादकता (२०.५६ टन) अन्नधान्याच्या पिकांपेक्षा (२.९९ क्विंटल) जास्त असल्याचे दिसते. पैशाच्या पिकांमध्ये ऊस या पिकाची उत्पादकता (२३.५३ टन) महत्तम असून त्यापाठोपाठ तूतीच्या उत्पादकतेचा क्रमांक (०.६ टन) लागतो. एकुण अन्नधान्याच्या पिकांमध्ये मका या कडधान्य पिकाची उत्पादकता सर्वात जास्त (६ क्विंटल) असून गहू (३.१७ क्विंटल) व ज्वारी (२.४५ क्विंटल) या पिकांची उत्पादकता त्याच्या खालोखाल असल्याचे दिसते. तृणधान्यांमध्ये तूर या पिकाची दर एकरी उत्पादकता महत्तम (२.१४ क्विंटल) असून सुर्यफुल व हरभरा या पिकांची उत्पादकता अनुक्रमे २ क्विंटल व १.७६ क्विंटल इतकी असल्याचे दिसते.

**५. कृषी उत्पन्न :**

सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांना शेतीपासून मिळणारे उत्पन्न तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविले

आहे. जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ८७,३७२.५ रुपये इतके असून त्यांचे वार्षिक दरडोई कृषी उत्पन्न १२,८४८.८९ रुपये आहे. मुस्लिम शेतकऱ्यांचे दरडोई कृषी उत्पन्न काढण्यासाठी शेतीतून मिळणारे उत्पन्न भागिले कुटुंबातील सदस्य संख्या असे सूत्र वापरले आहे.

**तक्ता क्र. ५**

**कृषि उत्पन्न**

**(रुपयांमध्ये)**

| उत्पन्न प्रकार | उत्पन्न |
|---|---|
| शेतीपासून मिळणारे उत्पन्न | ८७,३७,२५० |
| शेतीपासून मिळणारे सरासरी उत्पन्न | ८७,३७२.५ |
| शेतीपासून मिळणारे दरडोई उत्पन्न | १२,८४८.८९ |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

## ६. पशुपालनापासून मिळणारे उत्पन्न :

सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांनी शेतीशिवाय उदरनिर्वाहाचे एक पर्यायी साधन म्हणून पशुपालन व्यवसायाचा आधार घेतला असून त्याद्वारे त्यांना होणारी उत्पन्न प्राप्ती तक्ता क्र. ६ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. ६

पशुपालनापासूनचे उत्पन्न

| जनावरांचा प्रकार | संख्या | उत्पन्न | सरासरी उत्पन्न | प्रत्येक जनावरापासूनचे उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| बैल | ३० | ० | ० | ० |
| गाय | ५६ | ३,१३,५०० | ३,१३५ | ५,५९८.२१ |
| म्हैस | १२० | २,१८,५०० | २.१८५ | १,८२०.८३ |
| शेळी | ४० | ५०,००० | ५०० | १,२५० |
| **एकूण** | **२४६** | **५,८२,०००** | **५,८२०** | **२,३६५.८५** |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

मुस्लिम शेतकऱ्यांना पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पन्नांची वरील तक्त्यातील आकडेवारी पाहता असे दिसते

की, प्रत्येक मुस्लिम शेतकऱ्याला पशुपालनापासून मिळणारे वार्षिक सरासरी उत्पन्न ५८२० रुपये इतके असून यामध्ये सर्वात जास्त उत्पन्न (३१३५ रुपये) गाईपासून मिळते तर त्यापाठोपाठ म्हशींपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा क्रमांक (२१८५ रुपये) लागतो. याशिवाय शेळीपालनातून मिळणारे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वांत कमी (५०० रुपये) असल्याचे दिसते.

**७. कर्जबाजारीपणा :**

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा हा शेतीच्या विकासाला पूरक की मारक अशी चर्चा बऱ्याच वेळा होताना दिसते. परंतु शेतकरी जेव्हा घेतलेले कर्ज उत्पादक कार्यासाठीच वापरतो त्या कार्यावर योग्य असे व्यवस्थापन ठेवतो. अशावेळी नक्कीच कोणतेही कृषी कर्ज हे शेती विकासासाठी उपयुक्त ठरते. म्हणूनच सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडे असलेल्या कर्जाचे विश्लेषण तक्ता क्र. ७ मध्ये केले आहे.

**तक्ता क्र. ७**

**शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा**

**(कर्ज रुपयांमध्ये)**

| कर्जाचे मार्ग | वारंवारिता (१०० नमुन्यांपैकी) | रक्कम | टक्केवारी | सरासरी | दरडोई कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीयीकृत बँक | ४० | १,९८,७५,००० | ४०.८५ | १,९८,७५० | २९,२२७.९४ |
| सहकारी बँक | ७६ | १,४४,२५,००० | २९.६५ | १,४४,२५० | २१,२१३.२३ |
| सावकार | ६४ | १,३६,००,००० | २७.९५ | १,३६,००० | २०,००० |
| मित्र व पाहुणे | ६ | ७,५०,००० | १०० | ७,५०० | १,१०,२.९४ |
| **एकूण** | - | **४,८६,५०,०००** | **१००** | **४,८६,५००** | **७१,५४४.११** |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

वरील तक्त्यात दर्शविलेला सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हा शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जापैकी शेतकऱ्यांच्या मुलाखती घेतेवेळी त्यांच्याकडे किती कर्ज शिल्लक आहे यावरुन मोजला आहे. वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सोलापूर जिल्ह्यातील सर्वच मुस्लिम शेतकरी कर्जबाजारी असुन त्यांच्याकडे सरासरी ४,८६,५०० रुपये इतके विविध घटकांचे कर्ज आहे. मुस्लिम शेतकऱ्यांनी विविध मार्गांनी घेतलेल्या कर्जाचा विचार करता असे दिसते की, ६४ टक्के शेतकऱ्यांकडे एकुण कर्जापैकी जवळपास २८ टक्के कर्ज सावकारांकडील आहे. मुस्लिम शेतकऱ्यांनी ज्या कारणासाठी कर्ज घेतले त्याशिवाय दुसऱ्या

कारणासाठी कर्जाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत असल्यानेच सावकारांकडील कर्जाचे प्रमाण जास्त आहे. याशिवाय मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा व कर्जबाजारीपणाचा विचार करता त्यांच्याकडे दरडोई ७१५४४.११ रुपये कर्ज असल्याचे स्पष्ट होते.

**८. शेतीतील मजुरांचा वापर :**

मुस्लिम शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये काम करणाऱ्या मजुरांची संख्या तक्ता क्र. ८ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ८**

**शेतीतील मजुरांचा वापर**

| मजूर | टक्केवारी |
|---|---|
| कुटुंबातील मजूर | ५१.७३ |
| पुरूष | ५८.८ |
| स्त्री | ४१.३४ |
| वेतनावरील मजूर | ४८.२६ |
| पुरूष | ४१.१९ |
| स्त्री | ५८.६५ |
| **एकूण मजूर** | १०० |
| **पुरूष** | १०० |
| **स्त्री** | १०० |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

मुस्लिम शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये वेतनावर काम करणाऱ्या एकुण मजुरांपैकी ५१.७३ टक्के मजुर हे शेतकरी कुटुंबातील असून ४८.२६ टक्के शेतमजुर हे वेतनावर काम करणारे आहेत. शेतीमध्ये काम करणाऱ्या शेतकरी कुटुंबातील मजुरांमध्ये महिलांचे प्रमाण ४१.३४ टक्के आहे तर वेतनावर काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण ५८.६५ टक्के असल्याचे दिसते. घरातील मजुरांचा जास्तीचा वापर हे मुस्लिम शेतकऱ्यांच्या आर्थिक मागासलेपणाचे लक्षण मानता येईल.

**९. मुस्लिम शेतकऱ्यांची सामाजिक स्थिती:**

सर्वसाधारणपणे मुस्लिम समाजामध्ये निरक्षरता, दारिद्र्य व बेकारी इत्यादींचे प्रमाण जास्त पाहायला मिळते. यातूनच त्यांचे सामाजिकदृष्ट्या मागासलेपणा स्पष्ट होते. यासंदर्भात मुस्लिम शेतकऱ्यांकडे करमणुकीची

साधने, वाहतूक सुविधांची उपलब्धता तसेच त्यांच्या घराचा दर्जा, शैक्षणिक पातळी, कुटुंबाचा आकार इत्यादी घटकांसंबंधी प्रस्तुत संशोधनात मिळालेले निष्कर्ष मांडत आहोत.

**अ) शैक्षणिक पातळी :**

भारतातील इतर धर्माचा विचार करता मुस्लिमांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी असतानाच त्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाणही नगण्य आहे. मुस्लिमांचे शैक्षणिक मागासलेपण हे त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सीमांतीकरणाचे कारण सांगीतले जाते. पुढील तक्ता क्र. ९ मध्ये मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबाची शैक्षणिक पातळी दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ९**

**कौटुंबिक शैक्षणिक पातळी**

| शैक्षणिक पातळी | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| ६ वर्षांपेक्षा कमी वय असलेले | १३४ | १९.७० |
| निरक्षर | ११६ | १७.०५ |
| प्राथमिक | ९६ | १४.११ |
| माध्यमिक | १९० | २७.९४ |
| उच्च माध्यमिक | ८० | ११.७६ |
| पदवीधर | ४४ | ६.४७ |
| पदव्युत्तर | २० | २.९४ |
| **एकूण** | **६८०** | **१००** |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

तक्ता क्र. ९ वरुन असे दिसते की, मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबामध्ये सर्वात जास्त (२७.९४ टक्के) सदस्य हे माध्यमिक पातळीपर्यंतचे शिक्षण घेतलेले असून त्याखालोखाल निरक्षर सदस्यांची संख्या (१७.०५ टक्के) आहे. याशिवाय पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले सदस्यही मुस्लिम शेतकरी कुटुंबामध्ये असले तरी त्यांचे प्रमाण केवळ अनुक्रमे ६.४७ टक्के व २.९४ टक्के इतके आहे.

**ब) कुटुंबाचा आकार :**

सन २००१ चा जनगणना अहवाल भारतामध्ये मुस्लिमांची संख्या वाढत आहे असे दर्शवितो. परंतू त्यास काही राजकीय व आर्थिक घटक कारणीभूत आहेत असे मानले जाते. तक्ता क्र. १० मध्ये सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या दर्शविली आहे.

तक्ता क्र. १०

कुटुंबातील सदस्य संख्या

| कुटुंबातील सदस्य | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| ४ पेक्षा कमी | १४ | १४ |
| ५ ते १० | ६६ | ६६ |
| १० पेक्षा जास्त | २० | २० |
| एकुण कुटुंबातील सदस्य | ६८० | - |
| कु टुंबातील सरासरी सदस्य | ६.८ | - |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबामध्ये सरासरी ६.८ इतके सदस्य असून यामध्ये २०•टक्के मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या १० पेक्षा जास्त असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसते. याशिवाय ६६ टक्के शेतकरी कुटुंबातील सदस्य संख्या ५ ते १० इतकी असून १४ टक्के शेतकऱ्यांची कुटुंबे ४ पेक्षा कमी सदस्य संख्या असणारी आहेत.

**क) घराचा दर्जा :**

कोणत्याही शेतकऱ्याच्या दृष्टीकोनातून स्वत:चे घर असणे व त्याचा दर्जा चांगला असणे ही एक मुलभूत बाब मानली जाते. त्याचबरोबर शेतकऱ्याच्या घराचा दर्जा हा शेतकऱ्याच्या सामाजिक व आर्थिक स्थिती दर्शविणारा ठरतो. पुढील तक्ता क्र. ११ मध्ये मुस्लिम शेतकऱ्यांच्या घराचा दर्जा दर्शविला आहे.

तक्ता क्र.११

घराचा दर्जा

| घराचा दर्जा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| आरसीसी | १० | १० |
| पक्के | ५४ | ५४ |
| कच्चे | ३६ | ३६ |
| **एकूण** | १०० | १०० |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

वरील तक्त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील बहुतांशी मुस्लिम शेतकऱ्यांकडे (५४ टक्के) पक्के घर असून केवळ १० टक्के शेतकऱ्यांकडे आर.सी.सी. प्रकारचे बांधकाम असणारे घर असल्याचे स्पष्ट होते. तथापि कच्चा

दर्जाचे घर असणाऱ्या मुस्लिम शेतकऱ्यांची संख्या ३६ टक्के असून हे प्रमाण त्यांच्या सामाजिक आर्थिक मागासलेपणाचे निर्देशकच आहे.

**ड) करमणूकीच्या साधनांची उपलब्धता :**

करमणूकीच्या साधनांची उपलब्धता ही सुध्दा शेतकऱ्यांचा सामाजिक आर्थिक स्तर उच्च असल्याचे दर्शविते. तक्ता क्र. १२ मध्ये मुस्लिम शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या करमणुकीच्या साधनांची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. १२**

**करमणुकीच्या साधनांची उपलब्धता**

| साधने | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| उपलब्ध नाहीत | ५६ | ५६ |
| दूरचित्रवाणी | ४ | ४ |
| रेडिओ | २६ | २६ |
| टेप रेकॉर्डर | ० | ० |
| इतर | ० | ० |
| दूरचित्रवाणी+टेपरेकॉर्डर | १४ | १४ |
| **एकुण** | १०० | १०० |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

सोलापूर जिल्ह्यातील ५६ टक्के मुस्लिम शेतकऱ्यांकडे कोणत्याही प्रकारची करमणुकीची साधने उपलब्ध नसल्याचे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते. तथापि २६ टक्के शेतकऱ्यांकडे रेडिओ हे परंपरागत साधन करमणुकीसाठी असल्याचे दिसते.

**इ) वाहतूक सुविधा :**

कृषी विकासाच्या प्रक्रियेत वाहतूक सुविधा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. तथापि वाहतुक सुविधा चांगली व वेळेवर उपलब्ध होत असेल तर त्यातून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक फायद्यात वाढ होऊ शकते. या दृष्टीकोनातून सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडे कोणत्या प्रकारच्या वाहतूकीच्या सुविधा उपलब्ध आहेत ते तक्ता क्र. १३ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र.१३

वाहतुक सुविधा

| साधन | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| कोणतेही वाहन नाही | १० | १० |
| सायकल | ५० | ५० |
| दुचाकी मोटार | ३६ | ३६ |
| चारचाकी मोटार | ४ | ४ |
| **एकुण** | १०० | १०० |

*(संदर्भ: तक्ता क्र. १ प्रमाणे)*

तक्ता क्र.१३ वरुन असे दिसते की, सोलापूर जिल्ह्यातील ५० टक्के मुस्लिम शेतकऱ्यांकडे वाहतुकीसाठी केवळ सायकल हे परंपरागत साधन उपलब्ध असून ३६ टक्के शेतकऱ्यांकडे दुचाकी मोटार सायकली उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही सोलापूर जिल्ह्यातील १० टक्के मुस्लिम शेतकऱ्यांकडे कोणत्याही प्रकारचे स्वत:चे वाहतुकीचे साधन उपलब्ध नाही. तर केवळ ४ टक्के शेतकऱ्यांकडे वाहतुकीचे चारचाकी वाहन उपलब्ध आहे.

## ■ सारांश व निष्कर्ष

भारतामध्ये मुस्लिम समाज हा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून अल्पसंख्याक असून त्यांची ओळख ही त्यांच्या पारंपरिक व्यवसायातूनच होते. विशेषत: मुस्लिम समाजातील लोकांचा शेतीशी किती संबंध हा प्रश्न कधीही फारसा गांभीर्याने घेतला जात नाही. यासाठीच सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे विश्लेषण केल्यानंतर पुढील काही निष्कर्ष मिळाले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांकडे सरासरी ९.४ एकर इतकी जमीन असली तरी त्यापैकी ३२.९७ टक्के व ३१.३८ टक्के जमिन ही अनुक्रमे जिरायत व पडीक स्वरुपात आहे. पिकाच्या आकृतीबंधाचा विचार करता ज्या शेतकऱ्यांकडे जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत ते पैशांच्या पिकांची (विशेषत: ऊस) लागवड करतात तर ज्यांच्याकडे जलसिंचन सुविधा उपलब्ध नाहीत असे शेतकरी पारंपरिक कडधान्ये व तृणधान्यांची लागवड करतात. पैशाच्या पिकांमध्ये मुस्लिम शेतकऱ्यांना ऊस या पिकापासून मिळणारे उत्पादन सर्वात जास्त असून अन्नधान्याच्या पिकांमध्ये गहू या पिकापासून महत्तम उत्पादन मिळते तर त्यापाठोपाठ ज्वारी या पिकापासून मिळणाऱ्या उत्पादनाचा क्रमांक लागतो. दर एकरी उत्पादकतेचा विचार करता असे

दिसून आले की, अन्नधान्याच्या पिकांमध्ये मका या पिकाची उत्पादकता सर्वात जास्त असून त्यापाठोपाठ गहू या पिकाच्या उत्पादकतेचा क्रमांक लागतो. तर पैशाच्या पिकांमध्ये ऊसाची दर एकरी उत्पादकता सर्वात जास्त आहे. मुस्लिम शेतकऱ्यांना शेतीपासून मिळणारे वार्षिक सरासरी उत्पन्न सन २००९ मध्ये ८७,३७२.५ रुपये इतके असले तरी त्यांचे दरडोई वार्षिक उत्पन्न मात्र केवळ ११,२०१.६ रुपये असल्याचे आढळून आले. विशेष बाब म्हणजे एकुण मुस्लिम शेतकऱ्यांपैकी २५ टक्के शेतकऱ्यांना आपल्या शेतीपासून काहीही उत्पन्न मिळत नसल्याचे आढळून आले. शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाशिवाय मुस्लिम शेतकऱ्यांकडे पशुपालन व्यवसायातूनही उत्पन्न मिळते. त्याचे प्रमाणे वार्षिक सरासरी २,३६५.८५ रुपये असल्याचे आढळून आले. यामध्ये गाईपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा वाटा सर्वात जास्त असल्याचे दिसून आले. मुस्लिम शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाबाबत असे दिसून आले की, सर्वच मुस्लिम शेतकऱ्यांनी कोणत्या ना कोणत्या मार्गाने कर्ज घेतले असून त्यांच्याकडील कर्जाची सरासरी थकबाकी ४६,५०० रुपये इतकी असल्याचे दिसून आले. यामध्ये जवळपास ३० टक्के कर्ज हे सावकारांसह इतर बिगरसंस्थात्मक घटकांकडून घेतले असल्याचे दिसून आले. सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये वेतनावरील मजुरांपेक्षा घरातील मजुरांचा वापर जास्त प्रमाणात केला जात असल्याचेही आढळून आले.

मुस्लिम शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीबाबत या अभ्यासात असे दिसून आले की, मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महत्तम सदस्यांचे शिक्षण हे माध्यमिक स्तरापर्यंत झालेले असून निरक्षर सदस्यांचे प्रमाणही १७.०५ टक्के आहे. याशिवाय त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची सरासरी संख्या ही ७.८ इतकी असल्याचे दिसून आले. तर जास्तीत जास्त मुस्लिम शेतकऱ्यांना राहण्यासाठी असणारे घर हे कच्च्या स्वरुपाचे असल्याचे आढळले. निम्यापेक्षा जास्त मुस्लिम शेतकऱ्यांकडे करमणुकीसाठी कोणत्याही प्रकारच्या सुविधा नसल्याचे आढळून आले. तर रेडिओ हे परंपरागत करमणुकीचे साधन २६ टक्के शेतकरी वापरत असल्याचे दिसून आले. वाहतुकीच्या साधनांबाबत असे आढळून आले की, निम्म्या मुस्लिम शेतकऱ्यांकडे केवळ सायकल हे साधन उपलब्ध असतानाच निवडक शेतकऱ्यांकडे मोटारसायकल आहेत.

■ **उपाययोजना:**

वरील काही महत्वपूर्ण निष्कर्षावरुन सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने पुढील काही उपाययोजना सुचविता येतील ....

१) मुस्लिम शेतकऱ्यांच्या शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना विशिष्ट अनुदाने किंवा सवलतीचे कर्ज उपलब्ध करुन द्यावे.

२) शासनाने मुस्लिम शेतकऱ्यांकडे असलेल्या कर्जाचे प्रमाण व त्यांची सामाजिक आर्थिक स्थिती पाहता त्यांना कर्जमुक्ती किंवा कर्ज सवलत यासारख्या योजना त्यांच्यासाठी पुन्हा राबवाव्यात.

३) मुस्लिम शेतकऱ्यांच्या कुटुंबाची अल्प शैक्षणिक पातळी पाहता त्यांच्या मुलांना शैक्षणिक संस्थांमध्ये विशिष्ट प्रमाणात कोटा उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन त्यातून त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल.

४) मुस्लिम शेतकऱ्यांचे सार्वत्रिक दारिद्र्य पाहता ते कमी करण्यासाठी शासनाने त्यांच्यासाठी खास घरे, शिक्षण व दारिद्र्य निमुर्लन इत्यादी बाबतीत खास कार्यक्रम आखावेत.

■ **संदर्भग्रंथ :**


1. Alam M.S. (2009), Whither Muslim Politics?, Economic and Political Weekly, vol. xliv, no. 39, September 26, PP. 92-95.
2. Chadha, G. K. (1978), Farm size and productivity Reviusited: Some notes from recent experience of Punjab, Economic and Political Weekly, Vol. 13, No. 39.
3. Engineer, I (1995): Politics of Muslim Vote Bank, Economic & Political Weekly, Vol. 30, No. 4, 197-200
4. Indian Social Institute, (2006), Report on the Socio-Economic Conditions of Muslims in India, New Delhi.
5. Kadam Santosh N. (2009), New Agricultural Technology: Socio-Economic Impact, Reliance Publishing House, New Delhi.
6. Khalidi, Omar (1993): Muslims in indian Political Processes, Economic & Political Weekly, Vol 28 (1-2), 43-54.
7. Najiullah Syed (2006), The Status of Muslims in India, Free Online Library.
8. Singh, J. P. (1981), Caste Institution and Production Efficiency of Farmers in Eastern UP, Indian Journal of Agricultural Economics, Vol. 36, No. 3.
9. Tilak B. G. (1993), Education and Agricultural Productivity in Asia: A Review, Indian Journal of Agricultural Economics, Vol. 48, No. 2.
10. Varghese K. E. (1986), "Socio-Economic changes in Kerala, Ashish Publishing House, New Delhi.
11. Zahid S. F. (2009), Socio-Political and Economic Status of Muslims in India, Free Online Library.

## अर्थ शब्दांची वाट पाहे
## लोकसंख्या लाभांशः समज व अपसमज

शि. ना. माने, सातारा

■ **उगम व विकासः**

सर्वसाधारणपणे १९८०च्या दशकात वस्तुरूप किंवा भौतिक भांडवलाच्या जागी मानवरूप भांडवल व तंत्रविषयक बदल यांचे महत्त्व वाढले. आर्थिक वृध्दीचे प्रमुख चालक म्हणून त्यांना मान्यता मिळाली. वस्तुरूप भांडवल दुय्यम स्थानावर गेले. त्यावेळी आर्थिक वृध्दीविषयी प्रसिध्दी पावलेल्या डब्ल्यू. ए. लेविस यांच्या ***दी थिअरी ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ*** (१९५४) मधील त्या काळात मुखोद्गत असलेले पुढील विधान मला आजही चांगले आठवते. "Coal is not a valued resource unless men learn to burn it" (दगडी कोळशाच्या ज्वलनातून उर्जानिर्मितीची विद्या माणसांनी अवगत केली नाही, तर त्या कोळशाला मूल्यांकित साधन संपत्ती म्हणता येत नाही.) दुसऱ्या शब्दात, दगडी कोळशाच्या स्वरूपातील वस्तुरूप भांडवलापेक्षा माणसाने अवगत केलेली उर्जेत रुपांतरण करणारी विद्या जास्त महत्त्वाची आहे.

पुढे २००२ मध्ये यू.एन्. रिपोर्ट (United Nations Fund for Population Agency) प्रसिध्द झाला. नव माल्थसवाद्यांपुढे ते एक आव्हान होते. लोकसंख्या वृध्दीपेक्षा वय रचना[१] जास्त महत्त्वाची असते. हा त्या अहवालातील निष्कर्ष मान्यता पावला. यथावकाश त्याचा परिणाम म्हणून लोकसंख्या वृध्दीवर दूरगामी प्रभाव टाकणाऱ्या पुढील घटकांचा अनुभव आला. लोकांचे आयुर्मान वाढले. बालकांचे उत्तरजीवित्वाचे प्रमाण (Survival Rate) वाढले. जनन क्षमता प्रमाणात घट झाली. त्याचा नक्त परिणाम म्हणजे प्रौढांच्या कार्यकारी लोकसंख्येचे वृध्दांच्या लोकसंख्येशी असणारे गुणोत्तर वाढले. कुटूंबाचे आकारमान जसे घटत गेले तसा स्त्रियांचा श्रमबाजारातील हिस्सा वाढत गेला.[२] अशा प्रकारे लोकसंख्या लाभांशासाठी पोषक जमीन तयार झाली. तिच्यामध्ये एकदाचे लोकसंख्या लाभांशाचे बीज पडले की ते अंकुरणार व फोफावणारच! परंतु सावधान! लोकसंख्या लाभांशाविषयीचा गुंतागुंतीचा प्रश्न जितक्या सहजतेने हातावेगळा केला जातो तितक्या सहजपणे लोकसंख्या लाभांशासाठी पोषक घटक घडून येत नाहीत. आताच उल्लेख केल्याप्रमाणे कुटुंबाचे आकारमान घटणे व स्त्रियांचा श्रमबाजारातील हिस्सा वाढणे यासाठी काही दशके थांबावे लागेल. पोषक जमीन ही एक निव्वळ संधी आहे. संधीचे सोने करण्यापूर्वी देशाला अनेक अडथळे पार करावे लागतात.

■ **अडथळे:**

पहिला अडथळा असा की लोकसंख्या लाभांश खिशात टाकण्यापूर्वी देशाला योग्य विकासाच्या पायरीवर असणे जरूर आहे. परंतु योग्य विकास व विकासाची योग्य पायरी यांच्याविषयी आर्थिक पंडितांमध्ये क्वचितच एकमत असते.

दुसरा अडथळा स्पष्ट करण्यासाठी यू.एन्. फंड फॉर पॉप्युलेशन एजन्सीच्या अहवालातील (१९९९) दाखल्याचा उल्लेख करू. अहवालात प्रथमच युवा कंप (youth quake) या संज्ञेचा वापर करण्यात आला आहे. हा युवा कंप किंवा प्रस्फोट लोकसंख्या प्रस्फोटापेक्षा जास्त स्फोटक असतो. युवा लोकसंख्या १५ ते २४ वयोगटात मोडते. स्वाभाविकपणे या वयोगटातील व्यक्ती राष्ट्रीय केकमध्ये भर टाकत नाहीत परंतु राष्ट्रीय केकच्या मोठ्या आकाराच्या स्लाईसमध्ये ते हक्कदार असतात. विशेषत: युवा लोकसंख्येसाठी शिक्षण, आरोग्य व सामाजिक सेवा यांची तरतूद करण्यासाठी विकसनशील देशांच्या सरकारांना (त्यात भारताचा समावेश होतो) सतत झगडावे लागते.

तिसरा अडथळा लोकसंख्या लाभांशाच्या निर्धारणाविषयीचा आहे. लोकसंख्या लाभांश स्थिर, कायमस्वरूपी व निश्चित नसतो. तो स्वत: एक अवलंबी चल असल्यामुळे प्रत्यक्षात एखाद्या देशाच्या बाबतीत विशिष्ट वेळी त्या लाभांशाचे निर्धारण करणे कठीण काम असते.

तथाकथित लोकसंख्या लाभांशाविषयी काही अभ्यास करण्यात आले आहेत. त्यातील अंदाजानुसार जे प्रदेश लोकसंख्या लाभांशाच्या पातळीवर होते त्या काळात तेथील लोकांच्या दरडोई उत्पन्नात जवळ जवळ ३३% इतकी वाढ झाली.[३] या फायद्या बरोबर एक प्रश्नही निर्माण केला जातो. मनुष्य अन्नाशिवाय जगू शकत नाही, हे एक वास्तव आहेच. ते मान्य करूनही सॅम्युअलसन म्हणतात त्या प्रमाणे राष्ट्र केवळ जीडीपीवर जगू शकत नाही. व व्यक्ती केवळ भाकरीवर जगू शकत नाही. लगेच दुसऱ्या एका ठिकाणी ते पुढील प्रश्न विचारतात: "जीवनाच्या गुणवत्तेच्या बदलात आपण (आधुनिक अर्थशास्त्राने) संख्येचे स्तोम किती चालवून घ्यावेत?"[४]

यानंतरचा आक्षेप आजचा चल विरुध्द उद्याची अस्थिरता याविषयी आहे. दुर्मिळ लोकसंख्या लाभांशाच्या संधीचे सोने सुवर्णात रुपांतर करण्याच्या संदर्भात लोकसंख्या शास्त्रज्ञ 'वृध्दीच्या वांछनीय चक्राचा' (Virtuous Cycle of Growth) उल्लेख करतात. लोकांच्या आयुर्मानात वाढ ——— कुटुंबाच्या आकारमानात घट ——— प्रौढांच्या कार्यकारी लोकसंख्येच्या वृध्दांच्या लोकसंख्येशी असलेल्या गुणोत्तरात वाढ ——— जननक्षमतेत घट ——— स्त्रियांच्या शिक्षणात व त्यांच्या श्रमबाजारातील हिश्श्यात वाढ ——— देशाच्या औद्योगिक उत्पादकतेत वाढ असे हे चक्र आहे. यातून पुढील प्रश्न निर्माण होतो. रेषा

जर बिंदूपासून निर्माण होते तर ती प्रत्येक बिंदूत थोडा वेळ स्थिरावल्याशिवाय पुढील बिंदूकडे कूच करीत नाही. जसे हिरवा बावटा मिळेपर्यंत चौकात थांबावे लागते. इथपर्यंत सारे यथासांग पार पडते. समजा, आता लोकसंख्या संक्रमण पुढील बिंदूकडे कूच करेपर्यंत स्थिरावले आहे. लोकसंख्या लाभांश खिशात पडला आहे. आजचे कार्यकारी प्रौढ दहा-वीस वर्षांनी वृध्द झाले आहेत. घटत्या जननक्षमतेच्या पार्श्वभूमीवर त्या वृध्दांची त्यावेळी कोण काळजी घेणार? म्हणजे त्यावेळी वृध्दांची काळजी घेण्यासाठी पुरेशा प्रमाणात प्रौढ असतील काय?[५] 'शासन' हे सार्वत्रिक उत्तर संभवनीय आहे परंतु आपण मागे उल्लेख केल्याप्रमाणे १५ ते २४ वयोगटातील व भारतातील जवळ जवळ १८ ते २० टक्के स्फोटक युवा लोकसंख्येसाठी शिक्षण, आरोग्य व सामाजिक सेवा पुरविण्याने बेजार झालेले भारतासारखे विकसनशील देश निवृत्तीवेतनधारकांच्या व वृध्दांच्या वाढत्या लोकसंख्येचे प्रश्न किती तत्परतेने हाताळतील? जास्त बिकट प्रश्न पुढेच आहे. आजचे प्रौढ दहा-वीस वर्षांनी वृध्द होतील त्यावेळी आजचे तथाकथित वृध्दीचे वांच्छनीय चक्र शाबूत असेल काय?

आता एक अखेरचा प्रश्न. लोकसंख्या लाभांशावरील देशातील संपूर्ण कार्यकारी प्रौढ वयोगटातील लोकसंख्या कार्यमग्न आहे असे एक गर्भित ग्रहीत आहे. परंतु प्रत्यक्षात हे खरे नाही. याच्याशी संबंधित दुसरा प्रश्न असा की कार्यकारी वयोगटातील प्रत्यक्षात कार्यमग्न असलेल्या प्रौढ लोकसंख्येपैकी किती लोक कुशल आहेत. भारतात तुलनेने कार्यकारी लोकसंख्येचे व विशेषत: त्या वयोगटात नव्याने प्रवेश करणाऱ्या पदवीधारकांचे प्रमाण मोठे आहे. आणि भारतासाठी लोकसंख्या लाभांश खिशात टाकण्याची कधी नव्हे ती संधी चालून आली आहे, असे त्या लाभांशाचे समर्थन केले जाते. परंतु नव्याने प्रवेश करणाऱ्या पदवीधारकांपैकी अधिकतर लोक अकुशल आहेत ही गोष्ट दुर्लक्षित राहू नये. विद्यानिष्ठ (Academic ) पदवी व उद्योगाची व्यवसायात्मिका निर्मितीची (Skill Formation) गरज यांच्यातील वाढत्या तफावतीवर भाष्य करणाऱ्या पुढील संवादाचा उल्लेख करू. एक पंधरा वर्षीय मुलगा त्याच्या पस्तीस वर्षीय वडिलांना विचारतो: "डिस्पाईट एक्सलन्ट स्कूलिंग अॅन्ड बेस्ट अॅकॅडेमिक अचिव्हमेन्ट्स्, आर यू नॉट अ नॉलेज-वर्कर? " "माय नॉलेज इज नॉट वर्क" , वडिलांनी उत्तर दिले.

### ■ समारोप:

आक्षेप लोकसंख्या लाभांशाविषयी नाही. विशेषत: भारतासारख्या विकसनशील देशात लोकसंख्या लाभांशासाठी अधिकतर घटक प्रतिकुल असताना त्याचे समर्थन करण्याची जी घाई केली जाते ती आक्षेपार्ह आहे आणि त्या समर्थनावर देण्यात येणारा जोर दु:स्थलांकित (Misplaced) आहे. बोर्डरूममध्ये कंपनीच्या संचालकांनी लाभांशाचा निर्णय घेतला तो त्यांचा अधिकार आहे त्याविषयी दुमत नाही. मात्र पुढील प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळविण्याचा सामान्य भागधारकांचा हक्क संचालकांना डावलता येणार नाही:

१)लाभांशाची (किंवा लोकसंख्या लाभांशाची) माहिती योग्य वेळेत दिली आहे काय?

२) ती पुरेशी आहे काय?

३) ती सामान्य भागधारकांना (अवघ्या जनतेला) समजेल अशा भाषेत आहे काय?

लोकसंख्येच्या लाभांशाच्या गुंतागुंतीच्या समस्येविषयी हे प्रश्न अनुत्तरित राहीले तर अतिसरलीकरणाचा (Oversimplification) दोष संभवतो.

**References:**


1) Economics Focus / Does population matter?, *The Economist*, December 7-13, 2002, p.78,

2) Ibid,

3) Ibid,

4) Samuelson Paul A., Economics, Mc Graw-Hill, 1973, p.4,

5) Op.cit (3).


---

**निवेदन**

**प्रा. डॉ. सौ. अरुणा रारावीकर**

**स्मृती आर्थिक लेख पुरस्कार**

..............................................................................

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू करीत आहोत. परिषदेच्या आजीव सदस्यांनी जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिकवृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना प्रथम पुरस्कार रु.१०००/- व द्वितीय पुरस्कार रु.५००/- दिले जातील. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१० ते ३१ डिसेंबर २०१० चे वर्षातील लेख विचारात घेतले जातील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख वृत्तपत्राच्या नाव, दिनांकासह झेरॉक्स करून लवकरात लवकर कार्यवाह, म.अ.प. बार्शी यांच्याकडे पाठवावेत. परिषदेच्या २०११ च्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

अनिल सूर्यवंशी,<br>कार्यवाह-खजिनदार,<br>मराठी अर्थशास्त्र परिषद

## ‘अर्थसंवाद’ या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
## (फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.अनिल सूर्यवंशी,
मुद्रक व प्रकाशक

VIDYA VIKAS PRATISHTHAN'S

# V V P INSTITUTE OF ENGINEERING AND POLYTECHNIC

Gat No. 72/2 B, Pratapnagar, Soregaon- Dongaon Road, Soregaon Solapur- 413 004.

**ISI 9001: 2008 Certified Institutes**

## V V P INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY, SOLAPUR

Tel. : 0217- 6452555
Fax : 0217- 2341655
E-mail : vvpiet@rediffmail.com
website : www.vvpengineering.org

**Recognized by**
AICTE New Delhi, DTE Mumbai,
Affiliated to Solapur University, Solapur.

**COURSES OFFERED**

| Name of the course | Intake |
|---|---|
| Mechanical Engineering | 120 |
| Computer Science & Engineering | 60 |
| Electronics & Telecommunication | 60 |
| Electrical & Electronics Engineering | 60 |
| Civil Engineering | 60* |

## V V P POLYTECHNIC SOLAPUR

Tel. : 0217- 6452444
Fax : 0217- 2341655
E-mail: vvpps@rediffmail.com
website : www.vvppolytechnic.org

**Recognized by**
AICTE New Delhi, DTE Mumbai,
Affiliated to MSBTE Mumbai.

**COURSES OFFERED**

| Name of the course | I[st] Shift Intake | II[nd] Shift Intake |
|---|---|---|
| Mechanical Engineering | 120+60* | 60 |
| Computer Engineering | 60 | 60 |
| Electronics & Telecom. | 60 | 60 |
| Electrical Engineering | 60 | - |
| Civil Engineering | 60 | - |

## ELIGIBILITY CRITERIA

**Degree First Year :**
Candidate should have passed
H.S.C. with min.45%. Marks in PCM
Minimum-40% for backward class categories.
Non zero score at MHT-CET.

**Direct Second Year:**
Diploma in engineering/B.Sc.with 60%marks.

**Diploma First Year:**
Candidate should have passed
S.S.C. with min. 35% Marks.

**Direct Second Year :**
H.S.C. with Technical/Vocational
subject 50%. ITI with 60% marks.

## FEATURES OF THE INSTITUTES

● Highly Qualified and experienced staff. ● Continuous evaluation and monitoring system through academic monitoring system. ● MOUs for Industry Institute interaction and expert lectures. ● Special focus on personality development, communication and Soft skills. ● Lucrative scholarship for meritorious students. ● Well furnished ultramodern and picturesque, Green buildings. Pollution free and eco-friendly campus. ● Strict adherence for academic discipline. ● Career guidance centre. ● ARC centre.

### Facilities at a Glance

- Well Equipped Laboratories
- 24 hrs. Internet Facility
- Hostel for Boys & Girls
- E-library & Book Bank Scheme
- Regular Organization of Workshops & Seminars
- Bus facility from various parts of city

## DEGREE WING : CONTACT PERSONS : DIPLOMA WING

**Dr. S. V. Deshpande** principal v. v. p. i. E. T.
**Prof. S. N. Kulkarni**
Cell. : 9822356199
**Prof. D. B. Mantri**
Cell. : 9822511909
**Prof. G. K. Deshmukh**, Chairman

**Prof. S. M. Shaikh** principal v. v. p. p.
**Prof. S. N. Chavan**
Cell. : 9225133555
**Prof. L. B. Chougule**
Cell. : 9225313375
**Mr. A. S. Chavan**, Secretory

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन दि. ०७ नोव्हेंबर ते ०९ नोव्हेंबर २०११ या दरम्यान नांदेड एज्युकेशन सोसायटीचे पिपल्स कॉलेज, नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनाच्या संयोजकाकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविण्यात येईल. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रू. सहाशे (रू.६००) असून विद्यार्थ्यांसाठी ते रू. तिनशे (रू.३००) आहे. सदस्यांनी पूर्व नियोजनाच्या दृष्टीने रू. ६००/- चा नांदेड येथे देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.)'स्थानिक कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन' यांचे नावे स्थानिक कार्यवाहाकडे पाठवावा. नव्याने परिषदेचे वार्षिक सदस्य होऊ इच्छीणाऱ्यांसाठी आपली वार्षिक सदस्यत्वाची वर्गणी रू. ३०० अधिवेशनाच्या ठिकाणी घेण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच आजीव सदस्य वर्गणी स्विकारली जाईल.

परिषदेतील चौथ्या चर्चासत्रासाठी आयत्या वेळेचा विषय खालील प्रमाणे राहील.

### 'महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक'

या विषयावर शोधनिबंध मागविले जात नाहीत.
परिषदेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

**आपले स्नेहांकित**

- **प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले**
  स्थानिक कार्याध्यक्ष
- **डॉ. आ.गो. पुजारी**
  अध्यक्ष
- **डॉ. डी.के. पाटील**
  कार्याध्यक्ष
- **डॉ. अनिल सूर्यवंशी**
  कार्यवाह- खजिनदार
- **डॉ. विकास सुकाळे**
  स्थानिक कार्यवाह
- **डॉ. अविनाश निकम**
  संपादक, अर्थसंवाद